सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३५८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |


ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



संघकार्य करण्यासाठी आपल्याला कार्यकर्त्यांची संख्या वाढवणे आवश्यक असते. हे कार्यकर्ते आपल्या उपलब्ध स्वयंसेवकातून मिळतील. त्यासाठी सकारात्मक दृष्टी विकसित करावी. प्रत्येकामध्ये काहीना काही सद्गुण असतोच ही युधिष्ठिराची दृष्टी होती. आपलीही दृष्टी युधिष्ठिरासारखी हवी, म्हणजे आपल्याला कार्यकर्ते मिळतील.

- **श्रीकृष्ण मोतलग**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा.
सह प्रचारक प्रमुख

# वनविभागाची परवानगी न घेताच सोलापूर विद्यापीठाने केले बांधकाम

- शासनाकडून घेणार मार्गदर्शन
- इको सेन्सिटीव्ह झोन समितीच्या बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने राखीव वनक्षेत्र लगतच्या गट ३५६ व ३६५ मध्ये नवीन प्रशासकीय इमारत, भव्य स्मारकाची उभारणी, खेलो इंडिया मल्टीपरपज हॉल आदी बांधकामे केली आहेत. परंतु त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीची परवानगी घेतली नसल्याचे समोर आले. या समितीने यावर राज्य शासनाकडे मार्गदर्शन मागविण्याचे ठरविले आहे.



उर्वरीत गट क्रमांक ३६६ व ३५७ मधील बांधकाम करण्यासाठी समितीने मंजूरी दिली आहे. देशाचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना धडे देणाऱ्या विद्यापीठाकडून असे प्रकार योग्य नसल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात रंगली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी (दि.७) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपवन संरक्षक कुलराज सिंग, सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपसंचालक निखिल मोरे, संनियंत्रण समिती सदस्य प्रा. डॉ. निनाद शहा, नगररचना, भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठाने ४९२ एकर क्षेत्रामध्ये नवीन स्वतंत्र इमारत, स्मारक व अन्य बांधकाम केली आहेत. ९० ते ९५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्याचा मानस कुलगुरू प्रा. महानवर यांनी पत्रकार परिषेदेत दोन वेळा व्यक्त केला होता. परंतु रस्त्याचे काम झाले नसल्यामुळे यास गती येत नव्हती. त्यामुळे उद्घाटनाचा मुहुर्त दोन वेळा पुढे गेला. विस्तार क्षेत्रातील काही जमिनीचे गट वन विभागाच्या राखीव वनक्षेत्रात येतात. नवीन प्रशासकीय इमारतीस जाण्यासाठी रस्ता, बांधकामासाठी वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. पण, त्याबाबत विद्यापीठाने स्वतंत्र आराखडाच वन विभागाकडे सादर केलेला नव्हता. दरम्यान, वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्रासह इतर प्रश्नांबाबत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी मंत्रालयात बैठक घेतली होती. त्यानंतर दोन वेळा जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली होती.

**● विद्यापीठ प्रशासनाचा ठिसाळ कारभार**

विद्यापीठाने ४९२ एकर क्षेत्रात विद्यापीठाचे विस्तारीकरण करताना स्थानिक प्रशासन, संबंधित यंत्रणांची परवागनी घेणे बंधनकारक असताना त्याकडे दुर्लक्ष केले. यासाठी तत्कालीन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस व त्यानंतर विद्यमान कुलगुरू प्रा. महानवर यांचे प्रशासन जबाबदार आहे. त्यामुळे प्रशासनाचा ठिसाळ कारभार यातून दिसून येत आहे.

**● स्थानिक समितीच्या परवानगीची गरज**

विद्यापीठास मिळालेले प्रस्ताव जागेच्या लगतचे काही गट राखीव वनक्षेत्रातील आहेत. वनकायद्यानुसार वनविभाग त्यासंदर्भात कार्यवाही करेल, असा तत्कालीन सहाय्यक वनसंरक्षकांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात विद्यापीठाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. संबंधित विभागाची कायदेशीर परवानगी घ्यावे, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले. त्यामुळे विद्यापीठाला आता इको सेन्सिटीव्ह झोन सनियंत्रणच्या स्थानिक समितीच्या परवानगी गरज आहे.

# सुप्रीम कोर्टाचा 'निर्णायक' दिवस

**● महामार्ग, शाळा, रुग्णालयांतून भटके श्वान हटवा ● नसबंदीनंतर निवारागृहात ठेवा ● सर्वोच्च न्यायालयाचे कठोर आदेश**

**◆ नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

सर्व राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांवरून भटक्या प्राण्यांना हटवावे. भटक्या श्वानांचा बंदोबस्त करण्यासाठी रुग्णालये, शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात कुंपण घालावे, अशा कठोर सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांशी संबंधित एका प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय देशभर लागू होईल, असा निर्णय दिला.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एनव्ही अंजारिया यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यांनी सांगितले की, भटक्या श्वानांना पकडल्यानंतर त्यांची नसबंदी करावी आणि त्यांना निवारागृहात ठेवण्यात यावे.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तीन आठवड्यांच्या आत स्थिती अहवाल आणि प्रतिज्ञापत्र दाखल करावे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १३ जानेवारी रोजी होणार आहे. ◄(वृत्तसंस्था)





### आदेशातील ठळक मुद्दे

- **सर्व राष्ट्रीय महामार्गांवर भटक्या प्राण्यांची उपस्थिती कळविण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक असतील.**
- **दोन आठवड्यांच्या आत, राज्य सरकारे आणि राज्य अधिकारक्षेत्रे सरकारी आणि खाजगी शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालयांना कुंपण उभारावे.**
- **देखभालीसाठी एक नोडल अधिकारी नियुक्त केला जाईल. महानगरपालिका, नगरपालिका आणि पंचायतींनी दर तीन महिन्यांनी किमान एकदा या कॅम्पसची तपासणी करावी.**
- **पकडलेल्या भटक्या श्वानांना जिथून उचलले होते त्याच ठिकाणी परत सोडले जाणार नाही.**


## तकिया मशीद पाडकामावर शिक्कामोर्तब

### मुस्लिम पक्षाची याचिका फेटाळली

**◆ नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

उज्जैनमधील तकिया मशीद पाडण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करीत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी मुस्लिम पक्षाची याचिका फेटाळून लावली. मशिदीत नमाज पठन करणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी ही याचिका दाखल केली होती.

मध्य प्रदेश सरकारने महाकाल मंदिरासाठी पार्किंग क्षेत्र वाढवण्यासाठी तकिया मशीद पाडण्याचे आदेश प्रशासनाला दिले होते. या विरोधात मुस्लिम पक्षाने सुरुवातीला मध्य प्रदेश उच्च न्यायालयात धाव घेत निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. मात्र खंडपीठाने त्यांची मागणी फेटाळून लावली. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.



न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनासमोर झालेल्या सुनावणीत मुस्लिम पक्षाचे वकील एम. आर. शमशाद यांनी युक्तिवादात सांगितले की, ही मशीद २०० वर्षे जुनी असून, दुसऱ्या धार्मिक स्थळाच्या पार्किंगसाठी इतर धर्माचे प्रार्थनास्थळ हटविणे धार्मिक स्वातंत्र्याचे उल्लंघन असल्याचा युक्तिवाद केला. पण, न्यायालयाने तो फेटाळून लावला. ◄(वृत्तसंस्था)

## प्रतिज्ञापत्रात गुन्हा लपवता कामा नये

### निवडणूक उमेदवारांना कोर्टाची तंबी

**◆ नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

गुन्हेगारी शिक्षा असलेल्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला. न्यायालयाने म्हटले आहे की प्रत्येक उमेदवाराने नामांकन अर्जात मागील सर्व शिक्षा उघड केल्या पाहिजेत, मग तो गुन्हा किरकोळ असो किंवा उच्च न्यायालयाने नंतर शिक्षा रद्द केली असेल तरीही. यासंदर्भातील कोणतीही माहिती दडवल्यास प्रसंगी उमेदवाराचे नामांकन रद्द केली जाऊ शकते.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि ए. एस. चांदुरकर यांच्या न्यायासनाने म्हटले आहे की, माहिती उघड न करणे मतदाराच्या अधिकारांचे उल्लंघन आहे. यामुळे मतदाराला योग्य निवड करण्यापासून रोखले जाते. ते लपवल्याने नामांकन रद्द होऊ शकते.

मध्यप्रदेशातील भेकनगाव येथील नगरसेविका पूनम या नियमाला बळी पडल्या. तिच्यावर चेक बाऊन्सचा खटला सुरू होता (कलम १३८), ज्यासाठी ट्रायल कोर्टाने तिला एक वर्ष तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा सुनावली. तिने तिच्या नामांकनात ही वस्तुस्थिती लपवली. उच्च न्यायालयाने नंतर शिक्षा रद्द केली, परंतु पूनम यांनी दावा केला की शिक्षा रद्द करण्यात आली असल्याने ती उघड करण्याची आवश्यकता नाही. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळून लावली आणि रद्द केलेल्या शिक्षा देखील उघड करणे आवश्यक असल्याचे म्हटले. ◄(वृत्तसंस्था)

## भारताच्या दौऱ्यावर लवकरच जाणार : ट्रम्प

**◆ वॉशिंग्टन, ७ नोव्हेंबर**

भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे मोठ्या प्रमाणात बंद केले असून, पंतप्रधान मोदी यांच्यासोबत माझी सकारात्मक चर्चा सुरू आहे. मी लवकरच भारत दौऱ्यावर जाणार असून मोदी यांना भेटण्यासाठी उत्सुक असल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.



प्रसार माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, पंतप्रधान मोदी माझे घनिष्ठ मित्र असून त्यांच्याशी माझी सकारात्मक चर्चा सुरू आहे. आमचा नेहमीच दूरध्वनीवरून संवाद होतो. मोदी महान व्यक्तिमत्व असून, त्यांनी मला भारत भेटीचे निमंत्रण दिले आणि मी ते स्वीकारले आहे. मी लवकरच भारत भेटीवर जाणार आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारासंदर्भातील वाटाघाटी अजूनही सुरू आहेत. काही मुद्यांवर मतभेद असले तरी मला विश्वास आहे की, दोन्ही देशात लवकरच कराराचा अंतिम निर्णय होईल. व्यापार चर्चा गेल्या काही महिन्यांपासू सुरू आहे आणि भारताने आपली बाजारपेठा आणखी खुली करण्याचा विचार करावा असे मला वाटते. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे कमी केले आहे. ◄(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### खासदाराच्या खात्यातून ५६ लाख लंपास

**कोलकाता** : तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या जुन्या बँक खात्यातून जवळपास ५.६ दशलक्ष (अंदाजे ५.६ दशलक्ष) पैसे काढण्यात आले आहेत. बँक अधिकाऱ्यांनी कोलकाता पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी सांगितले की, फसवणूक करणाऱ्याने बॅनर्जी यांच्या खात्याचे केवायसी तपशील अपडेट करण्यासाठी खासदाराचे बनावट पॅन आणि आधार कार्ड वापरले. त्यानंतर घोटाळेबाजाने २८ ऑक्टोबर २०२५ रोजी खात्याशी जोडलेला नोंदणीकृत मोबाइल नंबर बदलला. यामुळे त्याला खात्यात पूर्ण प्रवेश मिळाला. एकदा क्रेडेन्शियल्स बदलल्यानंतर, फसवणूक करणाऱ्याने असंख्य अनधिकृत इंटरनेट बँकिंग व्यवहार केले आणि ५६,३९,७६७ काढले असा आरोप आहे.

### संपूर्ण जम्मू-काश्मीरवर भारताचा हक्क

**इस्लामाबाद** : पाकिस्तानी प्राध्यापक इश्तियाक अहमद यांचा असा युक्तिवाद आहे की जम्मू आणि काश्मीरवर भारताचा खरा हक्क आहे. त्यांनी सांगितले की फाळणीनंतर पाकिस्तानने जुनागढ राज्यावर दावा केला, जे भारताच्या सीमेपासून २५० किलोमीटर अंतरावर गुजरातमध्ये होते. त्यांनी दावा केला की जुनागढचे राज्यकर्ते मुस्लिम होते आणि त्यांना पाकिस्तानात सामील व्हायचे होते. म्हणून जुनागढ पाकिस्तानातच राहिले पाहिजे. ही पाकिस्तानची चूक होती. जुनागढची लोकसंख्या ९१ टक्के हिंदू होती आणि पाकिस्तान, शासकाच्या मुस्लिम ओळखीचा हवाला देऊन, तो प्रदेश जोडू इच्छित होता. जर हाच युक्तिवाद जम्मू, काश्मीरला लागू केला तर पाकिस्तानला कसा अधिकार असू शकतो? सध्याची परिस्थिती अशी आहे की पाकिस्तानच्या बाजारपेठा डबघाईला आल्या आहेत. जर भारताशी संबंध पूर्ववत झाले तर अर्थव्यवस्थेला फायदा होईल

### महसूल विभाग, पोलिस करीत आहेत पार्थला वाचवण्याचा प्रयत्न

**पुणे** : उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शुक्रवारी महाराष्ट्राचे महसूल आणि पोलिस विभाग पुणे जमीन व्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांना कारवाईपासून वाचवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केला आहे. पुण्यातील पार्थ पवार यांच्याशी संबंधित एका कंपनीचा ३०० कोटी रुपयांचा जमीन व्यवहार अनियमिततेचा आरोप आहे. यामुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. सरकारने एका उपनिबंधकाला निलंबित करून उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. या व्यवहारासंदर्भात तीन जणांविरुद्ध एफआयआर नोंदविण्यात आला आहे. नोंदणी प्रक्रियेत तेच कागदपत्र वापरले जात असूनही आणि चौकशी अहवालात जिल्हा उद्योग मंडळाच्या मुद्रांक शुल्कात सूट देण्याच्या ठरावावर पार्थ पवार यांच्या स्वाक्षरीचा उल्लेख असूनही, अधिकाऱ्यांनी त्यांचे नाव का टाळले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महसूल विभाग आणि पोलिस त्यांना कायदेशीर कारवाईपासून वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्यांनी केला आहे.

# पार्थ पवार : कथित जमीन घोटाळ्यातील व्यवहार रद्द

**सखोल चौकशी होणार : अजित पवार**

**◆ मुंबई, ७ नोव्हेंबर**

अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठे वादळ निर्माण झाल्यानंतर यासंदर्भातील जमीन व्यवहार रद्द करण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटी रुपये किमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. आता यावर अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेत अनेक खुलासे केले आहेत.

अजित पवार म्हणाले, गेल्या २-३ दिवसांपासून माध्यमांमध्ये जी काही चर्चा सुरू आहे, त्याची माहिती



घेऊन मी आपल्याशी बोलेल असे मी सांगितले होते. मी स्पष्टपणे सांगितले होते की माझ्या आतापर्यंतच्या राजकीय जीवनात मी कधीही नियम सोडून कुठले काम केले नाही. मागे माझ्यावर २००९-१० ला आरोप झाले होते, पण ते सिद्ध झाले नव्हते. तसेच या व्यवहारात सुद्धा मला अजिबात माहीत नव्हते. माहीत असते तर मी असे काही होऊ दिले नसते. मी कधीही जवळच्या, नातेवाइकांनी, माझ्या मुलांनी काही जरी व्यवसाय केला असेल तर मी त्यांना सांगत असतो की नियमात असेल ते काम करा.

**या प्रकरणात एक रुपयाही देण्यात आलेला नाही**

आता या प्रकरणावर सांगायचे झाले तर, या प्रकरणात एक रुपयाही देण्यात आलेला नाही. तरी मोठे मोठे आकडे सांगितले, मोठ्या गोष्टी सांगितल्या आणि विरोधकांनी देखील आम्हाला टार्गेट केले, ते त्यांचे काम आहे. मला आज संध्याकाळी समजले की, सर्व व्यवहार रद्द करण्यात आले. तसेच या राज्याचे ॲडिशनल चीफ सेक्रेटरी रेव्हेन्यू यांच्या अध्यक्षतेखाली काही विभागीय आयुक्त यांची समिती आज जाहीर करण्यात आली आहे. तसेच एक महिन्याच्या आत याबद्दलचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. ◄(वृत्तसंस्था)

### वस्तुस्थिती जनतेला कळणे महत्त्वाचे

अजित पवार म्हणाले, आता या प्रकरणाची मी संपूर्ण माहिती घेतल्यावर मुख्यमंत्र्यांशी फोनवर संवाद साधला. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, हा जरी माझ्या घरातला मुद्दा असला तरी तुम्ही राज्याचे प्रमुख आहात, तुम्हाला जे काही नियमाप्रमाणे करावे लागेल, चौकशी करावी लागेल, एसआयटी नेमायची असेल, त्याला माझा पाठिंबा असेल. आरोप करणे सोपे असते, परंतु वस्तुस्थिती जनतेला कळणे महत्त्वाचे आहे.

# धनंजय मुंडेंनी हत्येची सुपारी दिली

**● मनोज जरांगेंचा खळबळजनक आरोप ● अडीच कोटीत झाली डील**

**◆ बीड, ७ नोव्हेंबर**

माझ्या हत्येचा कट धनंजय मुंडे यांच्या सांगण्यावरूनच रचण्यात आला आणि त्यासाठी अडीच कोटींची डील झाल्याचा खळबळजनक आरोप मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारी केला.



जरांगे पत्रपरिषदेत म्हणाले, मुंडे यांनीच माझ्या हत्येचा कट रचला आणि हत्या करण्यासाठी तब्बल अडीच कोटी रुपयांची सुपारी ठरली होती, त्यापैकी ५० लाख रुपये देण्यात आले. बीडमधील कांचन नावाची व्यक्ती धनंजय मुंडेंचा कार्यकर्ता आहे. त्याने दोन आरोपींपैकी एकाला परळीला नेले होते. त्यानंतर भाऊबीजेच्या दिवशी झाल्टा फाटा येथे मुंडे यांनी या आरोपींची भेट घेतली. आम्ही त्याला ठोकतो असे आरोपींनी सांगितल्यावर, मुंडे यांनी मी जुनी गाडी देतो असे आश्वासन दिले. या घातपाताच्या कटाचे मूळ धनंजय मुंडे आहे. राजकारण आणि आरक्षण एकत्र करण्याची गरज नाही, असे म्हणत जरांगे यांनी धनंजय मुंडे यांना नार्को टेस्ट करण्याचे आव्हान दिले. पुढे जरांगे म्हणाले, मला मिळालेली माहिती मी पोलिसांना दिली. घातपाताच्या प्रकरणात आठ ते दहा जण असून त्यात मुंडे यांचा समावेश आहे. ◄(वृत्तसंस्था)

### नार्को टेस्ट, सीबीआय चौकशी करा : मुंडे

मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपाला पत्रपरिषदेतून प्रत्युत्तर देत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे म्हणाले, जरांगे आणि माझी ब्रेन मॅपिंग, नार्को टेस्ट करावी आणि हे प्रकरण सीबीआयकडे तपासासाठी द्यावे, अशी माझी मागणी आहे. माझ्यावर केलेले आरोप खोटे आहे, त्यात कुठलेही तथ्य नाही. मी पाच वर्षे विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. त्यावेळी मराठा आरक्षणासाठी सभागृह बंद पाडले. मी सभागृह चालू दिले नाही. बीड जिल्ह्यात ८० हजार कुणबी प्रमाणपत्र मी वाटले. जरांगे यांचे उपोषणही मी सोडले. आता वकिलांशी चर्चा करून पुढील कायदेशीर पाऊल उचलणार आहे. खालच्या पातळीचे आरोप मी सहन करणार नाही.



# पार्थ पवार दोषी असतील तर मुख्यमंत्री कारवाई करतीलच!

**पालकमंत्री गोरे : काँग्रेसचे दिलीप माने यांच्या भाजपा प्रवेशाबाबतही मांडली भूमिका**

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

मुंढवा जमीन खरेदी प्रकरणात अनियमितता, चुकीचे झाल्याचे निदर्शनास आल्यास पार्थ पवार यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करतील, अशी प्रतिक्रिया राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शुक्रवारी सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. दरम्यान, या प्रकरणाबाबत प्राथमिक कारवाई करण्यात आली असून, इतर काहीजणांवर गुन्हेही नोंद झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माजी आमदार दिलीप माने यांच्या भारतीय जनता पार्टीतील प्रवेशाबाबत आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले की, संघटना, पार्टी वाढवित असताना कोणाला वाईट वाटते, कोणाला चांगले वाटत असते. सध्या ऑपरेशन लोटस् जोरात चालू आहे. आगे-आगे देखो होता है क्या...यामुळे एकेक नवीन प्रवेश करून पक्ष मोठा करण्याचे पक्षश्रेष्ठींचे धोरण आहे. कोणाच्या विरोधामुळे कोणाचा पक्षप्रवेश थांबणार नाही...यामुळे माजी आमदार दिलीप माने यांचा योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल...पक्षश्रेष्ठींचा आदेश आल्यावर प्रवेश दिला जाईल.

# 'वंदे मातरम्' ही भारत मातेची पूजा : पंतप्रधान

## राष्ट्रीय स्फूर्तिगीताचा १५० वा वर्धापन सोहळा

**◆ नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

'वंदे मातरम्' हा एक मंत्र, एक स्वप्न, एक संकल्प, एक ऊर्जा आहे. हे गाणे भारत मातेची पूजा आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. स्वातंत्र्य संग्रामात स्फूर्तिगीताचा मान मिळविणाऱ्या 'वंदे मातरम्'ला शुक्रवारी १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित सभेला ते संबोधित करत होते.

'वंदे मातरम्'च्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त भारत सरकारने वर्षभर देशभरात स्मरणोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान मोदी म्हणाले की, आजचा दिवस खूप ऐतिहासिक आहे. वंदे मातरम् ही भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा होती. ती प्रत्येक युगात प्रासंगिक आहे. १९३७ मध्ये, वंदे मातरम्चा एक भाग काढून टाकण्यात आला. वंदे मातरम्च्या विभाजनाने देशाच्या फाळणीचे बीज पेरले. ती फूट पाडणारी विचारसरणी आजही देशासाठी एक आव्हान आहे. आज, मी देशातील लाखो महापुरुषांना, भारतमातेच्या सुपुत्रांना, ज्यांनी वंदे मातरम्साठी आपले जीवन समर्पित केले, त्यांना आदरपूर्वक आदरांजली वाहतो आणि देशवासीयांना माझे मनापासून अभिनंदन करतो.




वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त इंदिरा गांधी मैदानात आयोजित प्रदर्शनाची पाहणी करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

**गुलामगिरीच्या काळातील रचना**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर एकदा म्हणाले होते की, बंकिमचंद्रांचे आनंदमठ हे केवळ एक कादंबरी नाही, तर ते स्वतंत्र भारताचे स्वप्न आहे. 'आनंदमठ'मधील वंदे मातरम्चा संदर्भ, त्याची प्रत्येक ओळ, बंकिमबाबूंचे प्रत्येक शब्द आणि प्रत्येक भावना, या सर्वांचा खोलवर अर्थ होता आणि अजूनही आहे. हे गाणे गुलामगिरीच्या काळात रचले गेले होते, परंतु त्याचे शब्द कधीही गुलामगिरीच्या सावलीत मर्यादित नव्हते. ते गुलामगिरीच्या आठवणींपासून कायमचे मुक्त राहिले.

वंदे मातरम्च्या मूळ मजकुरात म्हटले आहे की, भारतमाता सरस्वती, लक्ष्मी आणि दुर्गा आहे. जेव्हा शत्रूने दहशतवादाद्वारे भारताच्या सुरक्षिततेवर आणि सन्मानावर हल्ला करण्याचे धाडस केले, तेव्हा संपूर्ण जगाने पाहिले की नवीन भारताला दहशतवादाचा नाश करण्यासाठी दुर्गा कसे व्हायचे हे देखील माहीत आहे. ◄(वृत्तसंस्था)

### विशेष टपाल तिकीट, नाण्याचे प्रकाशन

**राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधानांनी एक विशेष टपाल तिकीट आणि एक नाणे प्रकाशित केले. त्यांनी वर्षभर चालणाऱ्या स्मारकाचे उद्घाटन केले आणि एका संकेतस्थळाचेही लोकार्पण केले. विशेष म्हणजे, स्वतः पंतप्रधानांनी 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनात भाग घेतला.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# राजकीय पक्षप्रमुखांची विभागीय आयुक्तांनी घेतली बैठक

## ६ नोव्हेंबरपर्यंत झालेल्या नाव नोंदणीची दिली माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत ६ नोव्हेंबरपर्यंत झालेल्या नाव नोंदणीची माहिती देण्यासाठी विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांसोबत बैठक घेण्यात आली. मतदार नोंदणी अधिकाधिक व्हावी यासाठी सर्व जिल्हाधिकारी तसेच राजकीय पक्षांनी प्रयत्न करावेत, असे डॉ. पुलकुंडवार म्हणाले.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या या बैठकीस अपर आयुक्त तुषार ठोंबरे, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मीनल कळसकर, राजकीय पक्षांचे जिल्ह्यातील प्रमुख, प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर जिल्हाधिकारी, राजकीय पक्ष प्रमुख व प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम निवडणूकीपूर्वी एक वर्ष आधी सुरु करण्यात आला आहे. पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत पुणे विभागातील ५८ तालुक्यांमध्ये ५६४ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत नमुना क्रमांक १८ किंवा १९ द्वारे दावे स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक ६ नोव्हेंबरपर्यंत मागील निवडणुकीपेक्षा मतदार नोंदणी कमी प्रमाणात झाली आहे.

या कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार याद्यांची मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी प्रसिद्धी, २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील.

या कालावधीतही मतदार नोंदणी करता येणार असल्याने प्रत्येक मतदाराने जागरुकतेने नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी राजकीय पक्षांनी मतदारांमध्ये जागृती करावी. २५ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती निकाली करण्यासह पुरवणी यादी तयार करणे व छपाई करण्यात येणार आहे. तसेच अंतिम मतदार यादी मंगळवार ३० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतरही निवडणूक जाहीर होईपर्यंत मतदार यादीत नाव नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे अधिकाधिक पात्र मतदारांची नाव नोंदणी व्हावी यासाठी प्रयत्न व्हावेत. मतदार नाव नोंदणीच्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यातील राजकीय पक्षांनी त्यांच्या सूचना संकलित करुन सादर कराव्यात. त्या सूचना भारत निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येतील, असेही डॉ. पुलकुंडवार म्हणाले. यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी विविध सूचना केल्या.

## मनीषा मुसळे-माने हिच्या दोषमुक्ती अर्जावर २१ नोव्हेंबर रोजी होणार युक्तिवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरणात संशयित आरोपी मनिषा मुसळे-माने हिने खटल्यातून दोषमुक्त होण्यासाठी दाखल केलेल्या अर्जावर सरकार पक्षाने आक्षेप घेतला आहे. या दोषमुक्तीच्या अर्जावर युक्तिवाद करण्यासाठी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी दि.२१ नोव्हेंबर पुढील तारीख दिली आहे. त्यामुळे याप्रकरणी सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, मनीषा मुसळे-माने हिचेमार्फत डॉक्टर शिरीष वळसंगकर, फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे घटनेपूर्वी ५ महिन्याचे सीडीआर व टॉवर लोकेशन न्यायालयात सादर करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. या अर्जावर सरकार पक्षाने म्हणणे दाखल केले आहे, त्याबरोबर तपास अधिकाऱ्याचे म्हणणे देखील सादर करण्यात आले आहे. सरकार पक्षाच्या म्हणण्यानुसार. तपास अधिकारी यांनी अर्जात नमूद सर्व साक्षीदारांचे सीडीआर व एसडीआर मिळवण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. सदर सीडीआर व एसडीआर प्राप्त होताच ते न्यायालयात सादर करण्यास तयार आहेत. असे म्हणणे मांडून सदर अर्जास देखील तीव्र हरकत घेतली असून अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

मनीषा मुसळे-माने हीचा मोबाईल तपासावेळी पोलिसांनी जप्त केला होता. तो मिळण्यासाठी मनीषा हिने दाखल केलेल्या अर्जावर आज रोजी सरकार पक्षाने म्हणणे दाखल केले असून मनीषा मुसळे माने हिस तिचा मोबाईल देण्यास सरकार पक्षाने हरकत घेतलेली आहे.

या तीनही अर्जावर दि.२१ नोव्हेंबर ही तारीख नेमण्यात आलेली आहे. यात मनीषा मुसळे माने हिचे तर्फे ॲड प्रशांत नवगिरे तर सरकारतर्फे प्रदीप सिंग राजपूत हे काम पाहत आहेत.

## महापालिकेच्या सेवासंदर्भात आता ऑनलाईन अपील करण्याची सोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या www.sola{urcor{oration.gov.in या अधिकृत वेबसाईटवर नागरिकांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २००५ अन्वये अधिसूचित केलेल्या सेवां बाबत ऑनलाइन अपिल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे नागरिकांना पारदर्शक, सुलभ व जलद सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

महानगरपालिकेकडून अधिसूचित केलेल्या सेवांचा निर्णय निर्धारित वेळेत न मिळाल्यास अथवा प्राप्त सेवेसंदर्भात तक्रार असल्यास संबंधित सेवांचे अपिल आता नागरिकांना ऑनलाईन करता येणार आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या होम पेजवरील 'नागरिक' या मेनूमधील 'प्रथम सेवा अपिल' व 'द्वितीय सेवा अपिल' या पर्यायांखाली ही सुविधा उपलब्ध आहे. अपिल करताना नागरिकांनी संबंधित सेवेचे नाव निवडून, त्याबाबत ऑनलाईन अर्जाचा क्रमांक प्रविष्ट करावा. ओटीपी द्वारे खात्रीकरणानंतर अपिलासंबंधी आवश्यक कागदपत्रांची एकच पीडीएफ फाइल अपलोड करावी.अपिल सादर झाल्यानंतर अर्ज क्रमांक एसएमएस द्वारे नागरिकांना कळिवण्यात येईल. अपिलाच्या सुनावणीची वेळ व निकालाची माहिती देखील एसएम एसद्वारे पाठविली जाईल.सुनावणीचा निर्णय नागरिकांना वेबसाईटवरून थेट ऑनलाईन डाउनलोड करता येणार आहे. तसेच, सोलापूर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर नागरिकांसाठी आणखी एक महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महानगरपालिकेकडून सध्या एकूण १४४ सेवा ऑनलाईन स्वरुपात दिल्या जात असून, या सर्व सेवांचा आढावा घेण्यासाठी 'सेवा डॅशबोर्ड' तयार करण्यात आला आहे. या डॅशबोर्डवर विभागनिहाय खालील माहिती एकाच ठिकाणी पाहता येईल. प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, निकाली काढलेल्या अर्जांची संख्या, तसेच कर्मचारीनिहाय प्रलंबित अर्जांची माहिती या ठिकाणी उपलब्ध आहे. डॅशबोर्डवरील 'वापरकर्त्यासाठी सूचना' या विभागात उपलब्ध माहितीसंदर्भात सविस्तर म ार्गदर्शन दिलेले आहे.या नव्या डिजिटल सुविधेमुळे सोलापूर महानगरपालिका अधिक पारदर्शक, जबाबदार व जनसुलभ प्रशासनाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकत असल्याचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

## ए.जी. पाटील महाविद्यालयात आविष्कार अंतर्गत विविध प्रकल्पांचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

सोलापूर येथील स्वायत्त ए.जी. पाटील अभियांत्रिकी म हाविद्यालयात अविष्कार २०२५-२६ या संशोधना आधारित पोस्टर व प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले होते. यात विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी आपले नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पना सादर केल्या. विविध सहा विभागातून जवळजवळ ५० पेक्षा जास्त प्रकल्प व त्याचे सादरीकरण झाले.




ह्युमॅनिटी लैंग्वेज अँड फाईन आर्ट्स यामधून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक प्रथमेश रामपोगु व नागेश कोंडाबत्तीन, कॉमर्स मॅनेजमेंट आणि लॉ या प्रकारांम ध्ये शोएब इनामदार व मोहम्मद अरीवाले तसेच प्युअर सायन्स आर्यन मस्के व जय माशाळ एग्रीकल्चर अँड ॲनिमल हजबंड्री पारस राजगिरी व समीक्षा कुलकर्णी इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी वैष्णवी गोनसग व तनिष्क माने आणि मेडिसिन आणि फार्मसी या विभागात समर्थ हक्क व अंजली माने या विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न करून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेचे आयोजन व संचालन प्रा. आर.डी. मैत्री, प्रा. एस.जे. लिगाडे, प्रा. एस.एन. उपाध्ये, प्रा. एस.के. कोनापूरे व प्रा. रेणुका होर्तीकर यांनी केले. या प्रसंगी मेकॅनिकल इंजिनिअरींगचे विभाग प्रमुख डॉ. एस. बी. गदवाल, कॉम्प्युटर विभागप्रम ुख प्रा. एस.व्ही. कुलकर्णी, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. टी. डी. मसलेकर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजीनियरिंग विभाप्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर व प्राध्यापक वृंद यांची उपस्थिती होती. आविष्कार-२०२५-२६ या स्पर्धेचे समन्वयक प्रा. श्रीशैल बिराजदार यांनी सर्वांचे स्वागत केले. स्पर्धेच्या परीक्षणासाठी डॉ. एस. बी. गदवाल, डॉ. आर. व्ही. दरेकर, प्रा. एस.व्ही. कुलकर्णी, डॉ. एस. आर. साखरे, प्रा. ए.एस. लिगाडे, प्रा. आर. बी. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम.ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री एस.ए. पाटील, ट्रस्टी शिवानंद पाटील यांनी अभिनंदन केले.



## डॉ.ओमप्रकाश शेटे यांची सिध्देश्वर शिक्षण मंडळास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या आयुष्म ान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी नुकतीच येथील श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळास सदिच्छा भेट दिली.

भेटी दरम्यान त्यांनी संस्थेमार्फत चालवण्यात येणाऱ्या विभागाची माहिती घेतली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात जागतिक स्तरावर वास्तुशास्त्र क्षेत्राला अनन्य साधारण महत्व असल्याचे नमूद करून त्याविषयी तंत्रज्ञानात होत असलेल्या नवनवीन बदलांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. संस्थेच्या वाटचालीबद्दल समाधान व्यक्त केले व आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील परस्पर सहकार्याद्वारे शिक्षक व समाजहितासाठी नव्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची शक्यता व्यक्त केली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस. आर. पाटील यांच्या हस्ते डॉ. शेटे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सचिव डॉ. शशिकांत हलकुडे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती सादर केली. सहसचिव असिम सिंदगी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त, संस्थेतील सर्व विभागांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शहरातील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते.

## विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडविण्यासाठी 'वंदे मातरम्'चा संकल्प करूया : मुख्यमंत्री

### मंत्रालयात सामूहिक 'वंदे मातरम् गीताचे गायन

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ७ नोव्हेंबर-**

जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंत्र्यलढ्यात सर्वांनी 'वंदे मातरम्' म्हटले होते. वंदे मातरम् हा स्वातंत्र्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनाने संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामूहिक 'वंदे मातरम्' गीत गायनप्रसंगी केले.

वंदे मातरम् गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मंत्रालयात कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाचा कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर आदी उपस्थित होते.

फेणानी-जोगळेकर यांच्यासोबत सर्वांनी एकत्र वंदे मातरमचे गायन करत राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर देशाला जोडणारी, एकसंध ठेवणारी भावना आहे. कोलकाताच्या टाउन हॉलमध्ये ३० हजारपेक्षा अधिक जनता जमली होती.



त्याठिकाणी पहिल्यांदा वंदे मातरमची पहिली घोषणा झाली. त्याला प्रतिसाद देत ३० हजार लोकांनी सामूहिक वंदे मातरमचा जयघोष केला. त्यानंतर वंग-भंग चळवळीच्यावेळी प्रेरणा गीत, संघर्ष गीत झाले. त्या दिवसापासून सगळीकडे, इंग्रजांच्याविरुद्ध 'वंदे मातरम्' म्हणत लढा सुरू झाला. प्रभात फेऱ्या, कार्यक्रमांमध्ये, आंदोलनामध्ये हल्ला केला तरी 'वंदे मातरम्' गायिले जात होते. काँग्रेसच्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोरांनी वंदे मातरम् गायिले. यानंतर जात, धर्म, पंथ सगळे विभाजन विसरून संपूर्ण भारतीय समाज एकत्र येऊन वंदे मातरम् चे घोषवाक्य तयार झाले. तेव्हापासून हे एक प्रकारे राष्ट्रगीत म्हणून 'वंदे मातरम्' तयार झाले.

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी फाशीवर जातानाही 'वंदे मातरम्' म्हणायचे. अहिंसेतून आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करायचं आहे, असे म्हणणाऱ्या नेत्यांचे 'वंदे म ातरम्' घोषवाक्य झाले. स्वातंत्र्याच्या परवलीचा शब्द तयार झाला. स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोलाचे योगदान वंदे मातरम् ने दिले. स्वतंत्र भारताचा झेंडा तयार करतानाही त्यावर वंदे मातरम् लिहिण्यात आले. म हात्मा गांधी आपल्या प्रत्येक पत्राचा समारोप हा वंदे मातरम् ने करीत. भारताच्या संविधानाच्या निर्मितीनंतर जन गण मन आणि वंदे मातरम् या दोन्ही गीतांना राष्ट्रगीताचा दर्जा देऊन समान सन्मान दिला, असे सांगून ते म्हणाले की.

प्रधानमंत्री मोदी यांचे एक विकसित भारताचे स्वप्न आहे. भारतामध्ये 'विकास भी और विरासत भी', अशा प्रकारची भावना त्यांनी मांडली आहे. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत, नालंदा आणि तक्षशिलासारख्या विश्वविद्यालयाच्या माध्यमातून जगाला ज्ञान देणारा भारत, भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान संपूर्ण विश्वात नेणारा भारत घडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले. वंदे मातरम् गीताचे संपूर्ण देशभर गायन होत आहे. यावेळी पूर्वा निर्मिती विश्वतर्फे 'वंदे मातरम्'वर पथनाट्य सादर करण्यात आले. सर्व धर्म, भाषांमधून विविध पोषाखात हातात वंदे मातरम् लिहिलेले फलक घेतलेले युवक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमानंतर दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे 'वंदे मातरम्'चे सामुहिक गायन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन झाले.

## महत्त्वाचे...



### अंजली भोंग हिचे निबंध स्पर्धेत यश

**बार्शी दि. ७ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत तालुका पंचायत समिती बार्शीच्यावतीने नागनाथ हायस्कूल घारी येथे संपन्न झालेल्या तालुका स्तरीय निबंध स्पर्धेत लहान गटात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो) शाळेची विद्यार्थीनी अंजली भोंग हिने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तिची जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरीय स्पर्धा येत्या ११ तारखेला पंढरपूर येथे होणार आहे. तिला वर्गशिक्षिका श्रीमती दिपाली गोरे यांचेसह मुख्याध्यापक अनिल काळे, प्रभाकर काटे, आनंद घाडगे, रामचंद्र बरचे, हरिभाऊ दळवी, श्रीमती वैशाली खुने,श्रीमती बेबीनंदा खडबडे, श्रीमती सुवर्णगौरी गवळी, श्रीमती मीरा गरड यांचे मार्गदर्शन लाभले.

### नगरपालिका निवडणुकीत दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या भूमिकेकडे लक्ष

**सांगोला, दि.७ नोव्हेंबर -**



गतवेळी पार पडलेल्या सांगोला नगरपरिषद निवडणुकीत सांगोला शहरातील सर्वात मोठा पक्ष किंवा गट म्हणून दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या गटाला यश मिळाले होते. त्यांच्या विचारांचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे दिपकआबा साळुंखे पाटील आघाडीबाबत कोणती भूमिका घेतात यावर नगरपालिका निवडणुकीची समीकरणे अवलंबून असणार आहेत. त्यामुळे दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या भूमिकेकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. सांगोला शहर आणि परिसरातील अनेक वर्षे सोबत काम करणारे ज्येष्ठ सहकारी, नगरपालिका निवडणुक लढवण्यासाठी इच्छुक उमेदवार आणि महत्त्वाच्या कार्यकर्त्यांशी चर्चा आणि विचार विनिमय करून नगरपालिका निवडणुकीबाबत पुढील दिशा ठरवणार तसेच युती आणि आघाडी बाबतचा निर्णय घेणार असे प्रतिपादन माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केले. सांगोला शहर व परिसरातील प्रभागनिहाय इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांच्याशी चर्चा करू आणि कार्यकर्ते ज्या पद्धतीने निर्णय घेतील त्याप्रमाणे त्यांच्या भावनेचा आदर करूनच सांगोला नगरपालिका निवडणुकीत कोणत्या पक्षासोबत किंवा नेत्यासोबत युती आघाडी करायची याचा निर्णय घेऊ असे श्री. साळुंखे-पाटील यांनी सांगितले.

### दारुच्या नशेत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**बार्शी, दि.७ नोव्हेंबर -**

बार्शी शहरातील मांगडे चाळ येथे २२ वर्षीय तरुणाने दारुच्या नशेत घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवार दि. ६ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. याची नोंद बार्शी शहर पोलीस ठाण्यात झाली. अक्षय पुट्टे (वय २२) असे मृत तरुणाचे नाव आहे. मृत हा दारुच्या नशेत असताना बार्शी येथील राहत्या घरातील लोखंडी पाईपला साडीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर तात्काळ घटना पोलिसांना कळविण्यात आली. बार्शी शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करुन, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.




### वंदे मातरम् गीताचा प्रचार व प्रसार करण्याची प्रत्येकाची जबाबदारी

**मुंबई, दि. ७ नोव्हेंबर:**

देशभक्ती जागृत करणाऱ्या 'वंदे मातरम्' गीताचा प्रत्येकाने गौरव करायला हवा. 'वंदे मातरम्' कडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघणाऱ्यांकडे दुर्लक्ष करत या गीताचा प्रचार आणि प्रसार करण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी केले. राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्ष पूर्तीनिमत्त प्रदेश भारतीय जनता पार्टीतर्फे प्रदेश कार्यालयात 'वंदे मातरम्' च्या सन्मानार्थ विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात संपूर्ण 'वंदे मातरम्' चे समूह गायन झाले. तसेच स्वदेशी वस्तू वापराचा संकल्प सोडण्यात आला. या कार्यक्रम ाला आ. राजेश वानखेडे, आ. प्रवीण पोटे पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, ज्येष्ठ नेते सुनील कर्जतकर, माजी आ. सुरेश हळवणकर, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, कार्यालय सह प्रभारी सुमंत घैसास, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, ओमप्रकाश चौहान, कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभर 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सार्ध शताब्दी महोत्सव साजरा होत आहे. 'वंदे मातरम्' या गीताने स्वातंत्र्यलढ्यात देशभक्ती आणि एकतेची भावना जागृत केली. देशप्रेमाचे प्रतीक असलेले 'वंदे मातरम्' हे गीत १५० वर्षांपासून लोकांच्या मनात देशाबद्दल जाज्वल्य अभिमान आणि भारतीयांना स्फूर्ती देत आहे. या गीताचा सन्मान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. नव्या पिढीपर्यंत हे गीत सन्मानाने पोहोचले पाहिजे, असे सांगितले

### श्रावणी वाघमारे तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेत प्रथम

**सांगोला, दि. ७ नोव्हेंबर:**



तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेत जि.प.प्रा. शाळा, वझरे ता.सांगोला येथील विद्यार्थिनी श्रावणी महेश वाघमारे हिने प्रथम क्रमांक मिळवला असून तिची जिल्हास्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, केंद्रप्रमुख मल्लय्या मठपती, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, सरपंच, मुख्याध्यापिका लता पाटील, शिक्षक खंडू गाडेकर, शिक्षिका मेघाराणी गुरव, ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/






(१) वंदे मातरम् राष्ट्रगीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त देशभरात स्मरणोत्सव साजरा होत आहे. त्रिपुराची राजधानी आगरतळा येथे कलाकारांनी वंदे मातरम् गीत सादर केले. (२) विशेष टपाल तिकीट, नाण्याचे प्रकाशन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी. (३) काश्मिरातील अनंतनाग येथे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थिनी. (४) पाटणा येथील कार्यक्रमात उपस्थित केंद्रीय गृहमंत्री अमित शाह.

# योग्यवेळी करू अणुचाचणी

## भारत कुणाचाही दबाव खपवून घेणार नाही : राजनाथसिंह

**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

कोणताही देश राष्ट्रीय सुरक्षा किंवा अणुचाचण्यांच्या संदर्भात भारतावर दबाव आणू शकत नाही आणि आम्ही कुणाचाही दबाव खपवून घेणार नाही. भारत योग्यवेळी अण्वस्त्र चाचणी घेणार असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एका कार्यक्रमात सांगितले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अणुचाचण्यासंदर्भातील टिप्पणीवर एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना सिंह म्हणाले, भारत अमेरिका, चीन, पाकिस्तान किंवा इतर कोणत्याही देशाच्या दबावाला बळी पडणार नाही. भारत सरकार परकीय दबावाखाली नाही तर आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांवर आधारित निर्णय घेईल. भारत काय करेल हे भविष्य सांगेल. अमेरिका किंवा पाकिस्तान जे करत आहे त्यामुळे भारतावर दबाव येणार नाही. ते जे काही करायचे ते करू शकतात, आम्हाला जे योग्य वाटेल ते आम्ही योग्य वेळी करू, कुणाच्याही दबावामुळे भारत अण्वस्त्र चाचणी करणार नाही. पाकिस्तानविरोधातील संघर्ष आम्ही कुणाच्याही दबावात थांबविला नाही. आम्हाला पाकिस्तानच्या डीजीएमओकडून युद्धबंदीसाठी वारंवार फोन आले. ते फोन कॉल मिळाल्यानंतर आणि आम्हाला जे उद्दिष्टे साध्य करायची होती ती साध्य केल्यानंतरच आम्ही संघर्ष थांबविण्याची घोषणा केली.

बांगलादेशचे अंतरिम सरकारचे सल्लागार मोहम्मद युनूस यांना इशारा देताना संरक्षणमंत्री म्हणाले, भारत कोणत्याही आव्हानाला तोंड देण्यास सक्षम आहे. परंतु आम्हाला बांगलादेशसोबत चांगले संबंध ठेवायचे आहे. युनूस यांनी भारतासंदर्भात काळजीपूर्वक टिप्पणी करावी. भारताला कमकुवत समजण्याची चूक कोणीही करू नये आणि आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये.

# ‘चिकन नेक’जवळ भारताने उभारल्या तीन नव्या चौक्या

### शत्रूची प्रत्येक चाल होणार निष्फळ







**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

गेल्या काही काळापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर बदलत असलेली राजकीय हितसंबंधांची समिकरणं तसेच पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये झालेली जवळीक यामुळे भारतासाठी आपल्या ईशान्य भागातील सुरक्षेवर अधिक लक्ष ठेवणं आवश्यक बनलं आहे. त्यातही देशाच्या इतर भागाला ईशान्य भारताशी जोडणाऱ्या आणि चिकन नेक अशी ओळख असलेल्या सिलिगुडी कॉरिडॉरच्या सुरक्षेसाठी भारतीय लष्कराने या भागात तीन नव्या चौक्या उभ्या केल्या आहेत.

बांगलादेश आणि चीनची या भूभागावर वाकडी नजर आहे. सिलिगुडी कॉरिडोरला लागून असलेल्या या निमुळत्या पट्टीची लांबी ६० किलोमीटर असून रुंदी ही काही ठिकाणी २२ किलोमीटर एवढी आहे. या ‘चिकन नेक’ला लागूनच बांगलादेश, भूतान, नेपाळ आणि चीनच्या सीमा आहेत. सामरिकदृष्ट्या ही चिंचोळी पट्टी अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील असल्याने बांगलादेशचा या भूभागावर डोळा आहे. बांगलादेशी घुसखोर याच भागातून भारतात अवैधपणे शिरतात. याला आळा घालण्यासाठी या तीन चौक्या ह्या बमुनी, किशनगंज आणि चोपडा येथे उभ्या करण्यात आल्या आहेत. या चौक्या उभारण्याचा हेतू सीमेवर कमकुवत सुरक्षा व्यवस्था असलेल्या भागात सुरक्षा वाढवणे, गस्त वाढवणे आणि सिलिगुडी कॉरिडॉरचं रक्षण करणे हा आहे.

सिलिगुडी कॉरिडॉरला चिकन नेक म्हणून ओळखलं जातं. हा अरुंद पट्टा भारताच्या इतर भागाला ईशान्य भागातील राज्यांशी जोडतो. त्यामुळे सिलिगुडी कॉरिडॉर अत्यंत संवेदनशील असून, हा भाग बंद झाल्यास भारताचा ईशान्य भारताशी असलेला संपर्क तुटू शकतो. शेख हसीना यांच्या राजवटीत चितगाव बंदरातून त्रिपुराशी थेट संपर्क स्थापन करण्यास मंजुरी दिली होती. यासाठी फेनी नदीवर पूलही बांधण्यात आला ज्याला मैत्री पूल असे नाव देण्यात आले. दरम्यान, बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी पाकिस्तानी जनरल साहिर शमशाद मिर्झा यांची भेट घेऊन चर्चा केली. यामध्ये कनेक्टिव्हिटी आणि संरक्षण संबंधांबाबत चर्चा केली होती. मोहम्मद युनूस यांनी शेख हसिना सत्तेतून पायउतार झाल्यानंतर चीनला गुंतवणुकीचा प्रस्ताव दिला होता. तसेच पाकिस्तानसोबतचे संबंध सुधारण्याबाबत विचारविनिमय केला होता. (वृत्तसंस्था)

**ब्रह्मोस क्षेपणास्त्रे तैनात**

**सामरिकदृष्ट्या हा भाग भारतासाठी हा भाग अत्यंत महत्त्वाचा असल्याने आणि इशान्य भागातील राज्यांशी जोडणारा मार्ग असल्याने शत्रूने कुठलीही आगळीक करू नये, म्हणून ‘चिकन नेक’ मध्ये भारताने ब्रह्मोस क्षेपणास्त्रे आणि हवाई संरक्षण प्रणाली तैनात केली आहे. त्यामुळे कोणत्याही देशाला चुकीचे पाऊल उचलण्यापूर्वी दहावेळा विचार करावा लागणार आहे.**

# धर्मांतर कायद्यांविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांना आव्हान

### हिंदू संघटनेची सर्वोच्च न्यायालयात धाव

**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

अखिल भारतीय संत समिती या हिंदू संघटनेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि बेकायदेशीर तसेच जबरदस्तीने धर्मांतर करण्यावर बंदी घालण्यासाठी अनेक राज्यांमध्ये लागू केलेल्या कायद्यांविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांमध्ये हस्तक्षेप करण्याची विनंती केली.

अधिवक्ता अतुलेश कुमार यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत उत्तराखंड धर्म स्वातंत्र्य कायदा २०१८, उत्तरप्रदेश बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर प्रतिबंध कायदा २०२१, हिमाचल प्रदेश धर्म स्वातंत्र्य कायदा २०१९ आणि मध्य प्रदेश धर्म स्वातंत्र्य कायदा २०२१ यासह अनेक राज्यांमध्ये लागू केलेल्या कायद्यांविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांना आव्हान देण्यात आले आहे. सप्टेंबरमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने वरील कायद्यांना आव्हान देणाऱ्या विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या याचिका स्वतःकडे हस्तांतरित केल्या. अखिल भारतीय संत समितीने या प्रकरणात पक्षकार बनवण्याची आणि न्यायालयात लेखी युक्तिवाद सादर करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

संघटनेचा असा युक्तिवाद आहे की धर्माचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य एखाद्या व्यक्तीला जबरदस्तीने धर्मांतर करण्याचा अधिकार देत नाही आणि कायदा स्वतंत्र विचारसरणीवर आधारित स्वेच्छेने धर्मांतर करण्यास मनाई करत नाही.

**अनुसूचित जातीच्या दर्जाची चौकशी करणाऱ्या आयोगाची मुदत वाढवली**

राष्ट्रपतींच्या आदेशानुसार अनुसूचित जातीच्या श्रेणीत न येणाऱ्या धर्मात धर्मांतर करणाऱ्या परंतु अनुसूचित जातीच्या श्रेणीत न येणाऱ्या व्यक्तींना अनुसूचित जातीचा दर्जा द्यावा की नाही, याची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या चौकशी आयोगाचा कार्यकाळ केंद्राने सहा महिन्यांनी वाढवला आहे. नुकत्याच जारी केलेल्या राजपत्रातील अधिसूचनेनुसार, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या या मुदतवाढीमुळे आयोगाला १० एप्रिल २०२६ पर्यंत आपले काम सुरू ठेवता येईल. हिंदू, शीख आणि बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर धर्मात धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीमध्ये अनुसूचित जातीच्या ओळखीच्या दाव्यांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने ६ ऑक्टोबर २०२२ रोजी चौकशी आयोग कायदा, १९५२ अंतर्गत आयोगाची स्थापना करण्यात आली.

कमिशनला सुरुवातीला १० ऑक्टोबर २०२४ पर्यंत आपला अहवाल सादर करायचा होता, परंतु अधिक वेळ मागितल्यानंतर कार्यकाळ १० ऑक्टोबर २०२५ पर्यंत करण्यात आला. (वृत्तसंस्था)

## बांगलादेशात जाणार नाही भारताचा कांदा

**ढाका, ७ नोव्हेंबर**

भारताने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. यापुढे बांगलादेशात कांदा जाणार नाही. परिणामी कांद्याचे भाव आकाशाला भिडले आहेत. अवघ्या काही दिवसांत दर दुप्पट झाले आहेत. सामान्य नागरिकांच्या स्वयंपाकघरातील अर्थसंकल्पाचे गणित पूर्णपणे बिघडले आहे.

राजधानी ढाका, चितगाव, राजशाही आणि खुलना यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये कांद्याचे दर ११० ते १२० टका प्रति किलोपर्यंत पोहोचले आहेत. काही दिवसांपूर्वी हेच दर ६० टका प्रति किलो होते. घाऊक बाजारातही कांद्याच्या दरात मोठी वाढ झाल्याने ग्राहकांकडून अधिक किंमत आकारावी लागत आहे, असे किरकोळ विक्रेत्यांचे म्हणणे आहे. देशातील स्थानिक कांदा साठा संपत आला आहे आणि भारताकडून होणारी आयात अचानक थांबल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. भारत सरकारने देशांतर्गत दर नियंत्रित ठेवण्यासाठी कांद्याच्या निर्यातीवर बंदी केली; मात्र त्याचा थेट परिणाम बांगलादेशातील बाजारपेठांवर झाला. भारतातून पुरवठा पुन्हा सुरू होईपर्यंत किंवा देशांतर्गत नवीन पीक बाजारात येईपर्यंत दर अजून वाढू शकतात. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रातील शेतकरी गुंतवणूक करण्यास घाबरत नाहीत : डॉ. तंवर

नामदेव भदे

**जोधपूर, ७ नोव्हेंबर**

ऐतिहासिकदृष्ट्या राजस्थान आणि महाराष्ट्र यांच्यात साम्य असून यांचा एकमेकांशी दृढ संबंध आहे. सध्या महाराष्ट्रात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या यावर चिंता व्यक्त करताना राजस्थानमध्ये हे दृश्य दिसत नसल्याचे आयसीएआर-सेंट्रल ॲरिड झोन रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक तसेच विद्यापीठाचे मुख्य वैज्ञानिक डॉक्टर सुरेशपाल सिंग तंवर यांनी सांगितले.

ते म्हणाले, राजस्थानच्या कोरड्या जमिनीत फक्त २०० मिमी ते ६०० मिमी पाऊस पडतो; परंतु या प्रदेशातील लोकांना पाण्याचे मोल समजते आणि म्हणूनच त्यांनी विविध रेनवॉटर हार्वेस्टिंग तंत्रे विकसित केली आहेत. महाराष्ट्रासारख्या राज्यात परिस्थिती वेगळी आहे, जिथे पुरेसा पाऊस पडतो; परंतु तरीही या प्रदेशातून पिके न मिळाल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची प्रकरणे नोंदवली जातात.



**पीक उत्पादनात विविधता**

राजस्थानला पावसाच्या पाण्याचे संचयन करण्याच्या अनेक पद्धती शिकवल्याचे श्रेय महाराष्ट्राला देतात. ते म्हणाले की, पावसाच्या पाण्याचे संचयन महाराष्ट्रात सुरू झाले; परंतु नंतर राजस्थानने त्याचे अनुकरण केले. पिकांच्या अपयशामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा धोका कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक उत्पादनात विविधता आणणे त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे, राजस्थानमध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत खूपच कमी पाऊस, आव्हानात्मक वातावरण असले तरी, शेतीच्या कारणांमुळे या प्रदेशातील एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केलेली नाही, असे डॉ. एस. पी. एस. तन्वर यांनी पीआयबीच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून सुविधेला भेट देणाऱ्या पत्रकारांना यावेळी सांगितले.

महाराष्ट्रातील शेतकरी जोखीम पत्करतात आणि शेतीत मोठी गुंतवणूक करतात आणि भरपूर उत्पादन मिळवण्याचा अंदाज लावतात, तर राजस्थानातील शेतकरी त्यांच्या मर्यादेत काम करतात. हे शेतकरी जोखीम पत्करत नाहीत, असे ते म्हणाले.

# वैमानिकाची कोणतीही चूक नाही

### सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्र, डीजीसीएला नोटीस

**नवी दिल्ली, ७ नोव्हेंबर**

एअर इंडिया बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनरचे पायलट-इन-कमांड दिवंगत कॅप्टन सुमित सभरवाल यांच्या वडिलांना शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, देशातील कोणीही ही पायलटची चूक मानत नाही. ९१ वर्षीय वडील पुष्कर सभरवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सूर्यकांत आणि उज्ज्वल भुयान यांच्या न्यायासनाने ही टिप्पणी केली. सभरवाल यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली या अपघाताची स्वतंत्र आणि तांत्रिकदृष्ट्या योग्य चौकशी करण्याची मागणी केली आहे. अहमदाबादमधील अपघातात २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्ससह २६० लोकांचा मृत्यू झाला.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, नागरी उड्डयन महासंचालनालय (डीजीसीए), विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) आणि विमान अपघात चौकशी ब्युरो (एएआयबी) आणि विमान अपघाताच्या चौकशीसंदर्भात इतर संबंधित पक्षांना नोटीस बजावल्या. दिवंगत कॅप्टन सुमित सभरवाल यांचे वडील पुष्कराज सभरवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी केल्यानंतर ही नोटीस बजावण्यात आली.

सुनावणीदरम्यान, खंडपीठाने पुष्कराज सभरवाल यांना सांगितले की हा अपघात अत्यंत दुःखद होता, परंतु त्यांनी त्यांच्या मुलाला दोषी ठरवल्याचा भार सहन करू नये... कोणीही कोणत्याही गोष्टीसाठी पायलटला दोष देऊ शकत नाही. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी जोर देऊन सांगितले की, भारतातील कोणीही ही पायलटची चूक असल्याचे मानत नाही.

प्राथमिक चौकशी अहवालात पायलटविरुद्ध कोणतेही आरोप नाहीत. न्यायालयाने याचिकेवर सविस्तर चर्चेसाठी तारीख निश्चित केली आहे आणि सर्व पक्षांकडून उत्तरे मागितली आहेत. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### अशोक-निवेदिता सराफ पहिल्यांदाच टीव्हीवर एकत्र



**मुंबई** : मनोरंजन जगतातील सर्वांची लाडकी जोडी अशोक सराफ आणि निवेदिता यांनी अनेक चित्रपटांमध्ये सोबत काम केले आहे. मात्र, त्यांनी कधीही मालिकांमध्ये एकत्र काम केले नाही. आता ही जोडी टीव्हीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच मालिकेत एकत्र दिसणार आहे. अशोक सराफ यांच्या सध्या सुरू असलेल्या ‘अशोक मा.मा.’ या मालिकेत निवेदिताचा प्रवेश होणार आहे. यात निवेदिता सराफ यांची भूमिका एका उत्साही, आत्मनिर्भर आणि अविवाहित स्त्री म्हणून आहे, जी स्वतःचा संस्कार वर्ग चालवते. हा वर्ग पारंपरिक चौकटीतील नाही. जेव्हा अशोक मामा आपली नातवंड घेऊन या वर्गात येतात तेव्हा त्यांना एका वेगळ्याच शिक्षिकेची अपेक्षा असते. पण, समोर येते एक वेगळीच, आधुनिक विचारांची स्त्री. दोघांना एकत्र पाहणे ही प्रेक्षकांसाठी मेजवानीच ठरणार आहे.

### कॅटरिना-विकीला पुत्ररत्नाची प्राप्ती



**मुंबई** : अभिनेत्री कॅटरिना कैफ आणि अभिनेता विकी कौशल या दाम्पत्याच्या जीवनात चिमुकल्या बाळाचे आगमन झाले आहे. कॅटरिनाला मुलगा झाला असून विकीने समाज माध्यमाद्वारे ही बातमी जगजाहीर केली आहे. या जोडप्यावर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विकीने लिहिले की, आमच्या आयुष्यात आनंदाचं आगमन झालं आहे. सगळ्यांचे अपार प्रेम आणि कृतज्ञतेने आम्ही सर्वजण आमच्या मुलाचे आनंदाने स्वागत करतोय्.

# नार्को-दहशतवाद प्रकरणी ईडीची छापेमारी

### माजी मंत्री बाबू सिंगांच्या घराची घेतली झडती

**जम्मू, ७ नोव्हेंबर**

अंमलबजावणी संचालनालयाने गुरुवारी जम्मू आणि काश्मीरमध्ये एकाच वेळी छापे टाकले. यावेळी माजी मंत्री बाबू सिंग यांच्या घरावरही छापा टाकण्यात आला. त्याच्या घरावर ड्रग्जशी संबंधित आणि मनी लॉण्ड्रिंग चौकशी भाग म्हणून घरावर छापा टाकण्यात आला, असे सूत्रांनी सांगितले.

श्रीनगरमधील सहा आणि जम्मूमधील दोन परिसर मनी लॉण्ड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींखाली निरीक्षणात आहेत. हे प्रकरण मार्च २०२२ मध्ये यूटी पोलिसांनी पहिल्यांदा उघडकीस आणलेल्या अमली पदार्थांशी आणि मनी लॉण्ड्रिंग प्रकरणाशी संबंधित आहे. मोहम्मद शरीफ शहा नावाच्या एकाला काश्मीरहून जम्मूमध्ये ६.९ लाख रुपये हे हवाला पैसे जितेंद्र सिंग उर्फ बाबू सिंग उर्फ जतिंदर सिंग यांना पोहोचविण्याचा प्रयत्न करताना अटक करण्यात आली होती. हे पैसे जम्मूमधील फुटीरतावादी आणि फुटीरतावादी गटांना विध्वंसक कारवाया करण्यासाठी निधी देण्यासाठी होते.

एजन्सींना सैफ दीन, फारूख अहमद नायकू, मुबाशिर मुश्ताक फाफू यांचा कथित संबंध आढळला. येथे पाकिस्तानमधील कार्यकर्ते विध्वंसक कारवायांसाठी निधी देण्यासाठी नार्को-दहशतवाद मॉड्यूल चालवत होते, असे सूत्रांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# शास्त्रज्ञांना सापडला ६० लाख वर्षांपूर्वीचा बर्फाचा तुकडा

### • पृथ्वीच्या प्राचीन हवामानाची मिळणार माहिती • हवेचे बुडबुडे २७ लाख वर्षांपेक्षाही जुने

**न्यू यॉर्क, ७ नोव्हेंबर**

शास्त्रज्ञांना अंटार्क्टिक खंडातून ६० लाख वर्षांपूर्वीचा बर्फाचा तुकडा सापडला आहे. त्यांनी तो बाहेर काढून त्यावर संशोधन सुरू केले आहे. हा बर्फ कालमापन केलेला आतापर्यंतचा सर्वात जुना बर्फ आहे.

या ६० लाख वर्षांपूर्वीच्या सापडलेल्या बर्फामुळे संशोधनातून शास्त्रज्ञांना पृथ्वीच्या प्राचीन हवामानाची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. पीएनएएस या नियतकालिकेमध्ये २८ ऑक्टोबरला प्रकाशित झालेल्या अभ्यासक्रमानुसार हा बर्फ आणि त्यात अडकलेले हवेचे बुडबुडे हे सुमारे २७ लाख वर्षे जुन्या असलेल्या ज्ञात बर्फाच्या नमुन्यांपेक्षा दुप्पट वयाचे आहेत. आईस कोर म्हणजे बर्फाचा गाभा हे शास्त्रज्ञांना



आपला ग्रह भूतकाळात कसा होता, याबद्दल संशोधन करण्याची संधी देते, असे या अभ्यासाच्या प्रमुख लेखिका आणि मॅसॅच्युसेट्समधील वुड्स होल ओशनोग्राफिक इन्सिट्यूशनमधील सहायक शास्त्रज्ञ सारा शॅकलटन यांनी सांगितले.

ॲलन हिल्समधील गाभा हा फार पूर्वीच्या काळाबद्दल माहिती देतो. येथील बर्फ आणि हवा मायोसिन युगातील म्हणजेच ५३ ते २३० लाख वर्षांपूर्वीचे आहेत. त्यावेळी पृथ्वी प्रचंड उष्ण होती. समुद्राची पातळी उंच होती आणि ग्रहावर आता विलुप्त झालेले प्राणी होती. यात प्रामुख्याने सॅबर टूथ्ड मांजरी, ओकापीसारखे जिराफ, आर्क्टिक गेंडे आणि मॅमथ यांचा समावेश होता. शॅकलटन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २०१९ ते २०२३ दरम्यान पूर्व अंटार्क्टिकाच्या दुर्गम ॲलन हिल्स ब्लू आइस एरियामध्ये हा विक्रम मोडणारा बर्फ सापडला आहे. (वृत्तसंस्था)

**संशोधनासाठी केले ६६० फूट ड्रिलिंग**

अभ्यासानुसार, ॲलन हिल्स बर्फाचे मैदान समुद्रसपाटीपासून सुमारे ६,५०० फूट उंचीवर आहे. नमुने मिळविण्यासाठी संशोधकांनी बर्फाच्या थरामध्ये ३३० ते ६६० फूट खाली ड्रिलिंग केले. त्यानंतर त्यांनी हवेच्या कणांमध्ये असलेल्या अर्गोन समस्थानिकांच्या किरणोत्सर्गी ऱ्हासाचे मापन करून उत्खनन केलेल्या बर्फाच्या गाभ्यांचे कालमापन केले. या गाभ्यांमधील ऑक्सिजन आयसोटोप्सचा मागोवा घेऊन मागील ६० लाख वर्षांमध्ये ॲलन हिल्स प्रदेश सतत थंड असल्याचे निश्चित केले आहे.

### ब्रॅड पिटने अँजेलिनावर दाखल केला २९० कोटींचा खटला



**कॅलिफोर्निया** : हॉलिवूडमधील गाजलेले जोडपे ब्रॅड पिट आणि अँजेलिना जोली यांच्यातील वाद काही थांबण्याचे नाव घेत नाहीय. हे जोडपे बरेच आधी विभक्त झाले आहे. पण, त्यांच्यात कोणत्या ना कोणत्या कारणावरून वाद होताना दिसतोय. आता एका कंपनीतील भागीदारीवरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला असून तो थेट कोर्टापर्यंत पोहोचला आहे. एका दारू कंपनीचे दोघे एकेकाळी मालक होते. मात्र, अँजेलिनाने या कंपनीतील आपले शेअर्स विकून टाकले आहेत. तिच्या या निर्णयाला ब्रॅड पिटने न्यायालयात आव्हान दिले असून तिच्यावर २९० कोटींचा खटला दाखल केला आहे. अँजेलिनाच्या वकिलांनी यासंदर्भातील आरोपांना फेटाळून लावत अशा पद्धतीने गोपनीय व्यवहार उघड करणे अयोग्य असल्याचे म्हटले आहे.



## अग्रलेख...

# मित्रांनी सांभाळूनच वागावे...

काँग्रेसच्या केंद्रीय सत्तेच्या काळात देशात भ्रष्टाचाराच्या राक्षसाने थैमान घातले होते. त्या काळात भ्रष्टाचार झाला नाही, असे एकही क्षेत्र नव्हते. काँग्रेसच्या तत्कालीन सरकारमधील बहुतांश मंत्री भ्रष्टाचाराच्या प्रकरणांत अडकले होते. बरे, हा भ्रष्टाचारही साधासुधा नव्हता, तर शेकडो आणि हजारो कोटी रुपयांचा होता. संपुआ शासन काळात सरकारमधील मंत्री आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या होत्या. त्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली होती. देशातील सर्वसामान्य जनतेला सरकारने विकासाचे एखादे काम कमी केले तर त्याचे काही वाटत नाही, पण भ्रष्टाचाराची लोकांना जबरदस्त चीड असते. त्यामुळे काँग्रेस सरकारमधील भ्रष्टाचाराच्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी आवाज उठवला होता. या भ्रष्टाचाराविरुद्ध संघर्ष सुरू केला होता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा जो पराभव झाला, त्यामागे सरकारमधील लोकांचा भ्रष्टाचार हे एक प्रमुख कारण होते.

दहा वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवणाऱ्या डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झाला नसला तरी त्यांनी आपल्या सरकारमधील भ्रष्ट मंत्र्यांना भ्रष्टाचार करण्यापासून रोखले नाही आणि त्यांच्यावर कठोर कारवाई केली नाही, असा आरोप त्यांच्यावर झाला होता. या पृष्ठभूमीवर मोदी सरकार सत्तेवर येऊन ११ वर्षे पूर्ण झाली असतानाही, मोदी सरकारमधील एकाही मंत्र्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही, ही मोदी सरकारची फार मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. नाही म्हणायला एखाद-दुसऱ्याबद्दल काही लोकांनी हेत्वारोप केले, पण ते विषय लगेच निकाली निघाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ''ना खाऊंगा ना खाने दूंगा'' ही भूमिका यासाठी कारणीभूत ठरली. मोदी यांची स्वच्छ प्रतिमा ही त्यांची जमेची बाजू म्हटली पाहिजे. त्यांच्यावर देशातील कोट्यवधी लोकांचा विश्वास आहे. त्यांच्या कारकीर्दीच्या पृष्ठभूमीवर मागे वळून पाहिले तर असे दिसते की, काँग्रेस सरकारच्या काळात काँग्रेस नेत्यांचा भूखंड घोटाळा हा सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत होता. केंद्रात व राज्यांमध्येही भूखंडाचे श्रीखंड खात काँग्रेस नेत्यांनी आपल्या तोंडाला काळे फासून घेतले होते. त्यांची बदनामी झाली होती. तरीही काँग्रेस नेत्यांचे डोळे उघडत नव्हते. त्याचे जे काय परिणाम भोगायचे, ते काँग्रेसला आता भोगावे लागत आहेत. त्याला काँग्रेस स्वतः जबाबदार आहे.

केंद्रात असो वा राज्यात, आघाडीचे सरकार चालवताना तर जास्त खबरदारी घ्यावी लागते. भाजपाने केंद्रात व राज्यांमध्येही हा प्रयोग यशस्वीरीत्या राबविला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळू शकले नाही. तेलगू देसम आणि जनता दल संयुक्तच्या पाठिंब्यावर मोदी यांना सरकार स्थापन करावे लागले. भाजपाच्या मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत आणि या सरकारला पाठिंबा देणाऱ्या भाजपाच्या मित्रपक्षांच्या मंत्र्यांवरही भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत. केंद्रीय सरकारच्या या स्वच्छ प्रतिमेबाबत हेत्वारोप करता येतील, असा मुद्दा मध्यंतरी विरोधकांना मिळाला होता. पहिल्या घटनेत पुण्यातील जैन छात्रावास जमीन प्रकरणामुळे केंद्रीय नागरी उड्डयन आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ अडचणीत येण्यासारखी स्थिती निर्माण झाली होती. पुण्यातील हिराचंद नेमचंद दोशी स्मृती ट्रस्टची ३ एकर जमीन गोखले बिल्डरला देण्यासंबंधीचे हे प्रकरण होते. मोहोळ हे गोखले बिल्डरचे भागीदार होते, असा आरोप होता. मुळात जैन ट्रस्टने आपली जमीन विकसित करण्यासाठी एखाद्या बिल्डरला देण्यात काही गैर नव्हते. असे हजारो व्यवहार देशात दररोज होत असतात. पण, मोदी सरकारमध्ये राज्यमंत्री असलेले मुरलीधर मोहोळ यांची या कंपनीत भागीदारी असल्याचा आरोप झाला. त्यामुळे हा भूखंड व्यवहार चर्चेचा विषय झाला. भूखंडाचे श्रीखंड न खाताच मोहोळ यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न झाला. या जमिनीचा सौदा रद्द करण्यात आल्यामुळे या प्रकरणावरून उठलेले वादळ शांत झाले. वास्तवात मोहोळ यांनी गोखले बिल्डरमधील आपली भागीदारी वर्षभर आधीच सोडली होती. पण त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. याचा अर्थ असा की, सार्वजनिक जीवनात आपण स्वच्छ आणि प्रामाणिक असलो तरी आपले वर्तन देखील जनतेला संशयातीत विश्वास देणारे असावे लागते. तुमच्यावर संशय घेता येईल, अशी सूईच्या टोकाएवढी जागा जरी विरोधकांना मिळाली तरी ते संधी घेतात. ते राईचा पहाड करण्यासाठी टपूनच बसले असतात. मुरलीधर मोहोळ यांचे प्रकरण थोडक्यात निभावले. परंतु, त्याचे कवित्व संपत नाही तोच पुण्यातील दुसरा कथित भूखंड घोटाळा समोर आला आहे. हा कथित घोटाळा महायुती सरकारमधील उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित आहे. दादांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी पुण्यातील ३०० एकर जमीन अत्यल्प दरात आपल्या ट्रस्टच्या नावाने करताना अपेक्षित कर भरला नाही, असा आरोप आहे. त्या आरोपाचे तपशीलही चर्चेत आलेले आहेतच. हा आरोप तसा गंभीरच म्हटला पाहिजे. त्यातही हे प्रकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित असल्यामुळे त्याची व्याप्ती आणि गांभीर्य आणखी वाढले.

अजितदादा पवार यांची प्रतिमा तशी आधीपासूनच वादग्रस्त आहे हे खरेच. महायुतीत सहभागी होण्याआधी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले होतेच. आता ते महायुतीचे घटक आहेत. अजित पवार हे शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात असताना किंवा त्यांनी आपला वेगळा पक्ष स्थापन केला असताना त्यांच्यावर एखादा आरोप होणे आणि ते आता महायुती सरकारचे जबाबदार घटक असताना त्यांच्यावर आरोप होणे यात फारच मोठा फरक आहे. आपण महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आहोत आणि आपल्यावर होणाऱ्या आरोपामुळे केंद्रीय सरकार तसेच राज्यातील फडणवीस सरकारच्या प्रतिमेवर परिणाम होतो, याची जाणीव त्यांनी ठेवणे भाग आहे. या प्रकरणाची मला माहिती नव्हती वा कोणताही चुकीचा व्यवहार मला मान्य नाही, असे त्यांनी म्हणणे ही पश्चातबुद्धी म्हटली पाहिजे. मुलांनी मोठे झाल्यावर व्यवसाय करणे यात काहीही गैर नाही, हे त्यांचे म्हणणे खरे आहे. परंतु, एवढ्या मोठ्या नेत्याच्या चिरंजीवांनी कोणताही व्यवहार करताना राजकारणातील आपल्या वडिलांचे स्थान, त्यांची आणि त्यांच्या मित्रपक्षाची प्रतिमा याची काळजी घेणे अपेक्षित आहे. दुसरा मुद्दा म्हणजे आपला मुलगा काय करतो, कोणता व्यवसाय करतो, यावर वडिलांचे लक्ष असले पाहिजे. मी असे सांगितले होते, तसे सांगितले होते, ही वक्तव्ये पुरेशी नाहीत.

हे प्रकरण गंभीर नसते तर राज्य सरकारने याच्या सखोल चौकशीचे आदेश दिले नसते, सह दुय्यम निबंधकांना निलंबित केले नसते. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या असताना असा आरोप उपमुख्यमंत्र्यांवर होणे कोणत्याही सरकारसाठी अडचणीचे आहे. आपण कोणतेही गैर काम केले नाही, भूखंड घोटाळ्यात आपला सहभाग नाही, असे अजितदादांनी वारंवार म्हणणे पुरेसे नाही तर त्यांच्या व कुटुंबीयांच्या कृतीतून तसे दिसणे आणि जनतेची खात्री होणे आवश्यक आहे. महायुती आकाराला येण्याच्या पूर्वीचा काळ वेगळा होता. त्या काळी काँग्रेस-राष्ट्रवादी आणि घोटाळे यांच्यात अनन्यभाव कायम होता. आता अजितदादा स्वतंत्र पक्षाचे नेते आहेत आणि महायुतीचे प्रमुख घटक आहेत. त्यामुळे त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी स्वतःबरोबर महायुतीतील इतर घटकांच्या इभ्रतीचीही काळजी वाहिली पाहिजे. मित्रामुळे मित्र अडचणीत आल्याची उदाहरणे इतिहासात आहेत. मित्रांनी एकमेकांना सांभाळले पाहिजे आणि त्याच वेळी आपल्यामुळे दुसरा मित्र अडचणीत येणार नाही, यासाठी नेहमी सांभाळूनच वागले पाहिजे. भाजपाची राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छ आणि कार्यक्षम अशी प्रतिमा लक्षात घेता महायुती सरकारमधील प्रत्येक घटकाची जबाबदारी वाढली आहे, हे त्यांच्या लक्षात आले पाहिजे आणि तसे नसेल तर ते त्यांच्या लक्षात आणून देणे आता गरजेचे झाले आहे.


## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# व्होटचोरीला बिनशर्त पाठिंबा?

सत्याचा मोर्चा हा विषय सध्या महाराष्ट्रात ट्रेंड करतोय. गेल्या आठवड्यात मुंबईत काढलेल्या या मोर्चात महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र आले. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अनेक वर्षांनंतर एकत्र दिसले. कै. बाळासाहेब ठाकरे असताना कधी पवार-ठाकरे आघाडी होऊ शकली नाही. मात्र बाळासाहेबांच्या निधनानंतर आधी उद्धव ठाकरे आणि आता राज ठाकरे हे आघाडीत सामील होऊ पाहत आहेत. या सर्वांसमोर समान शत्रू जर कोण असेल तर तो म्हणजे भाजपा! काँग्रेस एकटी भाजपाला हरवू शकत नाही हे वेळोवेळी सिद्ध झालं आहे. राहुल गांधी सोडून काँग्रेसकडे दुसरा चेहरा नाही कारण नेहरूंच्या वंशजाव्यतिरिक्त इतर कुणीही काँग्रेसवर सध्या तरी हक्क सांगू शकत नाही. काँग्रेसने इतर पक्षांना, इको-सिस्टिमला बाजूला सारून भाजपशी दोन हात करण्याचा प्रयत्न केला. राहुल गांधींना युवा नेता, जनेऊधारी ब्राह्मण इत्यादी विविध प्रकारे प्रोजेक्ट करण्याचा प्रयत्न झाला. पण फारसे यश आले नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र काँग्रेसला मित्रपक्ष व राजकीय नसलेल्या संघटना व इको-सिस्टिमच्या मदतीने डोकं वर काढता आलं. यानंतर काँग्रेसला पुन्हा असं वाटू लागलं की राहुल गांधींच्या नेतृत्वात हा चमत्कार घडतोय. पण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत युतीने आघाडीला पुन्हा धूळ चारली. त्यामुळे आता वेगवेगळी इको-सिस्टिम भाजपाला सत्तेतून दूर करण्यासाठी सज्ज झाली आहे. मिशनरी, जिहादी, डावी ताकदही आपापल्या परीने जोर लावत आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिकेच्या निवडणुकीत विरोधकांना आपली ताकद पुन्हा दाखवायची संधी मिळाली आहे. या पृष्ठभूमीवर हा सत्याचा मोर्चा निघाला आहे. या मोर्चात मतदारयादीत दुबार येणारी नावे, मृत व्यक्तींची नावे अजूनही दाखवणे आणि ईव्हीएमच्या सुरक्षिततेवर शंका हे मुद्दे विरोधकांनी उपस्थित केले. या मोर्चात अनेकांची भाषणे झालीत. मात्र आज आपण राज ठाकरेंचा विचार करणार आहोत.

राज ठाकरे यांनी १० वर्षांपूर्वी गुजरातचा दौरा केला आणि नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात गुजरात किती पुढारला आहे हे त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेला समजावून सांगितलं. त्यांनी मोदींच्या विकासकामांचं उघड कौतुक केलं. या दरम्यान मनसे



हा एकटा निवडणूक लढत होता. मनसेचे कार्यकर्ते सांगायचे की आम्ही हरलो तरी एकटे लढतो. ते एकटे लढायचे कारण इतर कोणत्याही मोठ्या पक्षाला त्यांची गरज वाटली नाही. भाजपसोबत शिवसेना होती. तेव्हा उद्धव ठाकरे हे पक्ष प्रमुख होते. ठाकरे बंधूंचे संबंध चांगले नव्हते. म्हणून मनसेला युतीत घेण्याचा प्रश्नच नव्हता. दुसरीकडे आघाडीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोन मोठे पक्ष होते. मनसे तेव्हा मराठी मुद्द्यावरून राजकारण करत होती. आघाडीने स्वतःला नेहमीच पुरोगामी म्हटलं म्हणून मनसेला आघाडीत घेऊन अमराठी लोकांची मते घालवण्याचा खेळ आघाडीने केला नाही. त्यामुळे मनसेने कधीच कुणाशी युती केली नाही असं वरवर वाटत असलं तरी त्यांच्यासाठी युती व आघाडीत जागाच नव्हती. त्यानंतर त्यांनी मोदींवर टीका करायला सुरुवात केली. २०१९ च्या आधीच त्यांनी मोदी सरकारवर टीका सुरू केली. 'लाव रे तो व्हिडीओ' हे राज यांचं वाक्य खूप गाजलं. ही राज ठाकरेंची परीक्षा होती. जर त्यांच्या भाषणांमुळे लोकसभा निवडणुकीत परिणाम दिसला असता तर त्यांना कदाचित विधानसभेत आघाडीत स्थान मिळवून देण्याचा पवारांनी प्रयत्न केला असता. मात्र २०१९ ला भाजप प्रचंड बहुमताने जिंकला. त्यामुळे विधानसभेत पुन्हा मनसेसाठी आघाडीत जागा राहिली नाही. त्यात विधानसभेच्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंनी भाजपला अलविदा करत आघाडीत प्रवेश केला. म्हणून आघाडीचे दरवाजे राज ठाकरे यांच्यासाठी बंद झाले. पुढे एकनाथ शिंदेंनी आपली वेगळी चूल मांडली, इतकंच नव्हे तर त्यांनी पक्षच ताब्यात घेतला आणि ते आघाडीतून युतीत दाखल झाले. मराठीच्या मुद्द्यावर मते मिळत नाही हे ओळखून राज ठाकरेंनी हिंदुत्व हाती घेतलं आणि सावरकरांचा फोटो आपल्या सभेत लावला. मशिदीवरील भोंग्यावरून त्यांनी रान पेटवलं. आपणच खरे हिंदुत्ववादी आहोत हे दाखवण्याचा त्यांनी व्यवस्थित प्रयत्न केला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोदींना बिनशर्त पाठिंबा दिला आणि आता ते व्होटचोरीच्या मुद्द्यावरून आंदोलन करत आहेत. एखाद्या नाट्यमय चित्रपटात जितके उतार चढाव नसतात तितके उतार चढाव राज ठाकरे यांच्या राजकीय कारकीर्दीत आहेत. राज ठाकरे कधी आपली भूमिका बदलतील याचा अंदाज त्यांना स्वतःलाही नसावा. मात्र त्यांचाही नाईलाज आहे. पक्ष स्थापन केल्यापासून सुरुवातीचा काही काळ सोडला तर त्यांच्या वाटेला अपयशच आलेलं आहे, निराशाच आलेली आहे. त्यामुळे त्यांना भूमिका बदलाव्या लागतात. मात्र वारंवार भूमिका बदलत राहिले तर विश्वासार्हता कमी होते. किंबहुना (उद्धव ठाकरेंच्या शैलीत) निघून जाते. राज ठाकरे यांचा आवाज मोठा आहे म्हणून महाराष्ट्रात व्होटचोरीचं आंदोलन लीड करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली असावी. राज ठाकरे म्हणतात की, २०१७ पासून ते व्होटचोरीबद्दल आवाज उठवत आहेत. ठाकरेंचे हे वाक्य जनतेने विशेषतः मराठी माणसाने गांभीर्याने घेतले पाहिजे.

२०१७ च्या आधी २०१४ ची निवडणूक आली त्यात २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे हे भाजपासोबत होते. २०१९ च्या विधानसभा निवडाणुकीतही उद्धव ठाकरे भाजपासोबत होते. मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिकेची निवडणूकही झाली. राज ठाकरे यांचे व्होटचोरीचे आरोप खरे मानले तर उद्धव ठाकरे हे व्होटचोरीचे भागीदार होते असे म्हणायचे का? दुसरी गोष्ट राज ठाकरे यांना २०१७ सालीच व्होटचोरीचा साक्षात्कार झाला होता तर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीआधी त्यांनी मोदींची भेट का घेतली? आणि या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोदींची स्तुती का केली? मोदींना बिनशर्त पाठिंबा का दिला? राज ठाकरे यांच्याच तर्कानुसार हा बिनशर्त पाठिंबा म्हणजे व्होटचोरीला दिलेला बिनशर्त पाठिंबा नव्हे काय? मग जर राज ठाकरे यांच्याच तर्कानुसार त्यांनी व्होटचोरीला पाठिंबा दिला असेल आणि राज ठाकरे यांच्याच तर्कानुसार उद्धव ठाकरे हे देखील व्होटचोरीचे भागीदार असतील, तर तर्कसुसंगतपणे म्हणायचे झाले तर हा मराठी माणसाचा विश्वासघात नव्हे काय?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

हेमंत सालोडकर

# दोन विश्वचषकांच्या सकारात्मक बाजू

नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर २ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय महिला क्रिकेट संघाने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिका संघाला हरवले आणि महिला विश्वचषक सुरू झाल्यापासून ५२ वर्षांत प्रथमच जगज्जेता होण्याचा मान मिळवला. त्या रात्री सर्व भारत जागा होता. रात्री बरोबर १२ वाजताच्या सुमारास आफ्रिकेच्या नडीन डी क्लर्कचा कठीण झेल भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने झेलला आणि भारताच्या हाती विश्वचषक असल्याचा विश्वास निर्माण झाला. तो झेल बघून १९८३ च्या पुरुषांच्या विश्वचषक स्पर्धेतील वेस्ट इंडीज विरुद्ध भारत यांच्यातील सामन्याची आठवण झाली. त्या सामन्यात कर्णधार कपिल देवने तडाखेबंद फलंदाज व्हिव्हियन रिचर्ड्सचा कठीण झेल सुमारे २० पावलं मागे धावून अलगद पकडला आणि त्यावेळीही भारताने विश्वचषक जिंकल्याचा विश्वास निर्माण झाला. त्यावेळी ६० षटकांचे एकदिवसीय सामने व्हायचे. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५४.४ षटकांत सर्व बाद १८३ धावा केल्या. प्रत्युत्तरात वेस्ट इंडीजचा संघ ५२ षटकांत १४० धावा काढू शकला. बलाढ्य वेस्ट इंडीज संघ ४३ धावांनी पराभूत झाला. त्यापूर्वी तो दोन वेळा विश्वविजेता होता. त्यांचे तिसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भारताने भंग केले. त्यावेळी भारतीय संघाचे प्रशिक्षक होते पीआर मान सिंग. १९८३ च्या विश्वचषकावर नजर टाकली तर बहुतेक पंजाबी किंवा उत्तर भारतीय खेळाडूंचा दबदबा होता. त्यातही सुनील गावस्कर, संदीप पाटील आणि मुंबईत राहणारे बलविंदरसिंग संधू आपल्या शैलीदार खेळामुळे संघात स्थान टिकवून होते. १९८३ च्या विश्वचषकाचा पुरस्कार वितरण सोहळा मैदानाबाहेर झाला, तर २०२५ च्या विश्वचषकाचा पुरस्कार वितरण सोहळा मैदानात हजारो लोकांच्या साक्षीने झाला. त्यावेळी भारताने सामना जिंकताच लोक मैदानाकडे पळत सुटले होते. भारतीय महिलांनी सामना जिंकताच मैदानाबाहेरील इतर खेळाडूंनी मैदानाकडे धूम ठोकली आणि आपल्या विश्वविजेत्या खेळाडूंना डोक्यावर घेतले.

भारतीय महिलांनी दुसऱ्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलिया संघाला जबरदस्त मात देत हरविले आणि त्यांचे आठव्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न धुळीस मिळवले. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करीत ५० षटकांत ३३८ अशी मोठी धावसंख्या उभारली. धावांचा पाठलाग करताना भारतीय महिलांनी ४८.३ षटकांत म्हणजे ९ चेंडू आणि ५ गडी राखून ऑस्ट्रेलियाला विश्वचषकातून बाहेर घालविले. त्यानंतर २ नोव्हेंबरला द. आफ्रिका विरुद्धच्या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करीत २९८ धावा काढल्या आणि धावांचा पाठलाग करणाऱ्या द. आफ्रिका संघाला २४६ धावांवर रोखले आणि विश्वचषकावर भारताचे नाव कोरले. पुरुषांचा एकदिवसीय विश्वचषक १९७५ साली सुरू झाला, पण त्याआधी १९७३ मध्येच महिला विश्वचषकाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. म्हणजे येथेही महिलांनीच बाजी मारली. भारतीय महिला संघाने विश्वचषक जिंकला आणि त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पण या जगज्जेत्या महिलांच्या यशामागे एका मराठी माणसाचे कष्ट आहेत आणि त्याची चर्चा सर्वदूर सुरू आहे. महिला संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार हे मूळ मुंबईचे आहेत. सचिन तेंडुलकर, विनोद कांबळी, राहुल द्रविड, सौरभ गांगुली यांचे समकालीन असलेले अमोल मुजुमदार यांना गुणवत्ता असून, कधीही राष्ट्रीय संघात खेळण्याची संधी मिळाली नाही. प्रथम श्रेणी सामन्यात त्यांची चमकदार कामगिरी पाहता भारतीय क्रिकेट चाहते एका प्रतिभावान खेळाडूचा खेळ पाहण्यास मुकले असे म्हणावे लागेल. १७१ प्रथम श्रेणी सामन्यात त्यांनी ११९६७ धावा काढल्या. त्यात ३० शतके आणि ६० अर्धशतकांचा समावेश आहे. सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळीच्या विश्वविक्रमी ६६४ धावांच्या भागीदारीची चर्चा सर्व जण करतात, पण १९ व्या वर्षी रणजी चषक पदार्पणात अमोल मुजुमदार यांनी नाबाद २६० धावांची खेळी करून विश्वविक्रम केला होता. तब्बल दोन दशके हा विक्रम त्यांच्या नावावर होता. इतके असूनही त्यांच्यासाठी राष्ट्रीय संघाचे दार कधी उघडले नाही. हे विषही त्यांनी आपल्या खिलाडूवृत्तीने सहज पचविले. पण महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून अमोल मुजुमदार यांनी स्पर्धेच्या अमृतमंथनात भारताला विश्वचषक मिळवून दिला. इतके यश मिळाल्यानंतरही त्यांचे पाय जमिनीवर आहेत. त्यांचे त्यांच्या सोसायटीतील रहिवाशांनी स्वागत केले तेव्हा ते अत्यंत शांतपणे म्हणाले, आता मला फक्त घरचा वरण-भात खायचा आहे. यशाच्या शिखरावर असतानाही संयम राखणारी माणसं जगावेगळी असतात.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# कर्करुग्णांसाठी देवदूत!

त्या माणसाचं कर्तृत्वच इतकं मोठं आहे की, युनेस्कोच्या पातळीवर त्या कर्तृत्वाची दखल घेतली गेली, राज्य शासनाच्यावतीने खुद्द मुख्यमंत्र्यांनी त्यांची कामगिरी अधोरेखित केली, कितीतरी पुरस्कार, सत्कार सोहळे, कौतुक आणि बरेच कार्य... हा गौरव एका माणसाचा, त्याच्या कर्तबगारीचा, त्याच्या कार्यकर्तृत्वाचा ठरला... या पुरस्कार, गौरवाने त्यांचे काम थांबले नाही उलट भविष्यातील विकासाच्या वाटा ते धुंडाळीत राहिले... कर्करुग्णांसाठी देवदूत ठरलेल्या एका सेवाव्रतीची ही संघर्ष आणि यशाची गाथा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते आहे. विदेशातील गलेलठ्ठ पगारांची आमिषं झुगारून, कॅन्सर रुग्णांसाठी धडपडणाऱ्या या अवलियाचे नाव आहे डॉ. दिलीप निकम...

संपन्न भविष्याची खात्री देणारे देशातील नामांकित खाजगी रुग्णालयांचे प्रस्ताव, परदेशातील मोठ्या पगाराच्या नोकरीची मोहक आमंत्रणं, यापैकी कशाचाही विचार न करता, एका ध्येयवेड्या डॉक्टरने निवडला संघर्षाचा, सेवेचा आणि सामान्यांच्या ओंजळीत जीवनदान देण्याचा खडतर मार्ग. कर्करोगावरील वैद्यकीय शिक्षण पूर्ण होताच डॉ. दिलीप निकम यांनी हे सर्व आकर्षक प्रस्ताव धुडकावले. निवड केली ती मुंबईतील कामा रुग्णालयाची, अगदी नगण्य मानधनावर सामान्य कॅन्सर रुग्णांवर उपचार करण्याची. आजवर त्यांनी लाखो कर्करोगग्रस्तांना आपल्या उपचारांनी मृत्यूच्या दारातून बाहेर काढले आहे. उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यातील एका छोट्या गावातून सुरू झालेला हा प्रवास, अतिशय खडतर परिस्थितीतून कर्करोगतज्ज्ञ बनण्यापर्यंतचा, खरोखरच थक्क करणारा, हृदयस्पर्शी आणि हजारो लोकांसाठी प्रेरणादायी आहे.

धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि.) हे डॉ. दिलीप निकम यांचे मूळ गाव. त्यांचे वडील धाराशिव नगर परिषदेत कारकून होते. पण मोठे कुटुंब आणि मर्यादित उत्पन्नामुळे घरची परिस्थिती अत्यंत साधी होती. वडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण आणि त्यानंतर धाराशिव येथील भारत विद्यालय व शरद पवार हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेत असताना, त्यांच्या आयुष्यात एक घटना घडली - ज्याने त्यांच्या संपूर्ण आयुष्याची दिशा बदलवून टाकली.



एके दिवशी खेळताना त्यांच्या हाताला झालेली किरकोळ जखम त्यांनी घरच्यांपासून लपवली. परंतु, ती जखम चिघळत गेली, संक्रमण वाढले आणि असह्य वेदना सुरू झाल्या. अखेर आईच्या नजरेत ती जखम आली आणि तिने तातडीने गावातील डॉक्टरांना बोलावले. डॉक्टरांनी एक इंजेक्शन दिले आणि काही तासांतच वेदनांचा अंत झाला. त्या क्षणी, वेदनामुक्त झालेल्या चिमुकल्या दिलीपच्या मनात एक ठिणगी पेटली... मीही असा डॉक्टर होणार, जो इतरांचे दुःख दूर करेल. त्याच जखमेतून जन्म घेतलेले हे स्वप्न पुढे त्यांच्या जीवनाचे ध्येय बनले आणि तेच त्यांना कर्करोग क्षेत्रातील शून्यापासून शिखरापर्यंत घेऊन गेले.

बारावी विज्ञान शाखेत ९२ टक्के गुणांसह उत्तीर्ण होऊन, ध्येयानुसार वैद्यकीय शाखा निवडली. आर्थिक अडचणींमुळे मुंबईत प्रवेश घेणे शक्य झाले नाही, म्हणून त्यांनी मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस केले. यादरम्यान भारतात कॅन्सर रुग्णांची संख्या मोठी असूनही आणि हा आजार गंभीर असतानाही, फार कमी डॉक्टर्स या क्षेत्रात येण्यास उत्सुक असल्याचे त्यांच्या लक्षात आले. हे आव्हान स्वीकारून त्यांनी पुढील शिक्षण कॅन्सर, विशेषतः तेव्हा भारतात नवीन असलेल्या रेडिएशन थेरपी आणि ऑन्कोलॉजी या विषयात घेण्याचे ठरवले. मुंबईतील जसलोक रुग्णालयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला. पहिल्याच प्रयत्नात रेडिएशन थेरपी आणि ऑन्कोलॉजीमधील मास्टर डिग्री पूर्ण केली. त्यांचे ज्ञान, अभ्यास आणि प्रचंड कष्ट करण्याची वृत्ती पाहून जसलोकसह अनेक खाजगी रुग्णालये आणि परदेशातील मोठ्या पगाराच्या नोकरीचे प्रस्ताव त्यांच्यासमोर आपसूक आले. अशा नोकऱ्या स्वीकारल्यास गोरगरीब रुग्णांना सेवा देणे शक्य होणार नाही. त्यांनी सर्व प्रस्ताव नाकारले आणि मुंबईतील शासकीय कामा रुग्णालयात अत्यंत कमी पगारावर ते रुजू झाले. विशेष म्हणजे, त्यावेळी कामा रुग्णालयात कर्करोग विभाग अस्तित्वातही नव्हता. डॉ. निकम यांनी अक्षरशः 'शून्यातून' या रुग्णालयातील कर्करोग विभाग उभा केला. त्यांच्या प्रयत्नातून तब्बल ३२ कोटी रुपये किमतीची रेडिओ थेरपीची अत्याधुनिक उपकरणे कामा रुग्णालयात दाखल झाली. आपले ज्ञान, प्रामाणिकपणा आणि स्वच्छ चारित्र्याच्या बळावर त्यांनी कामा रुग्णालयाच्या कर्करोग विभागाला राज्यात एक ओळख मिळवून दिली.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे खाजगी रुग्णालयात ज्या उपचारांसाठी चार ते पाच लाख रुपये खर्च येतो, तेच उपचार कामा रुग्णालयात मोफत मिळू लागले. आज कामा रुग्णालय महिलांच्या केमोथेरपी आणि रेडिएशनसाठी हक्काचे, मोफत आणि उत्तम सेवा देणारे केंद्र म्हणून ओळखले जाते. टाटा रुग्णालय देखील त्यांच्याकडे अनेक रुग्ण उपचारासाठी पाठवते. या प्रवासात त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, परंतु त्यांनी रुग्णसेवेचा आपला वसा कधीही सोडला नाही. वेळोवेळी त्यांनी स्वित्झर्लंड, जर्मनी, अमेरिका, हाँगकाँगसारख्या देशांमध्ये जाऊन रेडिएशन थेरपी आणि ऑन्कोलॉजीमधील आधुनिक उपचारांचे विशेष प्रशिक्षण घेतले. त्यांच्या या ज्ञानाचा लाभ देशातील लाखो रुग्णांना आज होत आहे.

एकाच वेळी उपचार करत असताना रुग्णांना मानसिक बळ देणं, त्यांचे समुपदेशन करणे यासाठी देखील डॉ. निकम यांनी आतापर्यंत खूप मोठी भूमिका बजावली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे कॅन्सर झाल्यानंतर आपले मनोबल गमावलेल्या असंख्य रुग्णांना पुन्हा जगण्याची उमेद निर्माण झाली आणि त्यातून ते ठणठणीत बरे होऊन आज चांगले जीवन जगत आहेत.

कर्करोगावरील उपचार अलिकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानामुळे शक्य होत असले तरी, त्याचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याच्या पलीकडचा ठरतो आहे. त्यामुळे असले महागडे उपचार घेणे सर्वांना शक्य होत नाही. परिणामी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांसाठी हे उपचार दुरापास्त ठरत आहे. कर्करोग किंवा कुठलाही रोग माणसाची आर्थिक परिस्थिती पाहून होत नसतो. अशावेळी गरिबांच्या मदतीला धावून जाण्यासाठीचे पाऊल उचलण्याचा मानस डॉ. निकम यांनी व्यक्त केला आहे. अशा रुग्णांसाठी येत्या काळात एखादे भव्य इस्पितळ उभे करणे आणि औषधोपचार अल्पदरात उपलब्ध करून देत गरिबांनाही कर्करोगाचा सामना करणे सुकर करणे यासाठीचे पाऊल ते भविष्यात उचलणार आहेत. त्यांचा हा हेतू उदात्त असल्यामुळे त्यांना नक्कीच यश मिळेल यात शंका नाही.

९२७०३३३८८६

## संशयपिशाच्चाची बाधा

'फटाके आणि हायड्रोजन बॉम्ब' हा ७ नोव्हेंबरचा अग्रलेख वाचला. साठ वर्षे मनसोक्तपणे, बेमुर्वतपणे, बेलगाम एकहाती सत्ता भोगल्यानंतर गांधी-नेहरू परिवार आणि काँग्रेस पक्षाला देशातील जनतेने २०१४ मध्ये अपमानास्पद रीत्या सत्तेतून बाहेर फेकले. त्यानंतरच्या दोन निवडणुकांमध्ये सुद्धा काँग्रेसची जनताजनार्दनाने पुरती वाताहत केली. काही किरकोळ अपवाद वगळले तर विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसचे पुरते पानिपत झाले. स्वतःला देशाचे अनभिषिक्त सुलतान समजणाऱ्या, देशावर राज्य करण्याचा एकाधिकार आपल्याच परिवाराला आहे, देशातील तमाम नागरिक आपले गुलाम आहेत, आपल्यापेक्षा देशात अन्य कोणीही श्रेष्ठ नाही, अशा अनेक गैरसमजांनी गांधी-नेहरू परिवार तसेच काँग्रेसच्या नेत्यांना पछाडलेले आहे. हे संशयपिशाच्च परिवार आणि काँग्रेसच्या मनात एवढे पिसाळले आहे की लोकशाही मार्गाने निवडणुकीत झालेला पराभव स्वीकारण्याचीही त्यांची तयारी नाही. उलट राष्ट्रीय निवडणूक आयोगावर अनर्गल आरोप करून ते संवैधानिक संस्थांचाच अपमान करत आहेत. असे बिनबुडाचे, बिनापुराव्यांचे आरोप केल्यामुळे देशातील जनता परिवाराच्या आणि काँग्रेसच्या मागे उभी राहील हा आणखी एक (गोड) गैरसमज राहुल गांधींनी सोयीस्करपणे करून घेतला आहे. बिहार निवडणुकीत सुद्धा संभाव्य पराभवाची शक्यता दिसत असल्यामुळे आणि त्या पराभवाचे निखारे राहुल गांधींवर उडू नयेत म्हणून काँग्रेस पक्षाने बिहारमध्ये दुय्यम भूमिका स्वीकारली आहे हेसुद्धा उघड आहे. तसेच ईव्हीएम, व्होटचोरी आणि एसआयआरमध्ये सर्वोच्च न्यायालयासह देशातील अनेक न्यायालयांकडून जहाल शब्दांत कानउघाडणी झाल्यामुळे या प्रकरणी न्यायालयात जाण्याचीही त्यांची हिंमत नाही. तेव्हा या संशयपिशाच्चाची बाधा उतरण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

## ईपीएस- ९५ पेन्शनर्सबाबत उदासीनता

अनेक वर्षांपासून ईपीएस-९५ पेन्शनधारकांची अवहेलना सुरू असून सर्व स्तरावरून तसेच कामगार संघटना, वरिष्ठ नागरिक परिसंघ, इतर काही संगठनांचे प्रयत्न याविषयी निष्फळ ठरले आहेत. त्यात भर म्हणजे सोशल मीडियावरील यूट्यूब, फेसबुक यांच्या माध्यमातून दिशाभूल करणाऱ्या पोस्ट सातत्याने प्रसारित होत आहेत ज्यात कधी पंतप्रधान मोदी तर कधी अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्या साक्षीने (फोटो द्वारा) ईपीएस -९५ पेन्शनमध्ये भरघोस वाढ स्वीकृत झाली असून लवकरच ही वाढ मासिक ७५०० रुपये, तर कधी ७००० तर कधी ५००० रुपये, सोबत महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा याला सरकारने मंजुरी दिली असून लवकरच ही वाढीव पेन्शन व इतर सुविधा प्रदान करण्यात येणार आहे अशी उघड (परंतु सपशेल खोटी) बातमी प्रसारित केली जात आहे. आश्चर्य हे आहे की अशाप्रकारे ईपीएस-९५ पेन्शनर्सच्या भावनांची थट्टा होत असताना सरकार मात्र उदासीन आहे व अशा माध्यमांवर काही कारवाई होताना दिसत नाही. आधीच हजार-दोन हजार रुपये मिळणाऱ्या तुटपुंज्या पेन्शनमध्ये होणारी परवड झेलत मोठ्या आशेने ही पेन्शन वाढेल याची चातकासारखी वाट बघत असलेले हे पेन्शनधारक समाज माध्यमांवरील अशा दिशाभूल करणाऱ्या व खोट्या बातम्या बघून सुखावतात परंतु क्षणिक आनंदाने प्रफुल्लित झालेले हे पेन्शनर्स वस्तुस्थिती कळल्यावर दुःखी होतात. सरकारला विनंती आहे की, अशाप्रकारे अपप्रचार करणाऱ्यांवर कडक कार्यवाही करून बंदी घालावी व ईपीएस-९५ पेन्शनधारकांची क्रूर थट्टा थांबवावी. सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन एकदाचे जाहीर रीत्या हे स्पष्ट करावे की ईपीएस -९५ पेन्शनमध्ये काही वाढ अपेक्षित आहे की नाही. जेणेकरून पेन्शनधारकांची वारंवार होणारी मानसिक थट्टा व पिळवणूक थांबेल.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

## आजचे संघगीत-३६

शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५

### नवयुवकांनो संघटनेचे शस्त्र करी घ्या रे

नवयुवकांनो संघटनेचे शस्त्र करी घ्या रे ॥धृ.॥

शिवरायांची स्मरुनी मूर्ती जगांत पसरा भारतकीर्ती
कराच परमेच्छेची पूर्ती गतकालातुन घेउन स्फूर्ती
भविष्य उजळा रे ॥१॥

ओलांडुनिया सागर साती स्वातंत्र्याचे गिळते मोती
मगर धरा ती पकडा हाती त्या मगरीच्या पाडा दाढा
उदर विदारा रे ॥२॥

निशाण स्वातंत्र्याचे चढवा प्राण पणा लावुनिया लढवा
विरोध लाथेखाली तुडवा कलिकाळाला मारुनि ठोकर
मरणचि मारा रे ॥३॥

रंग घेउनी रिपुरक्ताचा टाक आपुल्या घ्या भाल्याचा
इतिहास लिहा भवितव्याचा सामर्थ्याचा पावित्र्याचा
सद्धर्माचा रे ॥४॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# प्रमुख चौक, दुभाजक देखभालीची जबाबदारी सोपविली संस्थांना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

शहरातील प्रमुख चौक ते महत्त्वाच्या मार्गापर्यंत स्वच्छता, सजावट, देखभाल आणि सौंदर्यवर्धन याची जबाबदारी विविध संस्थांकडून स्वेच्छेने स्वीकारण्यात आली आहे.

महापालिकेच्यावतीने स्वच्छता, सुंदरता आणि जनजागृतीसाठी विविध सामाजिक, औद्योगिक तसेच वृत्तसंस्थांच्या सहकार्याने दुभाजक अ‍ॅडॉप्शन उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यासंदर्भात महापालिकेने शहरातील संस्थांना या चौक व दुभाजक या संदर्भातील स्वच्छता, देखभाल आणि सौंदर्यवर्धन याची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विविध चौक व रस्त्यांवरील दुभाजकांची स्वच्छता, सजावट, देखभाल आणि सौंदर्यवर्धन याची जबाबदारी काही संस्थांकडून स्वेच्छेने स्वीकारली आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर या अभियानाचा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.या उपक्रमाद्वारे शहरातील रस्ते व चौक स्वच्छ, सुंदर आणि शिस्तबद्ध ठेवण्याबरोबरच नागरिकांमध्ये स्वच्छता हीच सेवा या भावनेचा प्रसार होणार आहे. संबंधित संस्थांनी आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून शहराच्या स्वच्छतेत व सौंदर्यवर्धनात मोलाचा वाटा उचलला आहे.

### या संस्थांकडे आहे ही जबाबदारी

महानगरपालिकेकडील नोंदणीनुसार मान्यतेअंती पुढील चौक आणि दुभाजकासाठी खालील संस्थांनी जबाबदारी स्वीकारली आहे.

१) डफरीन चौक ते जुना एम्प्लॉयमेंट चौक परिसरापर्यंतची जबाबदारी एनटीपीसी सोलापूर, २) पार्क चौक ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (भैया चौक) जबाबदारी माऊली लँडमार्क, ३) मरीआई चौक ते डी-मार्ट रोड परिसर जबाबदारी- माऊली लँडमार्क, ४) आसराचौक ते संचार प्रेसची जबाबदारी- लोकमत प्रेस,५) सात रस्ता ते त्रिपुर सुंदरी मार्गे गांधी नगर ते महावीर चौक जबाबदारी- मोंढे मोटर्स,६) एम्प्लॉयमेंट चौक ते सात रस्ता जबाबदारी एनटीपीसी, सोलापूर ७) सात रस्ता चौक, यशवंतराव चव्हाण पुतळा समोरील दुभाजक परिसर जबाबदारी लोकमत प्रेस,८) मुख्य चौक सात रस्ता परिसर जबाबदारी एनटीपीसी सोलापूर, ९) एम्प्लॉयमेंट चौक परिसर जबाबदारी सोलापूर, १०) डॉ. द्वारकानाथ कोटणीस गार्डन, सात रस्ता परिसर जबाबदारी एनटीपीसी सोलापूर यांच्याकडे राहणार आहे.

### ध्येयपूर्तीकडे नेणारे महत्त्वाचे पाऊल : आयुक्त डॉ. ओम्बासे

दुभाजक अ‍ॅडॉप्शन योजनेतून शहरातील सार्वजनिक ठिकाणांची जबाबदारी स्थानिक संस्था स्वीकारत असल्याने शहराचे सौंदर्य वाढेल, तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक संदेश पोहोचेल. ही योजना 'सुंदर सोलापूर - स्वच्छ सोलापूर' या ध्येयाच्या पूर्ततेकडे नेणारे एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या उपक्रमाबाबत सांगितले.

## महत्वाचे...



## समता सैनिक दलाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूर यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन आणि निवृत पोलीस उपनिरीक्षक केरू जाधव यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त विकास विद्यालय, हनुमान नगर सोलापूर आणि सो.म.न.पा. प्राथमिक शाळा क्रमांक १६आणि२१ या ठिकाणी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून समता सैनिक दलाचे जीओसी सुमित्रा जाधव, ज्येष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर, महासचिव अनिल जगझाप, भारतीय बौद्ध महासभेच्या धम्मरक्षिता कांबळे, मालिनी दोडयानुर, लता कांबळे, वर्षा जाधव, प्रीती जाधव, विनोद जाधव तसेच शाळेतील शिक्षक राहुल पवार, शंकर नरहरे उपस्थित होते. निवृत पोलीस उपनिरीक्षक केरु रामचंद्र जाधव यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त येणाऱ्या मान्यवरांना आवाहन करण्यात आले होते की आपण पुष्पगुच्छ, बुके,हारतुरे न आणता वही आणि पेन घेऊन यावे. त्यानुसार या कार्यक्रमाच्या वेळी आलेल्या वह्या आणि पेन याचे वाटप यावेळी करण्यात आले. प्रास्ताविक महासचिव अनिल जगझाप यांनी केले. सूत्रसंचालन विनोद जाधव यांनी केले तर सिद्धेश्वर भुरले यांनी सर्वांचे आभार मानले.

## प्रा. गोसावी, कोनापुरे यांना विशेष उत्कृष्ट योगदान पुरस्कार

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**





अभियांत्रिकी शिक्षण आणि व्यावसायिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तज्ज्ञांचा गौरव करण्याच्या उद्देशाने इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), सोलापूर स्थानिक केंद्र यांच्या वतीने वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजीच्या स्थापत्य अभियांत्रिकी शाखेचे सहाय्यक प्राध्यापक शशिकांत गोसावी आणि चेतन कोनापुरे यांना २०२३ - २०२५ या कालावधीत संस्थेच्या विविध उपक्रमात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल विशेष उत्कृष्ट योगदान पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. प्रा. गोसावी आणि प्रा. कोनापुरे यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात व्यावसायिक जागरूकता वाढविणे, तांत्रिक कौशल्य विकास उपक्रम राबविणे, विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन अशा विविध माध्यमांतून प्रभावी योगदान दिले आहे. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), सोलापूर स्थानिक केंद्र आयोजित सन्मान सोहळा चेअरमन डॉ. मोहन देशपांडे यांच्या आणि सोलापूर स्थानिक केंद्राचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला.



## बार्शी बाजार समिती निवडणुकीसाठी शेवटच्या दिवशी ११९ अर्ज दाखल

**बार्शी, दि.७ नोव्हेंबर-**

कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूकीत पुन्हा एकदा सोपल-राऊत यांच्यातच चुरशीचा सामना रंगणार असल्याने, या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दोन्ही गटाकडून १८ जागांसाठी एकूण ११९ अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये सोसायटी मतदारसंघातील ११ जागांपैकी ७ जागी सर्वसाधारण पुरुष, २ जागी सर्वसाधारण महिला, इतर मागासवर्गीय जागा १ व भटक्या विमुक्त जमातीची १ जागा आहे. ग्रामपंचायत मतदार संघातील ४ जागांपैकी २ जागा सर्वसाधारण, १ जागा अनुसूचित जाती जमाती व १ जागा आर्थिक दुर्बल घटकासाठी आहे. व्यापारी व अडते मतदार संघातून २ जागा व हमाल-तोलार मतदारसंघातून १ जागेसाठी अर्ज दाखल झालेले आहेत. यामध्ये सोपल गटाकडून पंचायत समितीचे माजी सभापती युवराज काटे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मकरंद निंबाळकर, माजी संचालक अरुण येळे, नंदकुमार काशीद, भास्कर काशीद, सुभाष शेळके, अशोक काशीद, माजी नगरसेवक अंबादास शिंदे, राजाभाऊ चव्हाण, किरण काकडे या प्रमुख नेत्यांनी अर्ज दाखल केले आहेत. तर माजी आमदार राजेंद्र राऊत गटाकडून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संतोष निंबाळकर, मदन दराडे, संजीव बगाडे, विजय गरड, प्रभाकर डमरे, अजित बारंगुळे, अभिजीत कापसे, बाबा गायकवाड, बाबा काटे, दशरथ टेकाळे, बाळराजे घाटे या प्रमुख नेत्यांनी अर्ज दाखल केले आहेत.

### माजी आमदार राजेंद्र राऊत यांचा धक्कादायक आणि आश्चर्यकारक निर्णय

या निवडणुकीत माजी आमदार राऊत यांनी त्यांचे सुपुत्र व बाजार समितीचे माजी चेअरमन रणवीर राऊत यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. या निवडणुकीत राऊत यांनी आपल्या मुलाची उमेदवारी नाकारण्याच्या निर्णयामुळे त्यांनी विरोधकांना गोंधळून टाकले आहे. यामागे त्यांची कोणती रणनीती असू शकते, हे निवडणुकीच्या निकालानंतरच समजेल.

## राष्ट्रवादीच्या जिल्हा सहसंपर्कमंत्रीपदी बनसोडे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची शहर जिल्हा आढावा बैठक नुकतीच वरळी मुंबई येथे पार पडली. या बैठकीत सोलापूर शहर व जिल्ह्यातील सामाजिक सामाजिक समीकरण पाहता सोलापूर शहर व जिल्ह्यासाठी संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या जोडीला सहसंपर्क मंत्री म्हणून विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी केली, असता या मागणीनुसार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तात्काळ दखल घेत शहर जिल्ह्यासाठी सहसंपर्क मंत्री म्हणून अण्णा बनसोडे यांची निवड केली.

या निवडीनंतर सोलापूर जिल्ह्याच्या वतीने ग्रामीण जिल्हाध्यक्ष उमेश पाटील तसेच शहरच्या वतीने जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेशचे उपाध्यक्ष किसन जाधव प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, तौफिक शेख यांनी अण्णा बनसोडे यांचा सत्कार केला. यावेळी अण्णा बनसोडे म्हणाले, आगामी महापालिका जिल्हा परिषद पंचायत समिती या सर्व निवडणुकीमध्ये कृषीमंत्री दत्तात्रय भरणे संपर्क मंत्री यांच्याबरोबर सहसंपर्क मंत्री म्हणून निवडणुकीमध्ये सक्रीय सहभाग नोंदवणार असून येणाऱ्या काळामध्ये सर्व पदाधिकाऱ्यांचे बैठका घेऊन या निवडणुकीचा बाबतीत आढावा घेणार आहे.



## ५० वर्षे रंगभूमीची सेवा करण्याचे भाग्य मिळाले : सुशीला व्हनसाळे

### ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धेचे उत्साहात उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

नाट्यकलेच्या क्षेत्रामध्ये गेल्या पन्नास वर्षापासून मी कार्यरत आहे. मराठी आणि हिंदी अशा दहा सिनेमांमध्ये भूमिका केल्या. नटराजाची सेवा गेल्या पन्नास वर्षापासून अखंड सुरू असल्याचे मत ज्येष्ठ नाट्य कलावंत सुशीला व्हनसाळे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य परिषदेच्या वतीने हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी व्हनसाळे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाट्य परिषद महानगर शाखेचे अध्यक्ष प्रा.अजय दासरी होते. यावेळी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, मराठी रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे सदस्य गुरु वठारे, परीक्षक मधुरा टापरे, दीप चहांदे, सुधीर सेवेकर, समन्वयक अमोल धाबळे उपस्थित होते.

वेदांत करपे लिखित मनमंदिरा हे दोन अंकी नाटक सादर करण्यात आले. या नाटकाचे दिग्दर्शन संकेत कुलकर्णी यांनी केले होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पंढरपूरच्या वतीने हे नाटक सादर करण्यात आले. नाटकामध्ये निवृत्तीनाथाची भूमिका संकेत कुलकर्णी यांनी केली होती. तर सखुबाई -आज्ञा कवडे, मिराबाई - विनया उत्पात, काशिनाथ - नाना दत्तात्रेय जगताप, विकास वेदांत करपे, जनाई ऋतुजा लाड, ममता - आरती गायकवाड, राकेश कौस्तुभ देवकर, वारकरी - रेणुका बडवे, अपूर्वा सासवडे, दिलीप कोरके, प्रकाश योजना, प्रतीक कसबे, विश्वेश्वरय्या स्वामी. जाधव, नेपथ्य- श्रावण डावरे. सूत्रसंचालन अभीज भानप यांनी केले. तर आभार समन्वयक अमोल ढाबळे यांनी मानले. नाट्यरसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना विषेशतः मौजे अकोलेकाटी ग्रामपंचायत, तालुका उत्तर सोलापूर हद्दीतील लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**: डि व सब डि।। सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, मौजे अकोलेकाटी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. २६६/१+२६६/२ यापैकी साई नगर मधील बिनशेती प्लॉट खालील प्रमाणेः

**१) प्लॉट नंबर** : ०८ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १०९, दक्षिणेसः प्लॉट नं. ०९, उत्तरेसः प्लॉट नं, ०७ तसेच **२) प्लॉट नंबर** : ०९ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १०८, दक्षिणेसः प्लॉट नं. १०, उत्तरेसः प्लॉट नं. ०८ तसेच **३) प्लॉट नंबर** : १० क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १०७, दक्षिणेसः प्लॉट नं. ११, उत्तरेसः प्लॉट नं. ०९ तसेच **४) प्लॉट नंबर** : ११ क्षेत्र ९६.०५ चौ.मी. अथवा १०३३.८२ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः अंतर्गत रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. ६, दक्षिणेसः अंतर्गत रस्ता, उत्तरेसः प्लॉट नं. १० तसेच **५) प्लॉट नंबर** : १०६ क्षेत्र ९६.०५ चौ.मी. अथवा १०३३.८२ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः प्लॉट नं. ११, पश्चिमेसः अंतर्गत रस्ता, दक्षिणेसः अंतर्गत रस्ता, उत्तरेसः प्लॉट नं. १०७ तसेच ६ प्लॉट नंबरः १०७ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः प्लॉट नं. १०, पश्चिमेसः अंतर्गत रस्ता, दक्षिणेसः प्लॉट नं. १०६, उत्तरेसः प्लॉट नं. १०८ तसेच १) प्लॉट नंबरः १०८ क्षेत्र ७४.५८ चौ.मी. अथवा ८०१ चौ. फुट यांसी चतुः सीमाः पूर्वेसः प्लॉट नं. ०९. पश्चिमेसः अंतर्गत रस्ता, दक्षिणेसः प्लॉट नं. १०७, उत्तरेसः प्लॉट नं. १०९

सदर नमूद सातही प्लॉट जागा मागरेट / मारगेट मनोहर सूर्यवंशी व मायकल मनोहर सूर्यवंशी व जानी मनोहर सूर्यवंशी उर्फ मार्शल मनोहर सूर्यवंशी यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून त्यांनी त्यांच्या वैयक्तिक अडचणीचे निरसन करण्याकरिता सदर प्लॉट जागा आमचे अशिलांना कायम खुषखरेदी करून देण्याचे ठरवून आमच्या अशिलांकडून कांही इसारा रक्कम स्विकारले आहेत व तसा इसारा पावती दस्त लिहून दिला आहे. तसेच सदर प्लॉट जागा निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद प्लॉट जागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, पोटगी, टाच, सरकारी व निम सरकारी बँक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा असल्यास किंवा दान, बक्षीस, वहिवाट, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, जप्ती, मृत्यूपत्र, वारसपत्र, अधिकारपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क दिल्यास किंवा हस्तांतरण केले असल्यास अथवा सदर जागेबाबत कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली. सदरची खरेदीपूर्वजाहीर नोटीस दिली. तारीखः ०७/११/२०२५

**सही/-**
**अ‍ॅड. सुनिल भ. कांबळे**
एम.ए.एल.एल.बी.
२२, शिवाजी नगर, बाळे, पुणे रोड,
सोलापूर - ४१३२५५ **मो.नं. ९७६४१०६३४२**
**अशिलातर्फे अ‍ॅडव्होकेट**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

प्रस्तुत जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस विशेषतः बार्शी शहर, म्यु. पल हद्दीतील बिनशेती खुला प्लॉट तालुका बार्शी व जिल्हा सोलापूर येथील व आसपासचे सलग्न तालुक्यातील व परिसरातील तमाम लोकांना कळविण्यात येते की,

तालुका बार्शी पैकी बार्शी शहर, म्यु. पल हद्दीतील बिनशेती खुला प्लॉट गट नं. ८८८/१४ याचे क्षेत्र १.९५०० चौ. मी., आकार ९रू. ७५ पैसे, मोजमापे पूर्व बाजुची १५.०० मिटर असा प्लॉट मिलिंद गोकुळदास मिरगणे याचे खरेदी मालकीचे व कब्जे वहिवाटाची जमीन असून याची चतुःसिमा पूर्वेस- प्लॉट नं. १३, दक्षिणेस-रस्ता, पश्चिमेस- रस्ता व उत्तरेस-प्लॉट नं. ७ येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक बिनशेती खुला प्लॉट आतील सर्व झाडझुडुप, दगड, माती, तदंगभुत वस्तु हक्कासह.

वर नमुद बिनशेती खुला प्लॉट हि मिलिंद गोकुळकदास मिरगणे यांचे खरेदी मालकीची आहे. आज रोजी मिलिंद गोकुळदास मिरगणे यांचे नाव मालकी हक्की मालमत्ता हक्कापत्रकी नाव दाखल आहे व नमुद बिनशेती खुला प्लॉट प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे.

सदरची मिळकत मिलिंद गोकुळकदास मिरगणे यांनी त्यांचे प्रापंचिक, कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास विक्री करणेचे ठरविलेले आहे व आमचे अशिलांनी सदरची मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसा विक्री संबंधीचा व्यवहारही उभयंतामध्ये ठरलेला आहे. व सदरची मिळकत ही निर्बंध, निजोखमी, बिनबोजाची, स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याची खात्री, ग्वाही प्लॉट मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

याउपर हि वर नमुद मिळकत संदर्भात कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, खंडपत्र, बटईपत्र, आग्रहक्क, पोटगीबोजा, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १०(दहा) दिवसांचे आत कागदपत्रासह लेखी स्वरूपात आमचे कार्यालयात येऊन समक्ष भेटुन खात्री करून द्यावी. वर नमुद मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकतही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमु मिळकतही समजुन अथवा त्यांनी तो जाणीव पुर्वक स्वईच्छेने सोडुन दिला असे समजुन आमचे अशिल व प्लॉट मालक आसपास ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहुन कोणाचीही, कसलीही, कोणतीही प्रकारची तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होवु नये म्हणून ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे. ता. ०७/११/२०२५

**सही/-**
**अ‍ॅड. सुधीरकुमार प्रभाकर होनमुटे**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
**मो.नं. ९८६०५६९७१८**
अशिलातर्फे अ‍ॅडव्होकेट

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूरातील तमाम लोकांना, विशेषतः बुधवार पेठ हद्दीतील आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व रहिवाशांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : डि व सब डि. सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे बुधवार पेठ हद्दीतील सिटी सर्व्हे नं.८९०७/पी/१०ब यासी म्यु.घर नं.१०८ यासी सो.म.पा. मिळकत नंबर ०४०८०२ असा असून यासी क्षेत्र ७४२ चौ.मी. जागेत तळमजला एक अल्टरेशन रूम, एक किचन रूम, फॅमिली रूम, स्टोअर कम रूम सर्व सोयीने असलेली घरजागा व जीना असे एकूण ७५ चौ.मी.चे बांधकाम आर.सी.सी. पद्धतीने व उर्वरित खुलीजागा आहे. सदर जागेची चतुःसिमा पुढील प्रमाणे :

**पूर्वेस** : सिटी सर्व्हे नं.८९०७-पी/१०/ओ **दक्षिणेस** : ३० फूट रस्ता
**पश्चिमेस** : सिटी सर्व्हे नं.८९०७-पी/१२ व ८९०७/पी/४
**उत्तरेस** : सिटी सर्व्हे नं.८९०७-पी/३ व ८९०७/पी/२

सदर मिळकत ही **१) श्री. दत्तात्रय शंकर वल्हे २) श्री. गजानन भाऊराव चव्हाण ३) श्री. महेंद्र नामदेवराव सरोदे ४) अफरोजखान अनसारखान पठाण ५) श्री. हर्षल शेषेराव वाघमारे** यांच्या मालकी, कब्जे, वहिवाटीची असून सदर मिळकत ही आमचे अशिलाना कायम खूशखरेदी देण्याचे ठरवून दिनांक ०७/११/२०२५ रोजी तोंडी कायम खूष खरेदी देण्याचे ठरले आहे. इसारपोटी काही रक्कम स्विकारली आहे.

सबब वर नमूद मिळकती विषयी कोणाचा वाद, वहिवाट, करार, मार्गेज, इसारा, कर्ज व इतर कोणत्याही प्रकारचे हित संबंध असतील तर खालील नमूद वकीलाकडे योग्य त्या कागदपत्रानिशी/पुराव्यानिशी ७ दिवसाच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद मिळकती निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सबंधितानी नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली दिनांक ०८/११/२०२५

**सही/-**
**अ‍ॅड. सहदेव रघुनाथ भडकुंबे**
बी.कॉम. एलएल.बी.,
५६ रविवार पेठ, गुजरवस्ती सोलापूर- ४१३००२
**मो.नं. ९०२८९६६३१७**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि, व ता. बार्शी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील प्लॉट जागा याचा गट नं. ११७७/३/६ याचे क्षेत्रफळ ९५.७१ चौ. मी. याचे चौ. फुट १.२९. ८३ आहे याचा बिनशेती आकार रू. ६३.०० पैसे आहे. याचे मोजमाप पुर्व बाजु ८.०१ मी, दक्षिण प्लॉट नं. ५, पश्चिम बाजू मीटर ८.००, उत्तर बाजू मीटर ११.९५ आहे. यासी चतुःसीमा पुर्वेस-प्लॉट नं. १ व २, दक्षिणेस-प्लॉट नं. ५, पश्चिमेस ९.०० मीटर रूंदीचा रस्ता, व उत्तरेस- प्लॉट नं. ७ आहे. या मोजमापात आर. सी.सी. स्वरूपाचे बांधकाम याचे क्षेत्रफळ ७६.७५ चौ. मी. आहे. याचे चौ. फुट ८२७.०० आहे. सदर प्लॉटचे पाणी वागणूक पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक प्लॉट जागा आतील बांधकाम व सर्व तद्‌गंभूत वस्तुसह.

सदर नमूद मिळकत ही प्रशांत महादेव जांभळे रा. मारूती शेजारी, सुभाष नगर, बार्शी ता. बाशी, जि. सोलापूर यांचे स्वकष्टार्जित स्वतंत्र खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची असून रेकॉर्डला त्यांचे नावाची नोंद असलेली मिळकत आहे. सदर मिळकत त्यांनी त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर अडचणीकरीता व इतर कायदेशीर गरजेकरीता विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर मिळकतीबाबत आमचे अशिलासोबत प्रशांत महादेव जांभळे यांनी व्यवहार केलेला आहे व सदर व्यवहारापोटी, इसारादाखल रक्कमही स्विकारलेली आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही अधिकार, हक्क म्हणजे इसारपावती, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही हक्क असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात ०८ दिवसात लेखी हरकत नोंदवावी. कागदोपत्री पुराव्याशिवाय हरकत आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदी करतील. मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस असे ता. ०७/११/२०२५

**सही/-**
**अ‍ॅड. शंकर पांडुरंग ननवरे**
**अ‍ॅड. विजय सुरेश काकडे**
ऑफिस पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शॉपिंग सेंटर गाळा नं. ५०, ता. बार्शी, जि. सोलापूर
**मो.नं. ८१४९०६०००८, ९४०३५५१०९५**
अशिलातर्फे अ‍ॅडव्होकेट

Yashoda Shikshan Prasarak Mandal's
**Sojar College of Pharmacy, Khandvi.**
Tal: Barshi, Dist: Solapur. (MS) 413401 Ph: 02184-297000

**ADMISSION NOTICE: 2025-26**

Application are invited from the eligible candidates for
**FIRST YEAR B. PHARMACY**
Admission for the academic year 2025-26 for probable Vacancies after CAP rounds.
Detail schedule of admission process is displayed on college notice board & college website.

**CONTACT**
**Sojar College of Pharmacy, Khandvi,**
PH: (02184) 297000, Mo. 9604397996 / 9420702085 / 9923332316
**E-mail: sojarcop@gmail.com**
**Web Site: www.sojarcop.edu.in**

**PRINCIPAL** **PRESIDENT**

## विभाग सार्वजनिक वाचनालय

**१५१/५, रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर ४१३००५**

**५० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि २३/११/२०२५ रोजी सकाळी १०:३० वा संस्थेच्या विणकर सभागृहात बोलविण्यात येत आहे तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सभा दि २०/१०/२०२४ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे
२) सन २०२४-२५ या सालाचे ताळेबंद पत्रक तसेच उत्पन्न व खर्चाची माहिती घेऊन त्यास मंजुरी देणे
३) सन २०२४-२५ या सालाचे ऑडीट रिपोर्टची माहिती घेऊन त्यास मंजुरी देणे
४) सन २०२५-२६ या सालाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे
५) सन २०२५-२६ या वर्षाकरिता लोकल ऑडिटरची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे
६) मा खासदार यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून वाचनालयाच्या वाचकांसाठी इमारतनिधी मिळविणेबाबत
७) संस्थेचे घटना नियमावलीत बदल करणे
८) मा. अध्यक्षसाहेब यांच्या पूर्व परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय

**ठिकाण :- सोलापूर**
**दिनांक :- ०४/११/२०२५**

| सही/- | सही/- |
| --- | --- |
| पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी | अरविंद दत्तात्रय चित्री |
| अध्यक्ष | कार्यवाह |

**टिप :-**
१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल त्या वेळेस कोरमची आवश्यकता नाही.
२) सभासदांनी मागील येणे वर्गणी थकबाकी आठ दिवस अगोदर संपूर्णपणे भरावी.
३) संस्थेच्या सभासदांनी प्रश्न लेखी स्वरुपात सभेपूर्वी आठ दिवस अगोदर कार्यालयात सादर करावेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### गतविजेता विदर्भ-ओडिशा रणजी लढत आजपासून

**नागपूर** : प्रतिष्ठेच्या रणजी करडंक क्रिकेट स्पर्धेत एलिट अ गटात शनिवारपासून जामठ्याच्या व्हीसीए स्टेडियमवर गतविजेता विदर्भ आणि ओडिशा यांच्यादरम्यान चौथ्या फेरीचा साखळी सामना खेळला जाणार आहे. सध्या एलिट अ गटाच्या गुणतालिकेत झारखंड १५ गुणांसह अव्वल स्थानावर, विदर्भ १३ गुणांसह दुसऱ्या, आंध्र प्रदेश ९ गुणांसह तिसऱ्या थानावर, तर बडोदा ८ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. विदर्भाला पुन्हा अव्वल स्थान मिळविण्यासाठी ओडिशाविरुद्ध मोठा विजय नोंदविणे आवश्यक आहे. विदर्भाचा गत तामिळनाडूविरुद्धचा सामना अनिर्णीत राहिला, त्यामुळे विदर्भाची गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर घसरण झाली. आता कर्णधार अक्षय वाडकरच्या नेतृत्वाखालील विदर्भ संघाला ओडिशाविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी करावी लागणार आहे. तसेही ओडिशा संघ आतापर्यंत संघर्ष करत आला आहे. ओडिशाने आतापर्यंतची आपली तिन्ही साखळी सामने गमावले असून एका गुणासह ओडिशा आठ संघांच्या एलिट अ गटात सातव्या स्थानावर आहे. ■

### ऑस्ट्रेलियन माजी फुटबॉल खेळाडूचा भारतीय संघात समावेश

**नवी दिल्ली** : ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणारा माजी भारतीय फुटबॉल खेळाडू रायन विल्यम्सचा भारतीय फुटबॉल संघात समावेश करण्यात आला आहे. रायन विल्यम्सने खूप पूर्वीच आपले ऑस्ट्रेलियन नागरिकत्व सोडले होते आणि आता त्याने अधिकृतपणे भारतीय नागरिकत्व स्वीकारले आहे. बंगळुरू एफसीमध्ये त्याच्यासोबत खेळणारा दिग्गज भारतीय फुटबॉल खेळाडू सुनील छेत्रीने विल्यम्सचा भारतीय पासपोर्ट त्यांना सादर केला. २०२३ मध्ये बंगळुरू एफसीमध्ये सामील होण्यापूर्वी रायन विल्यम्स पूर्वी इंग्रजी क्लब पोर्ट्समाऊथ आणि फुलहॅमकडून खेळला होता. रायन विल्यम्सला त्याचा भारतीय पासपोर्ट सादर करण्यापूर्वी सुनील छेत्रीने त्याला भारतीय संस्कृती आणि स्ट्रीट फूडशी संबंधित काही प्रश्न विचारले. विल्यम्सने या सर्व प्रश्नांची उत्तरे सहजतेने दिली, देशाशी सहजपणे ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ३१ वर्षीय मिडफिल्डरचा जन्म ऑस्ट्रेलियातील पर्थ येथे झाला होता, जिथे त्याने २० वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील पातळीवर ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले आहे. भारतीय फुटबॉल संघ १८ नोव्हेंबर रोजी ढाका येथे बांगलादेशविरुद्धच्या एएफसी आशियाई कप पात्रता फेरीत आपला पुढचा सामना खेळणार आहे.

### एम.एस. धोनी पुढील वर्षी सीएसकेकडून खेळणार

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेटचा दिग्गज महेंद्रसिंग धोनी २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये पाच वेळा



विजेता चेन्नई सुपर किंग्जकडून (सीएसके) खेळणार आहे, असे फ्रॅन्चायझीचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी शुक्रवारी सांगितले. २००८ मध्ये लीग सुरू झाल्यापासून सीएसकेचा पर्याय असलेला धोनी २०२५ च्या आयपीएलच्या मध्यात पुन्हा कर्णधार म्हणून परतला होता, नवनियुक्त कर्णधार, सलामीवीर ऋतुराज गायकवाड कोपराच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला होता. सीएसकेसाठी हा एक विसरण्यासारखा हंगाम होता कारण त्यांनी १४ सामन्यांपैकी केवळ चार विजयांसह गुणतालिकेत तळाशी संपवले होते. धोनी खेळण्याची शक्यता आहे, ही सध्याची स्थिती आहे. आम्हाला वाटते की तो या आगामी आयपीएलमध्ये खेळेल, असे विश्वनाथन यांनी शुक्रवारी सांगितले. २०१६ आणि २०१७ च्या हंगामासाठी फ्रॅन्चायझीच्या निलंबनाशिवाय, धोनी सीएसके संघात कायमचा सहभागी आहे. आयपीएल २०२६ मध्ये पुनरागमन हा त्याचा सीएसकेसोबतचा १७ वा आणि स्पर्धेत एकूण १९ वा हंगाम असेल. आतापर्यंत, धोनीने सीएसकेसाठी २४८ सामने खेळले आहेत, ४,८६५ धावा केल्या आहेत आणि २०१०, २०११, २०१८, २०२१ आणि २०२३ मध्ये सीएसकेचे नेतृत्व करत पाच आयपीएल जेतेपदे जिंकली आहेत. एकूणच, धोनीने २७८ सामन्यांमध्ये ५४३९ धावा केल्या आहेत. त्याच्या नावावर १५८ झेल आणि ४७ यष्टीचित आहेत.

### २० नोव्हेंबर रोजी झुरिचमध्ये फिफा प्लेऑफचा ड्रॉ काढणार

**इयुरिच** : ४८ संघांच्या २०२६ विश्वचषकातील शेवटच्या सहा प्रवेशिका निश्चित करण्यासाठी फिफा २० नोव्हेंबर रोजी झुरिचमध्ये प्लेऑफ सामन्यांसाठी ड्रॉ आयोजित करणार आहे, असे जागतिक फुटबॉल संघटनेने शुक्रवारी सांगितले. युरोपियन गटामध्ये १६ संघ असतील- कदाचित चार वेळा विजेता इटलीसह - पुढील जून आणि जुलैमध्ये अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये होणाऱ्या स्पर्धेत चार स्थानांसाठी खेळतील. मेक्सिको आयोजित करणार असलेल्या इंटरकॉन्टिनेंटल प्लेऑफमध्ये युरोपबाहेरील सहा संघ दोन प्रवेशिकांसाठी खेळतील. बोलिव्हिया आणि न्यू कॅलेडोनिया आधीच पात्र ठरले आहेत. सर्व प्लेऑफ सामने २६ ते ३१ मार्च दरम्यान नियोजित आहेत. ■

# भारत मालिका विजयाच्या उंबरठ्यावर


## भारताचे फलंदाजीत सातत्य राखण्याचे लक्ष्य ● ऑस्ट्रेलियासमोर भारतीय फिरकीचे आव्हान

◆ **ब्रिस्बेन, ७ नोव्हेंबर**

भारतीय टी-२० क्रिकेट संघ विदेशात आणखी एका मालिका विजयाच्या उंबरठ्यावर आहे. शनिवारी येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यान पाच टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना खेळला जाणार आहे. या मालिकेत सध्या भारत २-१ ने आघाडीवर असून भारताला विजयाची नामी संधी आहे, परंतु त्याकरिता भारताला आपल्या फलंदाजीतील विसंगती दूर करण्याच प्रयत्न करावा लागेल आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा शेवट विजयाने करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.



सूर्यकुमार यादव



मिचेल मार्श

**सूर्यकुमारचा विजयाची परंपरा कायम राखण्याचा प्रयत्न**

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिका न गमावण्याची १७ वर्षांची परंपरा कायम राखण्याचा कसोशीने प्रयत्न करणार आहे. शुभमन गिल व कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित केले जाईल, तर पुढील वर्षी भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी दोन्ही संघ शेवटच्या वेळी आमने-सामने येतील, तेव्हा ऑस्ट्रेलिया भारताच्या फिरकी गोलंदाजांच्या आव्हानाचा सामना करण्याचा प्रयत्न करेल.

भारताने गत सामन्यात उच्चम व्यूहरचनेची जाणीव दाखवली, अवघड काराराच्या खेळपट्टीवर जुळवून घेतले. गिलने १४ षटकांत २ बाद १२१ धावांची आशादायक सुरुवात केली, परंतु नंतरच्या काळात झालेल्या पडझडीमुळे संघाने १५ धावांत चार फलंदाज गमावले.

**गिल उच्च कामगिरी करण्यास उत्सुक**

उपकर्णधार गिलचे सात डाव अर्धशतकाशिवाय राहिले आहेत, मात्र चौथ्या टी-२० मध्ये त्याने ४६ धावा काढून आपल्याला सूर गवसल्याचे दाखवून दिले. तेव्हा सलामीवीर गिल संघ व्यवस्थापनातील चिंता कमी करण्यासाठी आणि उच्च कामगिरी करण्यासाठी उत्सुक असेल.

सूर्यकुमारने संपूर्ण मालिकेतही चमकदार कामगिरी दाखवली आहे, परंतु त्याला त्याच्या सुरुवातीचे रूपांतर करण्यात संघर्ष करावा लागला आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यापूर्वी कर्णधाराकडून अधिक मुक्तपणाने फलंदाजी करण्याची व आदर्श नेतृत्व करण्याची अपेक्षा केली जाईल.

तिलक वर्माला अद्याप त्याची लय सापडलेली नाही. यष्टिरक्षक-फलंदाज जितेश शर्मावरही दबाव असेल. गत दोन सामन्यांमध्ये संजू सॅमसनपेक्षा पुढे खेळला आहे परंतु अद्याप त्याचा कोणताही मोठा प्रभाव पडलेला नाही.

**अष्टपैलू खेळाडूंनी संघाला बळकटी**

अभिषेक शर्माने मात्र जगातील अव्वल क्रमांकाचा टी-२० फलंदाज म्हणून आपल्या प्रतिष्ठेनुसार कामगिरी केली आहे. भारताच्या तळाच्या फळीनेही प्रभावी कामगिरी केली आहे. गत सामन्यात अक्षर पटेलने ११ चेंडूत २१ धावा केल्या होत्या. अष्टपैलू खेळाडूंच्या उपस्थितीमुळे संघाला बळकटी मिळाली आहे.

गोलंदाजी विभागात अर्शदीप सिंगने पुन्हा एकदा भारतासाठी आपली योग्यता सिद्ध केली आहे, त्याने चार बळी टिपले व जसप्रीत बुमराहसोबत प्रभावी जोडी निर्माण केली आहे. कुलदीप यादवच्या अनुपस्थितीतही वरुण, अक्षर व वॉशिंग्टन ही फिरकी त्रिकूट भारतासाठी एक मोठी ताकद आहे. शिवम दुबे व वॉशिंग्टन दोघांनीही फलंदाजी आणि गोलंदाजीत महत्त्वाची कामगिरी केली आहे.


ऑस्ट्रेलियासाठी, चौथ्या टी-२० सामन्याने पुन्हा एकदा दर्जेदार फिरकी गोलंदाजांविरुद्ध त्यांची कमकुवतपणा उघडकीस आणला. कॅरारा ओव्हल येथे झालेल्या सामन्यात वरुण चक्रवर्ती, अक्षर व वॉशिंग्टन सुंदरने दहा षटकांच्या आत सहा बळी घेतले.

> **भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० सामना**
>
> **स्थळ** : गॅबा क्रिकेट स्टेडियम, ब्रिस्बेन
> **वेळ** : दुपारी १.४५ वाजतापासून
> **थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

पाहुण्या संघाची फलंदाजी कर्णधार मिशेल मार्श, मार्कस स्टोयनिस व टिम डेव्हिडवर जास्त अवलंबून होती. ट्रॅव्हिस हेडच्या अनुपस्थितीमुळे गत सामन्यात त्यांच्या आशा मावळल्या. जोश हेझलवूडची अनुपस्थिती सुद्धा जाणवली आहे

सलामीवीर म्हणून अष्टपैलू मॅथ्यू शॉर्ट प्रभाव पाडण्याची संधी गमावली असून तो शनिवारी कामगिरीत सुधारणा करण्यास उत्सुक असेल. नॅथन एलिस व अॅडम झॅम्पाने बरीच जबाबदारी घेतली आहे, परंतु बेन द्वारशुइस चौथ्या टी-२० मध्ये एकही बळी घेतला नाही. यजमान संघ अंतिम सामन्यात महली बियर्डमनला पदार्पण देण्याचा विचार करू शकतो. ◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र सरकारकडून मंधाना, जेमिमाह, राधाला प्रत्येकी २.२५ कोटींचे बक्षीस




जेमिमाह रॉड्रिग्जचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

◆ **मुंबई, ७ नोव्हेंबर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्यातील भारतीय महिला विश्वचषक विजेत्या संघातील सदस्य स्मृती मंधाना, जेमिमाह रॉड्रिग्ज आणि राधा यादव यांचा सत्कार केला आणि त्यांना प्रत्येकी २.२५ कोटी रुपयांचे रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

दक्षिण मुंबईतील मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थान वर्षा येथे झालेल्या सत्कार कार्यक्रमात फडणवीस यांनी या तिघींना 'महाराष्ट्राचा अभिमान' म्हटले आणि संघाच्या विजयामुळे तरुण मुलींना खेळात रस घेण्यास आणि जागतिक व्यासपीठांवर चमकण्यास प्रेरणा मिळेल, असे सांगितले.

महिला क्रिकेटच्या प्रगतीसाठी फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांचेही कौतुक केले.

क्रिकेट संघाचे प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांना २२.५ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तर सपोर्ट स्टाफमधील प्रत्येक सदस्याला ११ लाख रुपये देण्यात आले.

गोलंदाजी प्रशिक्षक अविष्कर साळवी, माजी दिग्गज क्रिकेटपटू डायना एडुलजी, विश्लेषक अनिरुद्ध देशपांडे, लॉजिस्टिक्स समन्वयक अपर्णा गंभीरराव आणि सपोर्ट स्टाफ सदस्य मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे आणि ममता शिरुरल्ला उपस्थित होते. यावेळी उपकर्णधार स्मृती मंधानाने राज्यातील जनतेचे आभार मानले. गत दोन वर्षांत अढळ लक्ष केंद्रित आणि लवचिकतेबद्दल मुझुमदार यांनी खेळाडूंचे कौतुक केले. डावखुरा फिरकी गोलंदाज राधा यादव म्हणाली की पहिल्यांदाच तिचा अशा प्रकारे सत्कार करण्यात आला. मला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचा मला खरोखर अभिमान वाटते, असे रॉड्रिग्ज म्हणाली. ◂(वृत्तसंस्था)

# 'बीगसी'च्या साक्षी सुराला सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे आयोजित आंतरविभागीय पॉवर लिफ्टिंग आणि वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या साक्षी सूरा हिने ४७ किलोग्रॅम वजन गटात सुवर्णपदक पटकाविले.

ऑर्चीड अभियांत्रिकी मध्ये झालेल्या स्पर्धेत तिने ही कामगिरी केली. तिला जिमखाना चेअरमन प्रा. अमित वडवेराव यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने, अध्यक्ष इंजिनियर रवींद्र गायकवाड यांनी अभिनंदन केले.

### कोको गॉफला हरवून सबालेंका अंतिम चारमध्ये

**रियाध** : अव्वल मानांकित बेलारूसच्या आर्यना सबालेंकाने डब्ल्यूटीए फायनलमध्ये सलग तिसरा गट-टप्पा विजय मिळवला आणि कोको गॉफला ७-६ (५), ६-२ असे हरवले आणि या प्रक्रियेत तिच्या अमेरिकन प्रतिस्पर्ध्याला स्पर्धेतून बाहेर काढले. सबालेंकाच्या विजयामुळे जेसिका पेगुला बेलारूसी क्रमांक १ सोबत गटातून उपांत्य फेरीत पोहोचली. ■

# वेस्टझोन कराटे स्पर्धेसाठी सांगोल्याच्या चौघांची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ नोव्हेंबर -**

नाशिक येथे कराटे इंडिया ऑर्गनायझेशनच्या मान्यतेने व कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या आयोजनाने पाचव्या वेस्ट झोन कराटे स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेमध्ये सांगोल्याच्या आरोही सावंत, वैष्णवी गेजगे, रोहित अरबळी व सिद्धार्थ माने या चार खेळाडूंचा समावेश आहे. हे खेळाडू सुनील वाघमारे, श्रावणी वाघमारे, निजेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली वाघमारे कराटे क्लासमध्ये रोज सराव करत आहेत. त्यांचे कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सिंहन संदीप गाडे व स्पोर्ट्स कराटे डो असोसिएशन सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष जी.के.वाघमारे यांनी अभिनंदन केले.

# श्री चरणीला आंध्र प्रदेश सरकारकडून रोख बक्षीस, जमीन अन् नोकरी देण्याची घोषणा

◆ **अमरावती, ७ नोव्हेंबर**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी २०२५ च्या महिला क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघाच्या सदस्या एन. श्री चरणीला २.५ कोटी रुपये रोख बक्षीस, १ हजार चौरस फूट घराचा भूखंड आणि गट-१ मध्ये नोकरी देण्याची घोषणा केली.



श्री चरणीचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, मिताली राज

मुख्यमंत्र्यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार मिताली राज यांच्यासोबत त्यांच्या कॅम्प ऑफिसमध्ये भेट घेणाऱ्या चरणीचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी महिला विश्वचषक विजेत्या, टीम इंडिया (महिला) सदस्या आणि तेलुगू मुलगी श्री चरणीला मोठे बक्षीस जाहीर केले. मुख्यमंत्र्यांनी कडप्पा येथे घर बांधण्यासाठी २.५ कोटी रुपये रोख बक्षीस आणि १,००० चौरस फूट भूखंड देण्याचा निर्णय घेतला.. याशिवाय त्यांनी तिला गट-१ श्रेणीची नोकरी देण्याची घोषणा केली. महिला विश्वचषक जिंकून भारतीय महिलांची क्षमता सिद्ध झाली आह, असे मुख्यमंत्री नायडू म्हणाले. तत्पूर्वी, कडप्पामध्ये जन्मलेल्या या क्रिकेटपटूचे गन्नवरम विमानतळावर आंध्र क्रिकेट संघटनेचे (एसीए) अध्यक्ष के. शिवनाथ, गृहमंत्री वंगलापुडी अनिता आणि इतरांनी मोठ्या थाटामाटात स्वागत केले. ◂(वृत्तसंस्था)



# गांधी नाथा विद्यालयात क्रीडा स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर**

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान संचलित गांधी नाथा रंगजी विद्यालयात आंतर शालेय क्रीडा स्पर्धेस सुरुवात झाली. याचे उद्घाटन मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी, स्मिता रणदिवे व क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांच्या उपस्थितीत झाले.

या स्पर्धेत डॉजबॉल, आट्यापाट्या, रनिंग, कबड्डी, बुक बॅलेन्स, बादलीत चेंडू टाकणे, स्लो सायकल या खेळांचा समावेश आहे. या वेळी क्रीडा समिती प्रमुख विजया मल्लाडे, वर्षा शिंदे, मिनाक्षी माने, रूपाली लामखाने यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हा, विभागीय व राज्य आणि नवोदित खेळाडू अंजली क्षीरसागर, तनुश्री बद्दुरकर, सान्वी कदम, अमृता जेंबगी, अनिकेत शिंदे, श्री क्षीरसागर, अक्षता रणसुबे, समृद्धी पुजारी या खेळाडूंचा गौरव करण्यात आला.



# विभागीय मैदानी स्पर्धेत महर्षी प्रशालेच्या मुलींनी दुहेरी मुकुट

### चार बाय शंभर व चारशे मीटर रिलेमध्ये प्रथम

**अकलूज, दि. ६ नोव्हेंबर-**

पुणे येथे झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत शंकरनगर येथील महर्षि प्रशालेच्या १९ वर्षांखालील मुलींनी ४ बाय १०० व ४०० मीटर रिले शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

पुणे येथील बालेवाडी झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलीनी ४ बाय १०० मीटर रिलेम ध्ये द्वितीय क्रमांक संपादिला.

यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रदिप पांढरे, अनिल मोहिते व दादासाहेब सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी साखर कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील, युवा नेते सयाजीराजे म ोहिते पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, स्थानिक प्रशाला समितीचे सभापती अँड.नितिनराव खराडे, मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी कौतुक करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**संघातील मुली: १९ वर्षांखालील** : अवनी नवगिरे, जान्हवी खांडवे, वैभवी ठोंबरे, साक्षी निकम, निता साठे व सिध्दी ठोंबरे. **१४ वर्षांखालील** : गिरीजा पालकर, अनुष्का शिंदे, वैष्णवी कांबळे, प्राजल सुर्यवंशी, आदिती काळे.



# आयएमएस, पानगलची विजयी सलामी

### शतक वर्षानिमित्त हॉकीचे सामने

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

हॉकीच्या शतक वर्षानिमित्त सुरू झालेल्या शालेय हॉकी स्पर्धेत आयएमएस व एम.ए. पानगल प्रशालेने विजयी सलामी दिली.

हॉकी या खेळाला १९२५ ते २०२५पर्यंत १०० वर्ष पूर्ण झाले आहेत. यानिमित हॉकी इंडिया व हॉकी महाराष्ट्र अंतर्गत हॉकी सोलापूर असोसिएशनच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित केले होते. यात हॉकी रॅली, सायकल रॅली, हॉकी क्वीझ व हॉकीचे सामने आयोजित केले होते. याचे उद्घाटन खो-खोचे आंतर राष्ट्रीय खेळाडू व माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांच्या हस्ते झाले.

यावेळी हॉकीचे १०० शतक वर्षे सेलिब्रेशन नियोजन संघटनेचे अध्यक्ष जरार कुरेशी यांनी केले. अजय चाबुकस्वार यांनी आभार मानले.

सलामीच्या सामन्यात इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलने मॉडेल पब्लिक स्कूलचा १-0ने पराभव केला. दुसऱ्या सामन्यात एम.ए. पानगल प्रशालेने मॉडेल पब्लिक स्कूलवर १-0 असा विजय मिळविला.

# जिल्हा कबड्डी स्पर्धा १३ नोव्हेंबरपासून

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

कुमार-कुमार आणि मुले व मुलींची जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धा १३ ते १५ नोव्हेंबर दरम्यान इंदिरा गांधी पार्क स्टेडियम येथे होईल. सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने श्रीराम स्पोर्ट्स क्लब यांच्या वतीने ही स्पर्धा मॅटवर होईल. मुलांसाठी ७५ किलो (वय २० वर्षांखालील १८.१.२००६ व त्यानंतर जन्मलेले) व मुलींसाठी ६५ किलो (वय २० वर्षांखालील २९.१२.२००५ त्यानंतर जन्मलेले) हे या स्पर्धेसाठी पात्र आहेत. नोंदणी केलेल्या संघाची १३ नोव्हेंबर रोजी स्पर्धेच्या ठिकाणी इंडेक्स वजन घेण्यात येईल. त्याकरिता आधार कार्ड, बोनाफाईड सर्टिफिकेट, शाळेचे निर्गम उतारा, इत्यादी सह संबंधित मंडळाचे खेळाडू वेळेवर उपस्थित राहावे. संपर्क : मरगु जाधव (मो. ९८९०५६११७१), सुवर्णा कांबळे (९८८१६९१७७९), मदनलाल गायकवाड (९८५००३९८८०).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पंढरपूर नगरपालिका विठ्ठल परिवार एकत्रित लढविणार

## भगिरथ भालके : येत्या दोन दिवसांत सहमतीने निर्णय जाहीर करणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ नोव्हेंबर -**

येत्या काळातील नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका विठ्ठल परिवारीतील सर्व नेते मंडळीं एकत्रित येवून सर्वांच्या सहमतीने योग्य उमेदवारांची निवड करुन लढविणार असल्याची माहिती विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा विठ्ठल परिवाराचे नेते भगिरथ भालके यांनी दिली.



येथील भालके यांच्या कार्यालयात पंढरपूर नगरपालिका निवडणूकी संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी शुक्रवारी (ता.७) दुपारी विठ्ठल परिवारातील नेते मंडळी,ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजिण्यात आली होती. त्याबैठकी नंतर माध्यमांशी बोलताना श्री.भालके यांनी बैठकी संदर्भात माहिती दिली. श्री.भालके म्हणाले,येत्या काळातील निवडणूकांसाठी विठ्ठल परिवारातील सर्व नेत्यांना आम्ही एकत्रित येण्याची विनंती केलेली होती. त्या पध्दतीने सर्व नेते मंडळींनी सकारात्म कता दाखविलेली आहे. पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाला जोडलेली २२ गावे, मोहोळ मतदार संघाला जोडलेली १७ गावांमधील मंडळींची बैठक शुक्रवारी (ता.७) आयोजिण्यात आलेली होती.

दरम्यान उद्या शनिवारी (ता.८) माढा मतदार संघाला जोडलेली आणि सांगोला मतदार संघाला जोडलेल्या पंढरपूर तालुक्यातील प्रमुख गावांमधील प्रमुख पदाधिकारी आणि शहरातील देखील इच्छुक उमेदवार सोडून जे वडिलधारी मंडळी जे भारतनानांपासून विठ्ठल परिवारात खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत अशा प्रमुख मंडळींशी चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर या बाबतीत येत्या दोन दिवसांमध्ये सकारात्मक निर्णय घेतला जाईल अशी माहिती विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भालके यांनी दिली.


**प्रमुख नेतेमंडळींसोबतच आपण असणार**
पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणूकीतील नगराध्यक्षपदाचा उमेदवार तसेच १८ प्रभागातून निवडणूक लढविणारे ३६ उमेदवारांबाबत विठ्ठल परिवारातील प्रमुख नेते मंडळीं जो निर्णय घेतील त्यांच्या बरोबर आपण असणार आहोत असे देखील यावेळी भगिरथ भालके यांनी सांगितले.

**जी चुकीची माणसे आहेत आणि त्या सत्ता कायमस्वरुपी उध्वस्त करणार :** यापूर्वी देखील विठ्ठल परिवारात फुट पाडायची, भांडणे लावायची आणि वेगवेगळ्या सत्ता हस्तगत करावयाच्या हे काही मंडळींचे काम होते. पण त्याला आळा घालण्याचे किंवा त्याचा कायमचा बंदोबस्त करण्याची भूमिका भारतनाना भालके यांनी त्या काळात घेतलेली होती. तीच भूमिका आम्ही सगळे विठ्ठल परिवारातील प्रमुख मंडळी एकत्रित येऊन घेऊ असा आपणाला विश्वास आहे. यामध्ये जी चुकीचे माणसे आमच्यामध्ये आहेत, जी आमच्या आमच्यात वेगवेगळ्या भूमिका घेऊन फुट पाडण्याचे काम करीत आहेत अशा मंडळींना आम्ही बाजुला करुन नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर आपले वर्चस्व राखण्याचा प्रयत्न करणाऱ्या मंडळींना निश्चितच आम्ही त्यांची जागा दाखवुन देवु असे देखील भालके यांनी सांगितले.

**विठ्ठल परिवारावर प्रेम करणाऱ्या तरुणांना संधी :** या बरोबरच आगामी सर्व निडणूकांमध्ये आम्ही तरुण आणि विठ्ठल परिवारावर मनापासून प्रेम करणाऱ्या विठ्ठल परिवारासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या मंडळींना संधी देणार असल्याचे देखील यावेळी श्री.भालके यांनी सांगितले.

**मंगळवेढ्याबाबत देखील अशीच भूमिका :** पंढरपूर शहर, तालुक्याप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीला सामोरे जाताना मंगळवेढा तालुक्या बाबत देखील आमच्या विठ्ठल परिवाराची सर्वांना बरोबर घेऊन, सर्वांशी विचारविनिमय आणि चर्चा करुनच निर्णय किंवा भूमिका घेण्याची अशाच प्रकारची भूमिका असणार आहे असा देखील खुलासा यावेळी श्री.भालके यांनी केला.

## महत्वाचे...



### पौर्णिमेनिमित्त रेश्मा दिवटेनी रेखाटली भगवान शंकराची रांगोळी

**सांगोला, दि.७ नोव्हेंबर -**

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त सांगोला शहरातील अंबिका देवी मंदिर परिसरात एकूण सहा ते सात उत्कृष्ट रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या. यामध्ये रेश्मा प्रशांत दिवटे यांनी भगवान शंकराची अत्यंत आकर्षक आणि कलात्मक रांगोळी काढली. भगवान शंकराचे उभे रूप दर्शवणारी ही रांगोळी पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती व या रांगोळीने विशेष लक्ष वेधून घेतले. पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर मंदिरात दिव्यांची सजावट, आरती व भजन कार्यक्रम पार पडले. आकर्षक रांगोळ्यांमुळे अंबिका देवी मंदिराचा परिसर अधिकच मंगलमय झाला होता.



### एक्सेल इंडस्ट्रीजकडून सलगर शाळेस दीड लाखांचे शैक्षणिक साहित्य

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेडकडून अक्कलकोट तालुक्यातील सलगर जि.प. मराठी शाळेस ४ लोखंडी कपाट, २० खुर्च्या, ४ टेबल आणि पुस्तके असे एकूण दीड लाख रुपयांचे साहित्य दिले. मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या प्रयत्नांतून VRTI यांच्याकडून शाळेसाठी विविध साहित्य देण्यात आले. मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांनी विशेष प्रयत्न करत एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीकडे ग्रंथालयात आवश्यक असणाऱ्या साहित्याची मागणी केली. याप्रसंगी मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांनी प्रास्ताविक केले. )कार्यक्रमाप्रसंगी एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेडचे प्रसाद दगडे, प्रसाद भोईर, हर्षदा दगडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा रुपाली म्हेत्रे, सदस्य बसलिंगप्पा भासगी उपस्थित होते. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक हणमंतराव गुंडरगी तसेच महिला शिक्षिका संध्या बशेट्टी, गोदाबाई पाटील, सोनाली भारती, मयुरी फुलारी उपस्थित होते.



### मनोज जरांगे-पाटील यांच्या हत्येचा कट रचणाऱ्यावर कारवाई करा

**मंगळवेढा, दि. ७ नोव्हेंबर-**

संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे मागणी करणारे निवेदन मंगळवेढा सकल मराठा समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिद्दे यांना देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील हे मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी सातत्याने लढा देत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली आहे. परंतु काही असामाजिक प्रवृत्तीकडुन त्यांच्या जिवीतास धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांमधुन समोर येत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी व जीवे मारण्याचा कट रचणाऱ्या आरोपीं विरूध्द कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. जरांगे पाटील यांच्या सुरक्षेचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक असलेली शासकीय सुरक्षा तात्काळ पुरविण्यात यावी अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे यावेळी मंगळवेढा तालुक्यातील सकल मराठा समाजाचे बांधव उपस्थित होते.

# सर्व्हर बंद असल्यामुळे ई-केवायसी होईना

## ●मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना; लाडक्या बहीणी वैतागल्या



ज्या महीलांचे पती, वडील व घटस्फोट झाला आहे, यांच्यासाठी या महिलांचा सांभाळ करणाऱ्या नातेवाईकाचे आधार कार्ड पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार असल्याचे महिला व बालकल्याण विभागाकडून सांगण्यात आले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा सर्व्हर व्यवस्थित सुरू नाही. यामुळे ई केवायसीच होत नाही. यामुळे महिलांमध्ये सध्या भीतीचे वातावरण आहे. यामुळे शासनाने ई केवायसीची मुदत वाढवावी.
**- पूनम भैस, राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिलीव शहराध्यक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठी कोणत्याही जाचक अटी न ठेवता ही योजनेचा सर्व महिलांना प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. ही योजना प्रचंड लोकप्रिय ठरली व महायुती सरकारला बहुमताने लाडक्या बहिणींनी सत्तेत आणले. मात्र यामध्ये अनेक शासकीय कर्मचारीवर्ग, पेन्शन धारक, अगदी पुरुष यांनीही लाभ घेणे सुरु केल्यामुळे शासनाने यासाठी ई केवायसी करणे बंधनकारक केले. यासाठी शासनाने दोन महिन्याची मुदत दिली आहे.

ती मुदत १८ नोव्हेंबरला संपत आहे. पण सध्या लाडक्या बहिणीसाठी केवायसी करण्याचा सर्व्हर बंदच आहे यामुळेच सध्या ई केवायसीचे काम पूर्ण पणे थांबले आहे. यामध्ये अनेक महीलांचे व पतीचे आधार कार्ड अपडेट नाही. आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक नाही अश्या प्रकारच्या मोठ्या अडचणींचा महिलांना सध्या सामना करावा लागत आहे.तसेच बऱ्याच महीलांचे पती, वडील मयत झाले आहेत यांनाही ई केवायसी करताना अडचणी येत आहेत. तसेच घटस्फोटित महिलांनाही अडचणीचा सामना करावा लागत आहे.

सध्या ई केवायसी करण्याची मुदत संपत आल्यामुळे महीलांची लगभग सुरू झाली आहे. पण सर्व्हर बंद असल्या मुळे महिलांमध्ये सध्या धास्ती वाढली आहे. शासनाने याचा सर्व्हर व्यवस्थित सुरू करावा अशी मागणी लाडक्या बहीणीमधुन होत आहे.

# केंद्रस्तरीय टॅलेंट हंट स्पर्धेत
# नागणसूर कन्नड मुली शाळेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.७ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केंद्रस्तरीय विद्यार्थी गुणवत्ता शोध (टॅलेंट हंट) स्पर्धेत नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेने सर्व सहा विभागात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दरवर्षी केंद्र, तालुका आणि जिल्हा स्तरावर निबंध, वक्तृत्व, कथाकथन, चित्रकला, समूह गीतगायन, लोकनृत्य अशा विविध स्पर्धा होतात. नागणसुर कन्नड मुली शाळेने सांघिक समूह गीतगायन लहान व मोठ्या गटात प्रथम, लोकनृत्य स्पर्धेत लहान गटात प्रथम, तर मोठ्या गटात द्वितीय क्रमांक पटकावला. कथाकथन लहान गटात ईश्वरी धनशेट्टी हि प्रथम आली. चित्रकला लहान गटात प्रांजली शिवमूर्ती हि प्रथम आली. मोठा गट कथाकथन स्पर्धेत अक्षरा कल्याण हि प्रथम तर श्रावणी गंगोंडा हि द्वितीय आली. लहानगट वक्तृत्व स्पर्धेत श्राव्या यळमेली प्रथम आली. लहान गट निबंध स्पर्धेत सविता खिल्लारी हि तृतीय आली. विविध स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावून तालुकास्तरीय स्पर्धेसाठी यांची निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना उपशिक्षक राजकुमार खानापुरे, राजकुमार नरूणे, राजशेखर कुर्ले, लक्ष्मीकांत तळवार, शांता तोळनुरे, शोभा कलशेट्टी, शरणप्पा फुलारी आदींचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांना आणि मार्गदर्शक शिक्षकांना गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी, केंद्रप्रमुख इरप्पा गजा, केंद्रीय प्रभारी मुख्याध्यापक विजयश्री एंटमन, कन्नड मुली शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक शरणप्पा फुलारी, कल्याणी गंगोंडा, मालकप्पा हिप्परगी, चन्नम्मा बिराजदार, शंकर अजगोंडा, बसवराज खिलारी, रामेश्वर सोलापुरे, शरद गंगोंडा तसेच केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भगिनी, सरपंच, उपसरपंच, तंटामुक्त अध्यक्ष सर्व ग्राम पंचायत सदस्य, समस्त ग्रामस्थ,पालक,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गंगाधर भोसगी, उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी, शिक्षणतज्ञ गुरुबाई प्रचंडे, ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी सिद्धेश्वर गंगोंडा आदींनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




# वर्धापनदिनानिमित्त एनटीपीसीत पोलीस अधिक्षकांच्या हस्ते ४०० झाडांचे रोपण

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग,दि.७ नोव्हेंबर-**

फताटेवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथे दि.७ नोव्हेंबर रोजी एनटीपीसीच्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. परिसरात २०० फळझाडे तसेच २०० दुर्मिळ औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमास एनटीपीसी चे मुख्य कार्यकारी निवेदक शास्त्री, एच.आर. मॅनेजर श्री. रेड्डी, इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग, तसेच वळसंग पोलीस ठाणे येथील सपोनी राहुल डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक श्री. कांबळे, होटगी दूरक्षेत्राचे अधिकारी, आणि पोलीस ठाण्याचा कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

सदर वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमामुळे परिसरात हिरवळ वाढण्यास हातभार लागणार असून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला गेला. वृक्ष लावा - पर्यावरण वाचा या संदेशाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# करमाळ्यातील ४० गावचा पाणीप्रश्न; ११ नोव्हेंबरला मंत्रालयात बैठक

## रिटेवाडी संघर्ष समितीच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.७ नोव्हेंबर-**

रिटेवाडी संघर्ष समितीने ४० गावातील सरपंचांसह कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यालया समोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. त्यामुळे पालकमंत्री जयकुमारे गोरे यांच्या पुढाकाराने मंगळवार दि. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वा. मंत्रालयात जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्दे शानुसार, संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

बैठकीसाठी पालकमंत्री गोरे, कार्यकारी संचालक (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ), मुख्य अभियंता (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ), अधिक्षक अभियंता (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ) त्याचप्रमाणे विषयाशी संबंधित सर्व मंत्रालयीन व क्षेत्रीय अधिकारी यांच्यासमवेत बैठक होणार आहे. त्यामुळे रिटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या कागदरुपी आराखड्याला प्रत्यक्षात सुरुवात होईल असा आशावाद ४०-४५ गावातून व्यक्त केला जात आहे.



करमाळा तालुक्यातील ४०-४५ गावांच्या पाण्याचा प्रश्न सुटावा. यासाठी कुकडी प्रकल्पात काही प्रमाणात पाणी राखीव ठेवले गेलेले आहे. परंतू कुकडी जलाशय ते करमाळा तालूका म्हणजे २५०-३०० किमी.वरुन येणारे पाणी फक्त दिवास्वप्नच राहून जात होते. या अनुषंगानेच तालुक्यातील ४०-४५ गावाचे हक्काचे पाणी मिळविण्यासाठी येथील नागरिकांना आंदोलने, निवेदने तसेच विविध मंत्री, अधिकारी यांना भेटून, आमचे हक्काचे पाणी आम्हाला योग्य प्रकारे मिळावे. यासाठी मंत्रालयीन पातळीवरून एखादी बैठक झाल्यास, व अधिकाऱ्यांना देखील तसे सुचित केल्यास सदरच्या ४०-४५ गावांचा पाण्याचा मिटेल. अशा प्रकारची आशा दिसत होती. यामुळे पालकमंत्री, मुख्यमंत्री, शासकीय वरिष्ठ अधिकारी यांच्या सततच्या भेटी घेऊन, रिटेवाडी संघर्ष समितीने पाठपुरावा केला. यामध्ये अनेक वेळा बैठका आयोजित केल्या गेल्या. व काही कारणास्तव रद्द देखील झाल्या. त्यामुळे समितीने २७ ऑक्टेबरला ४० गावातील सरपंचांसह कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे येथील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. परंतू पालकमंत्री गोरे यांनी २३ ऑक्टोबर रोजी समितीच्या सदस्यांना बोलावून, संबंधित विभाग आणि मंत्र्यांची बैठक आयोजित करण्याबाबत आश्वासित केले होते. सदरच्या उपोषणाच्या निवेदनाची सोलापूर जिल्हा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी तातडीने दखल घेऊन, मंत्री विखे-पाटील यांच्या समवेत बैठक आयोजित केली आहे.

# जिल्ह्यात आतापर्यंत २७ टक्के रब्बी पेरणी

## पावसाने उघडीप दिल्याने बळीराजाकडून पेरणीचा धडाका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील सर्वच मंडलातील खरिपाची पिके अतिवृष्टी, महापुरामुळे वाहून गेली आहेत. काही जणांना ॲग्रीस्टॅकमुळे शासनाकडून मिळणारी नुकसानीची मदतही मिळाली नसल्यामुळे शेतकरीवर्ग प्रचंड अडचणीत आला आहे. तरीही हे संकट बाजूला सारून अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून रब्बी हंगामातील पेरणीचा श्रीगणेशा केला आहे.

दरम्यान, थंडीच्या महिन्यातही रोजच पाऊस पडत असल्याने जमिनीच्या वापस्याअभावी आजतागायत जिल्ह्यात अवघी २७ टक्केपर्यंतच पेरणी झाली असून, नोव्हेंबरमध्ये पाऊस थांबला तरच पेरणीचे हे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. इतकेच नाहीतर ज्वारी पेरणीस विलंब झाल्याने यंदा गहू, हरभरा, ऊस आणि मका पेरणीचा टक्का वाढण्याची शक्यता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. ७) व्यक्त केली. दरवर्षी जिल्ह्यात सरासरी तीन ते साडेतीन लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी हंगामातील पिकांची पेरणी होत असते. यंदा हे क्षेत्र वाढण्याची शक्यता कृषी विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे. या महिन्यात तशी तर कडाक्याची थंडी पडत असते; मात्र यंदा अजूनही पाऊस पडू लागल्याने आणि आभाळ येत असल्याने थंडीची चाहूलही तशी लागेना झाली आहे. सतत पाऊसधारा कोसळत असल्यामुळे वापस्याअभावी पेरणी लांबत आहे. इतकेच नाहीतर काही ठिकाणी जास्त पाऊस झाल्याने दुबार पेरणीचे संकटही शेतकऱ्यांवर आले आहे. रब्बी हंगामात गहू, ज्वारी, मका ही महत्वाची पिके आहेत. खरीप पेरणी वाया गेल्याने रब्बी क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता जास्त आहे. गतवर्षी रब्बी हंगामात विविध पिकांची पेरणी सरासरी ३.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर झाली होती. यंदा मात्र आजतागायत १.१९ लाख हेक्टरवर रब्बी पेरणी झाली आहे. मात्र आता पाऊस थांबण्याची गरज आहे. अतिवृष्टी, महापुरामुळे शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अजूनही जिल्ह्यातील शेतशिवाराम ध्ये पाणी साठले आहे. रब्बी पेरणी जरी सुरु झाली असली तरी देखील परतीचा पाऊस अजूनही बरसत आहे. यंदा गहू, हरभरा आणि ऊस पिकांत मोठी वाढ होणार आहे.



**तालुकानिहाय अशी झाली रब्बीची पेरणी :** उत्तर सोलापूर तालुक्यात ७ हजार ८२८ हेक्टरवर पेरणी झाली असून, ही पेरणी ३५ टक्के आहे. तर दक्षिण सोलापूर ६४३१-१८.९७, बार्शी १५५५८-२२.१३, अक्कलकोट १४०१६-२२.८४, मोहोळ ९४०४-२६.०५, माढा १०४०३-२४.४६, करमाळा ८२१९-१७.६९, पंढरपूर ३०४८-२३.०६, सांगोला १६२४१.४- ३४.८४, माळशिरस ८३०२-३७.६८, मंगळवेढा १९९४४-४१.१७ तर जिल्ह्यात सरासरी ४ लाख ४३ हजार ०९७ हेक्टरपैकी १ लाख १९ हजार ३९४ हेक्टरवर रब्बी पेरणी झाली आहे. तर उसाची नवीन लागवड ४४ हजार ६२० हेक्टरवर झाली आहे.

# राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून निवडणूक समिती जाहीर

## जिल्हा निवड समितीत अनेक दिग्गजांचा समावेश

**अकलूज, दि. ७ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून जोरदार तयारी केली जात असून या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच पक्षाकडून जिल्हा निवडणूक समि ती जाहीर करण्यात आली आहे.म ाजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह अनेक दिग्गज नेते मंडळींचा या निवड समितीत समावेश असून या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण ताकदीने निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख व कार्याध्यक्ष रविंद्र पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सरचिटणीस रवींद्र पवार यांनी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांना नुकतेच या जिल्हा निवडणूक समितीचे पत्र पाठवले असून यामध्ये राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, आ.अभिजीत पाटील, आ.उत्तमराव जानकर, आ. राजू खरे, आ.नारायण आबा पाटील, माजी आ. लक्ष्मण ढोबळे, माजी आमदार रमेश कदम, शेखर माने, अनिल सावंत, विश्वासराव बारबोले, बाबुराव गायकवाड, सूरज देशमुख, विनंती कुलकर्णी, सुवर्णाताई शिवपुरे, धनंजय साठे, अरुण तोडकर, बाळासाहेब खान यांची जिल्हा निवडणूक समिती म्हणून निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद निवडणुकांसाठी या समितीची नियुक्ती करण्यात आली आहे असे यावेळी जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख व कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांनी सांगितले.

## निधन वृत्त...

### पवन फत्तापूरे



**सोलापूर, दि. ७, नोव्हेंबर -**

जोडभावी पेठ येथील पवन कल्याण फत्तापूरे (वय ३४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व चार वर्षाचा मुलगा, आई, काका, काकू, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.


### वसंत क्षीरसागर



**सोलापूर, दि. ७, नोव्हेंबर -**

जिल्हा न्यायालयातील सेवानिवृत्त सहाय्यक अधीक्षक वसंत धोंडीबा क्षीरसागर (वय ७६) रा. सोलगी नगर, कुमठा नाका यांचे आज शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजता निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले विवाहित मुलगी सुना व नातवंडे असा परिवार आहे. संतोष क्षीरसागर यांचे ते वडील होत.

### जयशिंग भोसले



**सोलापूर, दि. ७, नोव्हेंबर -**

कै. जयशिंग रमेश भोसले यांचे अल्पशा आजाराने दि. ६ नोव्हेंबर रोजी सायं. सात वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.


# सामूहिक 'वंदे मातरम'ने चेतविले राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग

## ● आई प्रतिष्ठानतर्फे साकारला भारताचा मानवी नकाशा
## ● पालकमंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आई प्रतिष्ठान आणि दयानंद शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवारी दोन हजार विद्यार्थिनींनी सामूहिक वंदे मातरम गायन केले. यावेळी दोन हजार विद्यार्थिनींनी दीड एकर जागेत भारताचा मानवी नकाशा साकारला. राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या या कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उपस्थित राहून 'वंदे मातरम' चे गायन करीत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

दयानंद महाविद्यालयाच्या दीड एकर मैदानावर आई प्रतिष्ठानतर्फे भारताचा १५० बाय १०० फुटांचा मानवी नकाशा साकारण्यात आला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते व्याहारती होम करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष रोहिणी तळवळकर, छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस वरेरकर, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य ॲड. सुनंदा भगत, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य बी. एच. दामजी आदी उपस्थित होते. कलाकार विपुल मिरजकर यांनी दोरीच्या साह्याने भारताचा मानवी नकाशा साकारला. पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, वंदे मातरम हे गीत भारतातील प्रत्येक नागरिकाला प्रेरणा देणारे गीत आहे. देश प्रेमाची धगधगती ऊर्जा १५० वर्षांनंतरही या गीतातून आजही मिळते. १८७५ साली बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेले वंदे मातरम हे गीत स्वातंत्र्ययुद्धाचे राष्ट्रगान बनले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमातून वंदे मातरम या गीताच्या वैभवशाली वारशाची आठवण देशाला करून दिली. २०४७ साली भारतीयांच्या स्वप्नातील विकसित भारताच्या जडणघडणीत वंदे मातरम हे गीत महत्त्वाचे ठरणार आहे, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे याप्रसंगी म्हणाले. आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मीनाक्षी म्हेत्रे यांनी सूत्रसंचालन तर प्राचार्य डॉ. एस. व्ही. शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी योगेश डांगरे, राहुल डांगरे, विठ्ठल बडगंची, पंचाक्षरी स्वामी, शुभम चिट्याल, अविनाश शंकु, सचिन लवटे , नागनाथ कोळेकर, संजय कोळेकर, समर्थ चिलवेरी, लक्ष्मीकांत येलदी, अंबादास पोगुल, उमेश चिट्याल, व्यंकटेश बंडा आदी उपस्थित होते.



**भारतमातांनी वेधले लक्ष :** विविध शाळा, महाविद्यालयातील पाच विद्यार्थिनींनी भारतमातेचा वेश परिधान करून, हाती मोठा तिरंगा घेऊन या उपक्रमात हजेरी लावली. भारताच्या मानवी नकाशाच्या मधोमध मोठ्या आकाराच्या कापडी राष्ट्रध्वजासोबत उभे राहून या विद्यार्थिनींनी भारतमातेला वंदन केले.

यंदा वाचनालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त...

# भावी पिढीसाठी 'अत्याधुनिक अभ्यासिका' उभारणार

### पूर्व विभाग वाचनालयाचे अध्यक्ष दिड्डी यांचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०७ नोव्हेंबर-**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाची स्थापना १९७५ मध्ये झाली. पहिले अध्यक्ष राजाराम पंत कुचन यानंतर माणिक गुर्रम, माजी महापौर जनार्दन कारमपुरी, अंबादास पद्मा, माजी महापौर प्रा. डॉ. पुरणचंद्र पुंजाल, पांडुरंग दिड्डी, लक्ष्मीनारायण कुचन, माणिक सारंगी, नारायण पुजारी, रामलू मच्छद, यल्लप्पा येलदी, दत्तात्रय कारमपुरी, शैला अन्नलदास आदी अध्यक्षांच्या देखरेखीखाली पूर्व भागातील वाचनालयाचा आतापर्यंतचा प्रवास यशस्वीपणे चालू आहे. दरम्यान, यंदाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने सोलापुरातील युवा पिढीसाठी अत्याधुनिक अभ्यासिका उभारणार असल्याचे वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांनी दैनिक तरुण भारतशी बोलतना सांगितले.

आतापर्यंतच्या प्रत्येक अध्यक्षांच्या कार्यकाळामध्ये वाचनालयाने भरीव कामगिरी करून सोलापूरकरांसाठी योगदान दिलेले आहे. गंगाधरपंत कुचन, इरणप्पा बोल्ली, सत्यनारायण बोल्ली, जनार्दन कारमपुरी या सर्वांच्या पुढाकाराने नवीन आणि स्वतंत्र इमारतीची पायाभरणी १९१२ साली झाली होती. वाचनालयाच्या स्थापनेवेळी मद्दा मंगल कार्यालयाच्या छोट्याशा




खोलीत त्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. परंतु त्याचे आज मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले आपल्याला दिसतंय. त्यानंतर महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार १९९२ मध्ये प्राप्त झाला. वाचनालयातर्फे वर्षभरामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवले जातात. छत्रपती शिवाजी महाराज जयंती, मराठी राजभाषा गौरव दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे जयंती, मराठी भाषा पंधरवडासह महत्त्वाचे तसेच शाळेतील लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, गंगोळी स्पर्धा आदी उपक्रमही सातत्याने राबविले जातात.उन्हाळ्यातील सुट्टीमध्ये सर्व वयोगटातील वाचकांसाठी तेलुगु भाषा प्रशिक्षण देखील घेतले जाते. दहावी आणि बारावी वर्गातील यशस्वी विद्यार्थी तसेच इतर विभागातील व विविध क्षेत्रातील मान्यवरांचे देखील सत्कार समारंभ वाचनालयातर्फे केले जातात. गेल्या ५० वर्षांपासून या मंडळींनी सोलापुरातील वाचकांची सोय केली आहे. आजतागायत ३५ हजार ग्रंथसंपदा या वाचनालयात आहे.

### सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम होणार



येथील तेलुगू भाषिकांकडून गेल्या ५० वर्षांपासून पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय यशस्वीपणे सुरू आहे. दर पाच वर्षाला अध्यक्षपद आणि कार्यकारिणीची निवड होते. ही निवडही सर्वानुमते होते. मोबाईल आल्याने आणि कोरोना काळात वाचकवर्ग कमी झाला होता; मात्र आता वाचक वाढत आहे. भविष्यातही युवा पिढीला पुस्तकाची आवड निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. इतकेच नाहीतर येथील विणकर बागेत येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी फिरते वाचनालय आम्ही चालविणार आहोत. या बागेत आलेल्या लोकांना मोफत पुस्तके वाचण्यासाठी देवून ती पुस्तके बागेतून घरी जाताना त्यांच्याकडून जमा करून घेण्यात येणार आहे. या उपक्रमालाही प्रतिसाद मिळेल असे वाटते.

**- पांडुरंग दिड्डी, अध्यक्ष, पूर्व विभाग वाचनालय, सोलापूर**

# कर्तृत्वाशिवाय मनुष्यावर भगवंताची कृपा अशक्य

**ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर : विकास सहकारी बँकेच्या 'वाग्यज्ञ' चा भक्तिमय वातावरणात समारोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर-**

कर्तृत्व हे केवळ स्वीकारातून नव्हे तर त्यागाने सिद्ध होते. कर्तृत्वाशिवाय मनुष्यावर भगवंताची कृपा होणे अशक्य आहे, असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले. विकास सहकारी बँकेतर्फे हेरिटेज लॉन्स येथे आयोजित तीन दिवसीय 'वाग्यज्ञ' च्या तिसऱ्या आणि अखेरच्या दिवशी शुक्रवारी ह.भ.प. देगलूरकर महाराजांनी मार्गदर्शन केले.

ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर 'म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु (कर्तुत्व आणि कृपा) या श्री ज्ञानेश्वरीतील १८ व्या अध्यायातील ओवीवर प्रवचन केले. यावेळी त्यांनी मानवी जीवनातील कर्तृत्व आणि त्यावर असलेल्या भगवंताच्या कृपेचे अवलंबित्व यावर विवरण केले.

ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, विचारांनी परिपक्व असणारा व्यक्ती भगवंताला अपेक्षित असतो. अंतःकरणाची अस्थिरता हे जीवदशेचे लक्षण आहे. तर वृत्तीची स्थिरता ही जीवनाला ज्ञानाचे अधिष्ठान



असल्याचे लक्षण आहे. मनुष्याला कर्माचा त्याग करता येत नाही. मनुष्याचे कर्तृत्व आहे पण त्याच्यावर भगवंताची कृपा झाली नाही असे मनुष्याला अनेकदा वाटते. परंतु भगवंताने सुनियोजित केलेल्यावेळी त्या मनुष्यावर परमात्म्याची कृपा होतेच.

मात्र ज्या व्यक्तीवर भगवंताची कृपा झाली आहे, त्याचे कोणतेही कर्तृत्व नाही ही बाब अशक्य आहे, असेही ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी सांगितले.

ज्याप्रमाणे पाऊस नाही आला तर समुद्र आटत नाही आणि पाऊस जास्त पडला तरी समुद्राला पूर येत नाही. कारण तो व्यापक आहे. भगवंतदेखील याचप्रमाणे व्यापक आहे. परिश्रम शब्द हा कर्तृत्वाचा वाचक आहे. कोणत्याही क्षेत्रात नैपुण्यासाठी परिश्रम आणि अभ्यासाशिवाय पर्याय नाही. त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी मनुष्यावर नैतिक, धार्मिक आणि मनुष्यत्वाची बंधने असतात, असेही ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले.

विकास सहकारी बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष जेष्ठ संचालक सी. ए. राजगोपाल मणियार यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी विकास सहकारी बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर राठी, उपाध्यक्ष राजगोपाल चंडक, ज्येष्ठ संचालक राजगोपाल मिणियार, हरीनिवास जाजू, पांडुरंग मंत्री, मनीष बलदवा, ज्योती आसावा, प्रवीण बजाज, सुनील माहेश्वरी आदी उपस्थित होते. संजीव कुसुरकर यांनी सूत्रसंचालन केले. शेवटच्या दिवशी ही सोलापूरकरांनी 'वाग्यज्ञ' ला मोठी गर्दी केली होती.



# 'उमेद' च्या रुक्मिणी मॉलचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

जिल्हा उमेद स्वयंसहाय्यता गट उत्पादनांचे पॅकेजिंग व ब्रॅण्डिंग करणाऱ्या रुक्मिणी मिनी शॉपिंग मॉल व उपहारगृहाचे सोलापूर येथे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सुभाष देशमुख यांच्या उपस्थितीत लोकार्पण झाले.

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासह इतर मान्यवर व उमेद स्वयंसहाय्यता बचत गटातील महिला- भगिनी आणि नागरिक उपस्थित होते. महिला बचत गटांच्या हातातून तयार होणाऱ्या गुणवत्तापूर्ण उत्पादनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हे या मिनी शॉपिंग मॉलचे उद्दिष्ट आहे. यातून त्यांच्या परिश्रमाला योग्य सन्मान मिळेल आणि त्यांची आर्थिक उन्नती होईल अशी अपेक्षा गोरे यांनी व्यक्त केली. या रुक्मिणी शॉपिंग मॉल व उपहारगृहात म हिलांनी हाताने बनवलेले फराळाचे पदार्थ, सुकामेवा विविध प्रकारचे मसाले, याशिवाय,खवय्यांसाठी जेवण सुद्धा उपलब्ध आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात मोठे उमेद मॉल उभे करण्याचा संकल्प केला आहे.

# संकर्षण व्हाया स्पृहा गप्पा, गोष्टी आणि कवितांचा अनोखा संगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर-**

प्रिसिजन गप्पा २०२५ या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी ''संकर्षण व्हाया स्पृहा...!'' या बहारदार कार्यक्रमाने रंगतदार प्रारंभ झाला. सोलापूरच्या रंगभवन सभागृहात सादर झालेल्या या कार्यक्रमात अभिनेता संकर्षण कऱ्हाडे आणि कवयित्री-अभिनेत्री स्पृहा जोशी यांच्या प्रभावी सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रिसिजनचे चेअरमन यतीन शहा, प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा आणि करण शहा यांच्या हस्ते कलाकारांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे हे सहपरिवार उपस्थित होते.

''वडील, आई, लहानपण आणि भाषेची गोडी'' या विषयांवर आधारित कविता, गप्पा, गाणी आणि गोष्टी यांच्या माध्यमातून दोघांनी जीवनातील कोमल भावविश्व रंगवले. भावकविता,




बालस्मृती आणि भाषेचे माधुर्य यांचा मिलाफ या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला.

विशेष म्हणजे, स्पृहा जोशी यांनी लहान मुलीच्या आवाजात सादर केलेले ''सुंदर चॉकलेटचा बंगला'' हे गाणे प्रेक्षकांच्या मनाला भिडले. संकर्षण कऱ्हाडे यांच्या विनोदी व भावस्पर्शी शैलीने सभागृहात हास्य आणि भावनांचे रंग एकत्र खुलले. सुरुवातीला गेल्या १७ वर्षांपासून रंगभवन सभागृहाची स्वच्छता कार्यक्रमापूर्वी आयोजकांकडून केली जाते, याविषयीची लघुफिल्म दाखवण्यात आली. यावेळी सोलापूरकरांना आवाहन करण्यात आले की ''नुसता कार्यक्रम नव्हे, स्वच्छ कार्यक्रम व्हावा, ही आपली संस्कृती व्हावी यासाठी सर्वांनी जबाबदारी घ्यावी.'' प्रेक्षकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सभागृहच नव्हे तर सभागृहाच्या बाहेरही रसिकांची प्रचंड गर्दी जमलेली होती. भाषेची गोडी, भावनांचा ओलावा आणि सामाजिक संदेश यांचा अनोखा संगम या कार्यक्रमातून दिसून आला.

# फेसबुकवरील 'स्पष्ट वक्ता' अकाउंटवरून समाजविरोधी वक्तव्ये

### पद्मशाली युवक संघटनेचा संताप; पोलिस आयुक्तांकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

गेल्या काही दिवसांपासून फेसबुकवर 'स्पष्टवक्ता' या नावाने चालविल्या जाणाऱ्या अकाउंटवरून पद्मशाली समाजाबाबत अपमानास्पद, दिशाभूल करणारी आणि समाजात मतभेद निर्माण करणारी वक्तव्ये व कमेंट्स करण्यात येत आहेत. या प्रकारा मुळे समाजामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघ आणि पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने सोलापूर शहराचे पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम, अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघाचे अध्यक्ष श्रीनिवास संगा, प्रेसिडेंट नागेश बोमड्याल, उपाध्यक्ष प्रविण जिल्ला, प्रसिद्धी प्रमुख पवन गुंडेटी, ॲड. शाम आडम, माजी अध्यक्ष साईराम बिर्रू, अमर बोडा, संतोष चन्ना पंतुलु उपस्थित होते.

संगा म्हणाले, 'स्पष्टवक्ता' या सोशल मिडीया अकाउंटवरून



करण्यात येणाऱ्या पोस्ट आणि कमेंट्स समाजात तणाव निर्माण करणाऱ्या आहेत. या माध्यमातून पद्मशाली समाजाची हेतुपुरस्सर बदनामी केली जात असून, समाजातील ऐक्य आणि शांततेला बाधा पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे अशा समाजकंटकांविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी. जर या प्रकरणी त्वरीत आणि ठोस कारवाई झाली नाही, तर 'जनआक्रोश मोर्चा' काढण्यात येईल.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






# जिल्ह्यात ७ हमीभाव केंद्रांना ग्रीन सिग्नल; शेतकऱ्यांना दिलासा

- सोयाबीन, उडीद आणि मुगाची हमीभावाने राज्य शासन करणार खरेदी
- ५ हमीभाव खरेदी केंद्रे सुरू तर २ केंद्राची शेतकऱ्यांना प्रतीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर-**

राज्यात हमीभावाने सोयाबीन, मूग आणि उडीद खरेदीला मान्यता मिळाली आहे. शेतकऱ्यांच्या नाव नोंदणीला सुरुवात झाली असून दि.३० ऑक्टोबरपासून शेतकरी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. तर दि.१५ नोव्हेंबर पासून प्रत्यक्ष खरेदीला सुरुवात होणार असल्याचे सोलापूर जिल्हा पणन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचा योग्य दर मिळावा, यासाठी अखेर जिल्ह्यातील हमीभाव खरेदी केंद्रांना सुरुवात होत आहे. मूग, उडीद आणि सोयाबीन या पिकांच्या खरेदीसाठी सोलापूर जिल्ह्यात ७ हमीभाव खरेदी केंद्रास शासन मान्यता मिळाली आहे. त्यानुसार बार्शी, अक्कलकोट, करमाळा, पंढरपूर, मंगळवेढा, या सात ठिकाणी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. पाच खरेदी केंद्रांवर खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तर माढा आणि माळशिरस तालुक्यासाठी खरेदी प्रक्रिया अद्याप सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले. नोंदणी प्रक्रियेनंतर हमीभावाने सोयाबीन मूग आणि उडीद याच्या खरेदीने शेतकऱ्यांना यंदाच्या हंगामात दिलासा मिळणार आहे. दरम्यान, बार्शी तालुक्यासाठी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये केंद्र सुरू करण्यात आले आहे. तुळजाभवानी कृषी साधन व पुरवठा सहकारी संस्था मर्या, उंबरगे. या संस्थेच्या माध्यमातून ही प्रक्रिया चालवली जाणार आहे. करमाळा तालुक्यासाठी करमाळ कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विठ्ठल सर्वसाधरण सहकारी संस्था मर्या, मांगी. या संस्थेच्या वतीने खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. माढा तालुक्यासाठी कुर्डूवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. माढा संस्थेच्या माध्यमातून खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहे. पंढरपूर तालुक्यासाठी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पंढरपूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. पंढरपूर या संस्थेच्या वतीने खरेदी केंद्र चालवले जाणार आहे.मंगळवेढा तालुक्यातील मंगळवेढा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मंगळवेढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. मंगळवेढा या संस्थेच्या वतीने हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहेत. माळशिरस तालुक्यासाठी अकलुज येथे शेकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि, अकलुज. संस्थेच्या मार्फत हमीभाव खरेदी केंद्र चालवले जाणार आहे. तर अक्कलकोट तालुक्यासाठी अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये वि.का. सेवा. सहकारी सोसायटी मर्या. किणी. संस्थेच्या माध्यमातून खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

### नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- चालू वर्षातील सोयाबीनची ई-पीक नोंद असलेला डिजिटल ७/१२ व ८-अ उतारा आधार कार्ड
- राष्ट्रीयीकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स
- शेतकऱ्यांनी ही कागदपत्रे घेऊन कृषी उत्पन्न बाजार समिती येथील केंद्रावर जाऊन ऑनलाइन नोंदणी करावी लागणार

### केंद्र शासनाने निश्चित केलेले आधारभूत किंमत किती?

- मूग : ८,७६८ रु. प्रति क्विंटल
- उडीद : ७,८०० रु. प्रति क्विंटल
- सोयाबीन : ५,३२८ रु. प्रति क्विंटल

### हमीभाव खरेदी केंद्र सुरू झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा.

राज्य शासनाच्या आधारभूत किंमत योजनेंतर्गत २०२५-२६ हंगामासाठी या केंद्रांना सुरुवात होणार आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या जवळच्या ठिकाणी नोंदणी करता यावी, यासाठी सर्व आवश्यक सुविधा पुरवण्यात आल्या आहेत.मत्र, या केंद्रांना उशिराने प्रारंभ झाल्याने शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात नाराजी व्यक्त होत होती. आता केंद्र सुरू झाल्याने योग्य दराने विक्रीची संधी उपलब्ध झाली आहे.

**- मनोज कुमार बाजपेयी,**
जिल्हा पणन अधिकारी




### नोंदणी प्रक्रिया

- नोंदणी पूर्णपणे ऑनलाइन मशीन द्वारे केली जाणार असून, शेतकऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य आहे.
- नोंदणीनंतर शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सूचना मिळाल्यावरच माल विक्रीसाठी केंद्रावर आणावा, असे निर्देश दिले आहेत.
- शासनाने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. उशिरा का होईना, पण हमीभाव खरेदी केंद्रांमुळे
- शेतकऱ्यांच्या हातात योग्य दराचा हमीचा आधार मिळणार आहे.

राज्यातील २८ जिल्ह्यांमध्ये हमीभाव खरेदी प्रक्रिया राबवली जात आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाने दिली आहे. पणन महासंघाच्या माध्यमातून राज्यात नाफेड आणि एनसीसीएफसाठी सोयाबीन खरेदी करण्यात येणार आहे. सोयाबीनचा हमीभाव केंद्र सरकारने यंदा प्रति क्विंटल ५३२८ रुपये जाहीर केला. तसेच मुगाचा व उडदाचा हमीभाव प्रत्येकी ७७६८ रुपये व ७८०० रुपये जाहीर केला आहे.शेतकऱ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने पॉस मशिनद्वारे करण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधारकार्ड, बँक पासबुक, चालू वर्षाचा ७/१२ उतारा, पीकपेरा आदी कागदपत्रांसह नोंदणीकरिता प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे गरजेचे आहे.






# मनोज जरांगे-पाटलांना झेड प्लेस सुरक्षा द्या : माऊली पवार

## धनंजय मुंडे यांच्या पोस्टरला जोडे मारत रस्त्यावर ठिय्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

मनोज जरांगे पाटील यांच्यावर हल्लाचा कट रचण्यात आला होता. याचा मूळ सूत्रधार धनंजय मुंडे यांच्या पोस्टरला जोडे मारत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकल मराठा समाजाच्यावतीने रस्त्यावर ठिय्या मांडत निदर्शने करण्यात आली.

मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लेस सुरक्षा देण्यात यावी अशी मागणी सकल मराठा समाजाचे सोलापूरचे समन्वयक माऊली पवार यांनी आंदोलनावेळी केली. धनंजय मुंडे यांची सीबीआय चौकशी झाली पाहिजे. पूर्ण कटात सामील असणाऱ्या लोकांना शासन झाले पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांची काळजी जर महाराष्ट्र सरकारने नाही घेतली तर मराठे महाराष्ट्र बंद केल्याशिवाय शांत बसणार नाही. असा इशारा आंदोलन वेळी पवार यांनी दिला.

यावेळी प्रशांत देशमुख, सचिन तिकटे, आबा सावंत, अरविंद गवळी, चंद्रकांत पात्रे, शिवाजी चापले, महेश पवार, दिनेश जाधव, सचिन गुंड, सुनील माने आदी उपस्थित होते.

**महत्वाचे...**

## सेवानिवृत्तांनी हयातीचे दाखले बँकेत जमा करण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ या कार्यालयाकडील निवृत्ती वेतन, कुटुंबनिवृत्तीवेतनधारक ज्या बँकेतून निवृत्ती वेतन घेतात त्या बँकेत हयातीचे दाखले दि. १५ नोव्हेंबर रोजी जमा करावेत. ज्या सेवानिवृत्त सेवकांचे, कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे हयातीचे दाखले दि. १५ नोव्हेंबर रोजी बँकेत जमा होणार नाहीत अशा सेवानिवृत्त सेवकांचे माहे नोव्हेंबर पासून निवृत्तीवेतन अदा केले जाणार नाही. याची नोंद घ्यावी. बँकेत हयातीचा दाखल्याच्या यादीवर सही करताना निवृत्तीवेतन, कुटुंबनिवृत्तीवेतन धारकांनी त्यांचा अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो द्यायचा आहे. तरी सेवानिवृत्तांनी आपल्या वयाचा पुरावासह (आधार कार्ड, पॅन कार्ड व जन्म दाखला) दि. १५ नोव्हेंबरपर्यंत बँकेत जावून समक्ष स्वाक्षरी करणे गरजेचे आहे. समक्ष पेन्शन कक्ष, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळात प्रत्यक्ष जमा करावे.

# संत नामदेवांचे कार्य जगाच्या कल्याणासाठी अलौकिक : गहिनीनाथ महाराज औसेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

जगाच्या कल्याणासाठी संतांनी अलैकिक कार्य केले त्यामध्ये संत नामदेवांचे मोठे योगदान आहे. म्हणुन ७५५ वर्ष झाले त्याची दैनंदिन आठवण आल्याशिवाय राहत नाही, असे मत विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गुरूवर्य गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी व्यक्त केले



ते श्री संत नामदेव जनाबाई प्रतिष्ठान आयोजित श्रीसंत शिरोमणी नामदेव महाराजांच्या जयंती उत्सवाप्रसंगी श्रीराम मंदिर बाळीवेस येथे बोलत होते. त्यांनी निरुपणासाठी संत नाम देवांचा भक्ती विना मोक्ष नाही हा अभंग घेतला होता. संत विचारांचे, कार्याचे चिंतन होणे काळची गरज असून नाम देवांनी ज्या काळी कार्य केले तो काळ खूप कठीण होता. त्याचे स्मरण करा.


संत नामदेवांची गाथा दैनंदिन वाचन केली तर मनुष्याला मनस्ताप कधीच होणार नाही हि नामदेवरायांची ताकद आहे असेही मत औसेकर महाराजांनी व्यक्त केले. पंजाब मधील शीख परिवारातील लोकांनी नामदेवरायांच्या विचारांचे चिंतन, मनन केले ह्याचा अभिमान वाटतो. त्याचे अनुकरण व्हायला हवे. तुळशीमाळेचे महत्व महाराजांनी उदाहरणे देऊन विषद केले. यावेळी श्रीसंत नामदेव-जनाबाई प्रतिष्ठानचे पदाधिकारी, समाज बांधव, गुरूभक्त उपस्थित होते.

# साहेबांच्या सोलापूर राष्ट्रवादीला खिंडार!

- शहराध्यक्षानंतर माजी जिल्हाध्यक्ष बळीराम साठे अजित राष्ट्रवादीच्या वाटेवर
- ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेत्यांची संगीतखुर्ची

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ नोव्हेंबर-**

एकेकाळी सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. मात्र हा बालेकिल्ला ढासळत असल्याचे चित्र शहर जिल्ह्यात निर्माण होत आहे. पक्षांतर्गत राजकारण आणि वाद - विवाद चव्हाट्यावर येत आहेत. कार्यपद्धती आणि मान सन्मानाची वागणूक मिळत नसल्याने ज्येष्ठ नेते पदाधिकारी साहेबांची राष्ट्रवादी सोडून अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करत आहेत.



सोलापूर शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांनी देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. खुद्द बळीराम साठे यांनी याला दुजोरा दिला आहे. कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन पक्षप्रवेशाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल, असे साठे यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे यांनी नातू जयदीप साठे यांच्या विवाहाची निमंत्रण पत्रिका देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत नुकतीच भेट घेतली. त्या भेटीतच साठे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश निश्चित झाला आहे. या भेटीवेळी आमदार राजू खरे, जयदीप साठे व इतर उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदावरून उचलबांगडी अपमानास्पदरित्या करण्यात आल्यानंतर बळीराम साठे यांनी पक्षाचा राजीनामा देणार असल्याचे जाहीर केले होते.शरद पवार यांनी शब्द देऊनही पक्षात मानसन्मान मिळत नसेल पाहून बळीराम साठे यांनी वडाळ्यात कार्यकर्ते, पदाधिकारी यांचा मेळावा घेत यापुढे शरद पवार यांच्या पक्षाशी आपला कुठलाही संबंध नसेल, असे जाहीर केले होते. त्यावेळी त्यांनी कुठल्याही पक्षात न जाता स्वतंत्रपणे निवडणुका लढविण्याचे ठरविले होते. त्यांनी आता अजितदादांच्या राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घेतला आहे. मला पद मिळावे; म्हणून पक्षात जात नसून सत्तेच्या माध्यमातून सर्वसाम न्यांची कामे होतील, असे साठे म्हणाले.

### लवकरच पक्ष प्रवेश



नातवाच्या लग्नाची निमंत्रण पत्रिका देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट झाली. त्या भेटीत राष्ट्रवादी प्रवेशाबाबत चर्चा झाली आहे. उप मुख्यमंत्री अजित पवार सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन लवकरच पक्षप्रवेशाची तारीख निश्चित करण्यात येणार आहे.

**- बळीराम साठे, माजी जिल्हाध्यक्ष**

# इतिहासाच्या प्रेरणेतूनच समृद्ध भारताची निर्मिती शक्य

- निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील
- जिल्ह्याच्या ४५ शाळा, महाविद्यालयातील १० हजार विद्यार्थ्यांचे 'वंदे मातरम् गायन'






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

स्वातंत्र्योत्तर आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील घटनांचा आढावा घेता त्यामधील प्रेरणास्थाने शोधून त्यातून बोध घेतल्यामुळेच आपल्याला समृद्ध भारताची उभारणी करणे आणि नव्या दमाने विकास घडविणे शक्य झाले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले.

ते शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग तथा सांस्कृतिक कार्य मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वंदे मातरम गीताच्या सार्थ शताब्दी महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. येथील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व राणी कित्तूर चेन्नम्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे सोलापूर येथे आयोजन करण्यात आलेले होते.

यावेळी प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर रणधिर सतिश, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार, कोषागार अधिकारी वैभव राऊत, एस,आर,पी,एफ सहाय्यक समादेश श्री.आऊंदेकर, सहायक पोलिस आयुक्त मच्छिंद्र पंडीत, तरूण भारतचे माजी संपादक अरविंद जोशी, प्रसाद जिरांकलगीकर,आय,टी,आय चे प्राचार्य मनोज बिडकर आदी कर्मचारी अधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी ३५८ तालुक्यातून या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. सोलापूर येथील कार्यक्रम होम मैदान येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील हे होते. प्रसाद जिरांकलगीकर यांनी पाच कडव्यांचे संपूर्ण वंदे मातरम गीत सादर केले व त्यांच्या सुरात सूर मिसळून उपस्थित सुमारे साडेसहा हजार जणांनी हे गीत गाऊन वातावरण राष्ट्रभक्तीमय केले.

प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी मनोज बिडकर यांनी प्रस्ताविक केले याप्रसंगी सोलापूर शहर व परिसरातील विविध ४५ शाळा महाविद्यालय येथील प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी , विद्यार्थिनी यासोबतच शासकीय तथा निमशासकीय कार्यालय येथील कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील विविध शाळा तथा महाविद्यालयातील एनसीसी युनिट्स व एनएसएस युनिट्स चा या कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग होता. जुळे सोलापूर परिसरातील वि.मो. मेहता प्रशालेतील विद्यार्थ्यांनी वंदे मातरम या विषयावर आकर्षक पथनाट्याचे सादरीकरण केले. याप्रसंगी विविध शाळा आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थींनी विविध राज्यांच्या पारंपारिक वेशभूषे सह उपस्थिती नोंदवून या सोहळ्यात रंगत आणली. सोलापूर शहरातील हरीभाई देवकरण प्रशाला, सिद्धेश्वर प्रशाला, रॉजर्स इंग्लिश मीडियम स्कूल, लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूल, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, सेवासदन प्रशाला, वि.मो. मेहता प्रशाला, हिराचंद नेमचंद प्रशाला, विविध खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामधून शेकडो विद्यार्थी तसेच एसआर पी कॅम्प सोलापूर पोलीस ग्रामीण पोलीस पोलीस अधीक्षक कार्यालय यासारख्या विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी तथा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाने सोलापूर येथे दि. ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी साडेनऊ ते साडेदहा या वेळेत सामूहिक वंदे मातरम गायन उपक्रम आयोजित केला. या सोलापूरच्या जवळपास ४५ माध्यमिक शाळा व महाविद्यालये यांचे विद्यार्थी व शिक्षक, स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका, पोलीस आयुक्तालय, ग्रामीण पोलीस, जिल्हा कोषागार येथील प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आयटीआयचे केंदळे प्रवीण व कुंभार यांनी केले. प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य मनोज बिडकर यांनी केले, तर सूर्यकांत झणझणे यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२६०

बेडूक सापाचां तोंडीं । जातसे सबुडबुडीं ।
तो मक्षिकांचिया कोडीं । स्मरेना कांहीं ।।

अज्ञानी व्यक्तिची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने, त्यांची लक्षणे पुन्हा-पुन्हा सांगितली तर ती लक्षणे ऐकून अज्ञानी स्वत:ला तपासुन पाहतील आणि त्यांच्यात परिवर्तन करून घेण्याची इच्छा निर्माण होईल. म्हणुन ही लक्षणे सांगण्याचे कार्य माऊलींनी या ओवीतही चालु ठेवले आहे. अज्ञानी व्यक्ती हा विषय लंपट असल्याने विषयभोगापुढे त्याला इतर काही आवडत नाही. त्याला कसल्याही प्रकारची लाज वाटत नाही. तारुण्याच्या मस्तीत याला चांगले-वाईट काही समजत नाही. विषेश म्हणजे तो समजुन घेऊही इच्छित नाही. ओढाळपणे कुत्रा घरात शिरतो म्हणून मालकाने त्या कुत्र्याचे कान-शेपूट कापून टाकले, तरी तो कुत्रा जखमा पूर्णपणे बऱ्या होण्यापूर्वीच पुन्हा घरात ओढाळपणाने शिरतो. त्याप्रमाणे अज्ञानी व्यक्तींचे वागणे असते. माऊलींनी मुर्ख हा शब्द न वापरता अज्ञानी हा शब्द वापरला आहे. वाईटाला वाईट असल्याचे सांगतांना सुध्दा माऊली किती योग्य विचार करतात, याचे हे उदाहरण आहे. अज्ञानी आपल्या मृत्युला, आपल्यावर येणाऱ्या संकटांना कसे विसरून वागतो, हे सांगतांना माऊली म्हणतात, बेडूक सापाचां तोंडी । जातसे सबुडबुडी । तो मक्षिकांचिया कोडीं । स्मरेना कांही ।। अर्थात, बेडकाला त्याच्या मागच्या बाजूने सापाने अर्धवट गिळले आहे. बेडूक मागच्या बाजुने सापाच्या पोटात हळू-हळू जात आहे. तरीपण बेडूक आपणांला साप गिळत आहे, आपण थोड्या वेळात सापाच्या पोटाता पूर्णत: जाणार आहोत. यातुन आपली कोणत्याही परिस्थितीत सुटका नाही. याचा कसलाही विचार न करता, माशा पकडुन तो त्यांना खाण्यात मग्न असतो. थोड्या वेळानंतर या माशासह आपण सापाच्या पोटात जाणार आहोत, याचे भान तो ठेवत नाही. अगदी या बेडकाप्रमाणे अज्ञानी व्यक्ति वागत असतो.



दुसऱ्यांचे लुबाडण्यात आयुष्य घालवायचे, पण आपणांला एके दिवशी हे सर्व इथल्या इथेच टाकुन जायचे आहे, याचा अज्ञानी व्यक्ती विचार करीत नाही. आपणांलाही मागुन कोणी तरी (काळ) खाणार आहे, याचा विचार न करता, समोरच्यांना खाण्यात, फसविण्यात, लुबाडण्यात तो आनंद मानत असतो. आपणांला मृत्यु नाहीच अशा खुळचट कल्पनेत जगुन, अमरत्वाची कल्पना करून रात्रंदिन चुकीच्या मार्गाने जमवा-जमव करण्याचा प्रयत्न म्हणजे वेडेपणा आहे. रिक्त हाताने यावे, रिक्त हाताने जावे, तर मग कोणाचे कशाला घ्यावे, याची त्याला आठवण नसते. एके दिवशी मृत्यु निश्चित आहे व सर्व इथले इथेच टाकून जावे लागणार आहे याची जाण ठेवून वागले पाहीजे. मृत्युची आठवण माणसामध्ये चांगले परिवर्तन करू शकते.

मृत्युला मित्र मानुन वागण्याचा विचार केला तर मानवाच्या हातून चुकीचे काही घडत नाही. मृत्यु ही मानवाला सत्याची आठवण करून देणारी एक महाशक्ती आहे. मृत्युचा विसर म्हणजे मानवतेचा विसर, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. एखाद्याचा मृत्यू पाहिला तर आपणाला थोडावेळ का असेना पण, आपल्या चुकांची आठवण होते. आपण करीत असलेले सर्व मिथ्या वाटते. आपणालाही असेच जावे लागणार असल्याने आपण चांगले वागायला हवे असेही वाटते. हे वाटणे योग्य असल्याने हे थोड्यावेळापुरते न ठेवता, त्याला कायम स्वरूपी मनात ठेवून वागले तर मृत्यूची भिती वाटणार नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | ....राहू काल.... |
| दि. ८ नोव्हेंबर २०२५ | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| विक्रम संवत् २०८२ | दिनविशेष - २०१६: |
| शके - १९४७ | डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे ४५वे |
| संवत्सर - विश्वावसु | अध्यक्ष म्हणून निवडून आले. |
| मास - कार्तिक कृ. ३/४ | २००२: जी. बी. पटनायक |
| शु. संकष्ट चतुर्थी (रा.८.१९) | यांनी भारताचे ३२ वे |
| ऋतु - वर्षा | सरन्यायाधीश. |
| नक्षत्र- मृग (२२.०२) | १९९६: कवी प्रा. माणिक |
| योग - शिव (१८.३१) | गोडघाटे ऊर्फ ग्रेस जीवनव्रती |
| करण - बव (१७.५५) | मानकरी म्हणून निवड. |



## मेहता प्राथमिक व माध्यमिक शाळेत रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळा, कै.वि.मो. मेहता माध्यमिक शाळा व शि.प्र.मंडळी शिशु शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शि.प्र. मंडळी पुणे. ही एक मातृतुल्य संस्था आहे सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी ही संस्था नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असते. शिबिरात बहुसंख्य रक्तदात्यांनी स्वच्छेने रक्तदान करून माणुसकी व प्रेमाचा आविष्कार दाखवला. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्राद्वारे रक्त संकलित करण्यात आले. या शिबिराचे नियोजन प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी व शिशु शाळेच्या मुख्याध्यापिका आकांक्षा आराध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. या रक्तदान शिबिरास डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे तसेच पालकांचेही सहकार्य लाभले.

# टीईटी निर्णयाविरोधात उद्या मूक मोर्चा

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना आक्रमक

### शासनाने पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर रोजी दिलेल्या निर्णयामुळे राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांचे भवितव्य अडचणीत आले आहे. यामुळे राज्य सरकारच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या वतीने रविवार दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर हजारो शिक्षकांचा मूक मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती अण्णासाहेब भालशंकर आणि विरभद्र यादवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिक्षक पात्रता परीक्षा सक्तीच्या विषयाबाबत राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा, जुनी पेन्शन योजना लागू करणे, शिक्षणसेवक पद रद्द करणे, शिक्षकांना दिली जाणारी सर्व ऑनलाईन कामे त्वरित बंद करावीत, सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी आणि वस्तीशाळा शिक्षकांची मूळ सेवा सेवाकालात ग्राह्य धरावी या महत्त्वाच्या मागण्यांसाठी

राज्यभरात हा मोर्चा काढण्यात येणार आहे. सोलापुरात रविवारी सकाळी १०.३० वाजता चार हुतात्मा पुतळा चौक येथून मुक मोर्चाला प्रारंभ होईल.त्यानंतर सिद्धेश्वर मंदिर मार्गे पूनम गेट जिल्हा परिषद सोलापूर येथे समारोप होणार आहे. मुक मोर्चाचे सभेत रूपांतर होईल.

आश्वासन देऊनही शासनाच्यावतीने कोणत्याही प्रकारची सर्वोच्च न्यायालय पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आली नाही. त्यामुळे हे आंदोलन करण्यात येणार आहे. टीईटी संदर्भामध्ये शिक्षकांमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली असून, अनेक जिल्हा परिषदेच्या पदोन्नत्या थांबलेल्या आहेत. पदोन्नत्यादेखील थांबल्या आहेत. शिक्षकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण होण्याची अट घालण्यात आलेली आहे. आश्रम शाळेतील शिक्षकांना तर टीईटी उत्तीर्ण न झाल्यास वेतन थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य सरकारच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अनुसरून कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पाच वर्षांपेक्षा अधिक सेवाकाळ बाकी असलेल्या शिक्षकांना दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक ठरणार आहे. यामुळे राज्यातील शिक्षक, शिक्षक संघटनांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे, असे अण्णासाहेब भालशंकर आणि विरभद्र यादवाड यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ, आप्पासाहेब पाटील, हजरत शेख, संजीव चाफाकरंडे, भीमराया कापसे , सचिन चौधरी , रवींद्र जेटगी उपस्थित होते.

## दिगंबर जैन मंडळातर्फे रविवारी वधू-वर मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

श्री. दिगंबर जैन सैतवा ळ सेवा मंडळातर्फे, रविवार दि. ९ नोव्हेंबर रोजी, सोलापुरातील, हुतात्मा स्मृती मंदिर येथे, सकाळी ०९ ते संध्याकाळी ५.३० या वेळेत ४०व्या राज्यस्तरीय सकल जैन समाज वधू वर पालक परिचय मेळाव्याचे मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजन करण्यात आले आहे. न्यायाधीश पाटोदकर, सॉफ्टवेअर इंजिनीयर अमोल परितकर,(पुणे) उद्योजक बाहुबली संगवे (शिराढोण), सैतवाळ सेवा मंडळाचे अध्यक्ष -इंजिनीयर प्रकर्ष संगवे, उपाध्यक्ष अमित कटके, सचिव -राजेश मोहोळकर, यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यातील, सकल जैन समाजातील दोनशेहून अधिक वधू व वर उमेदवारांनी, ऑनलाइन व ऑफलाइन अधिकृत नोंदणी केली आहे. येणाऱ्या उमेदवार व पालकांची राहण्याची तसेच अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था सेवा मंडळाचे करण्यात आली आहे. उद्घाटन सत्र संपन्न झाल्यानंतर, प्रत्यक्ष वधू-वर उमेदवार परिचय सत्र प्रारंभ होणार आहे. ज्यांना या मेळाव्यात सहभाग नोंदवायचा आहे अशा, सोलापूर व सोलापूर बाहेरील सकल जैन समाजातील विवाह इच्छुक युवक युवती उमेदवारांना मेळाव्यात सहभाग नोंदवता येईल, असे संयोजकांच्या वतीने, आवाहन करण्यात आले आहे.

## बसव सेंटर संस्थेच्यावतीने कै. लिलावती मडकी यांना भावपूर्ण श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

येथील बसव सेंटर संस्थेची सभा श्री राजेंद्र मायनाळ यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न होऊन सभेत अलिकडेच अल्पशा आजाराने निधन पावलेल्या संस्थेच्या उपाध्यक्षा लिलावती रमेश मडकी यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

प्रारंभी कै. मडकीतायी यांच्या प्रतिमेस पुष्पहार श्री नीलकंठप्पा कोनापूरे यांनी अर्पण करून अभिवादन केले. कै मडकी आक्का यांच्या कार्याचा गौरव करताना सौ प्रौणिमा तोटद म्हणाल्या कै. लिलावतीतायी वेळेला महत्व देणाऱ्या होत्या सभासमारंभास वेळेवर उपस्थित राहून इतरांना मार्गदर्शन करीत शांतादेवी दुलंगे म्हणाल्या सामाजिक धार्मिक अध्यात्मिक कार्यात त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे! पुष्पाताई गुंगे यांनी मडकीतायी बसव विचारांप्रमाणे आचरण करून महिलावर्गाला हे विचार समजावून सांगत! रामपूरे तायानी एक वचनगीत सादर करून तायीच्या कार्याची माहिती दिली !कार्याध्यक्ष बाबासाहेब कुलकर्णी यांनी लिलावती आक्कानी या वयात ही आनंदाने कसे जगावे हे स्वत:च्या अनुभवाचे उदाहरण देऊन सभासदना सांगत!सचिव प्रा मल्लिनाथ पाटील सुभाष कुलकर्णी उपाध्यक्ष नीलकंठप्पा कोनापूरे यांनी कै लिलावती मडकी यांच्याबद्दल विचार व्यक्त केले. संस्थाध्यक्ष राजेंद्र मायनाळ आपल्या भाषणात म्हणाले आक्का स्पष्ट विचार व्यक्त करीत त्या शिस्तप्रिय होत्या,संस्थेसाठी त्यानी केलेले योगदान महान आहे. मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबायानी देहदान केले!नंतर सर्व सभासदांनी दोन मिनिट मौन उभे राहून प्रार्थना करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

## श्री दानम्मादेवी मंदिरात गुरुवारपासून बांगड्या भरण्याचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

विजापूर रोडवरील रेवणसिद्धेश्वर मंदिर समोरील श्री दानम्मादेवी व वीरभद्रेश्वर मंदिर समितीच्यावतीने या मंदिरात दि.१३ ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान कार्तिक मास निमित्ताने कुमारिका, सौभाग्यवती आणि जेष्ठ महिला यांना बांगड्या भरण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती ट्रस्ट अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंदिर समितीच्यावतीने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. दररोज सकाळी आरतीसह धार्मिक होणार आहेत. यंदा कार्तिक मास निमित्त महिलांना बांगड्या भरण्याचा कार्यक्रम होत आहे.

भाविक महिलांनी मोठ्या संख्येने या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस सकलेश बाबुळगावकर, विकास मरगूर, राजू बिराजदार, शैलेंद्र आमणगी आदी उपस्थित होते.




## नूमवि मराठी शाळेत राष्ट्रीय एकात्मता दिवस उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

नू. म.वि.मराठी शाळेत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकात्मता दिवस म्हणून साजरी करण्यात आली.

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दिपाली कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतातून सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधीजी यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. कुमारी अनन्या फुलारी इयत्ता पहिली इ या विद्यार्थिनीने इंदिरा गांधीजी यांची वेशभूषा परिधान केली होती. सूत्रसंचालन व आभार नर्मदा कनकी यांनी मानले.



## शिवाजी महाराज पुतळा परिसरातील सुशोभीकरणाचे काम युद्ध पातळीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अश्वारूढ पुतळा परिसरातील सुशोभीकरण आणि मजबुतीकरणचे काम मोठ्या प्रमाणावर रेंगाळलेले होते. त्यामुळे शिवभक्तांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला होता.

आज शुक्रवारी सकाळी या ठिकाणी स्लॅबचे काम सुरू झाले असल्याचे दिसून आले. साधारण एक वाजेपर्यंत स्लॅबचे काम पूर्ण होईल असे संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती दिली. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित विभागाला आणि ठेकेदाराला सूचना दिल्या तसेच संबंधित ठेकेदाराला नोटीसा बजावण्यात आल्यानंतर युद्ध पातळीवर कामास सुरुवात झाली आहे. यामुळे दिलेल्या वेळेत हे काम पूर्ण होईल अशी मागणी शिवभक्तानी केली आहे अन्यथा दिलेल्या इशारा प्रमाणे तीव्र आंदोलन करण्यात येईल.



## प्रभाग ७ येथे ड्रेनेज लाईन घालण्याच्या कामाचे शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

प्रभाग क्रमांक ७ मधील निराळे वस्ती येथे नवीन ड्रेनेज लाईन घालण्याच्या कामाचे शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पुजन करून स्थानिक नागरिकांच्या हस्ते पाईप लाईनचे पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी आमदार विजयकुमार देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, उपजिल्हाप्रमुख तुकाराम नाना मस्के, तालूकाप्रमुख राजकुमार शिंदे, नागा मंडलिक, श्रीकांत घाडगे, गणेश नरोटे, जय मस्के, सागर वाघमारे, किरण पवार, अजय मस्के, अमोल कदम यांच्यासह मान्यवर व परिसरातील नागरीक उपस्थित होते.

# महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या खेळाडूंवर अन्याय

## क्रीडा व शालेय शिक्षण मंत्र्यांनी लक्ष देणे गरजेचे



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**

सी.बी.एस.ई., नवोदय विद्यालय, विद्या भारती, केंद्रीय विद्यालय संघटन अशा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक बोर्डाच्या शाळामध्ये शिकत असलेल्या खेळाडूंना, त्या त्या शैक्षणिक बोर्ड अथवा क्रीडा विभाग आयोजित स्पर्धा यापैकी कोणत्याही एकाच ठिकाणी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सहभागाची संधी द्यावी. तथापी दोन्ही ठिकाणी सहभागी झाल्याचे सिध्द झाल्यास अशा संबंधित शाळा व विद्यार्थ्यास त्या वर्षीच्या उर्वरीत स्पर्धा व आगामी वर्षातील सर्व क्रीडा स्पर्धेतील सहभागांपासून वंचित ठेवण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, अशी तरतूद या वर्षीपासूनच्या शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाकरीता ठेवण्यात यावी असे क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने ११ जुलै २०२५च्या पत्राद्वारे क्रीडा खात्याच्या अप्पर मुख्य सचिवांना कळविले आहे. त्यास शासन स्तरावर मान्यता प्रदान करावी, असेही कळविले आहे. परंतु यावर अद्यापपर्यंत त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

यामुळे या बोर्डातील खेळाडू राज्यस्तरापर्यंत दोन ठिकाणी शालेय क्रीडा स्पर्धेचा लाभ घेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या खेळाडूवर २०१३ पासून अन्याय होत आहे. याचे जिवंत उदाहरण नुकतेच घडले आहे. नुकत्याच दोन ते चार नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्य शालेय व्हॉलिबॉल १९ वर्षे वयोगटाची स्पर्धा चंपावेन महाविद्यालय सांगली या ठिकाणी झाली. या स्पर्धेमध्ये पुणे विभागातून मुलींच्या सीबीएससीच्या मिलेनियम स्कूल पुणे या संघाने विजेतेपद पटकाविले. मात्र, विजेत्या संघातील एकही खेळाडू सीबीएससी स्कूलच्या स्पर्धेसाठी प्राधान्य देऊन निवड चाचणीकरता थांबला नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रासाठी आवश्यक असणारे अव्वल दर्जाचे खेळाडू महाराष्ट्राला मिळाले नाहीत. याशिवाय पुण्याच्या या संघाने जिल्हा, विभाग, राज्यस्तरावर प्राविण्य प्राप्त करून पुणे विभागातील इतर संघांवर व राज्यातील सहभागी संघांवर एक प्रकारे अन्यायच केलेला आहे. हा प्रकार क्रीडा खात्याने थांबवणे गरजेचे आहे.

भारतीय शालेय खेळ पुरस्कृत, शालेय क्रीडा स्पर्धा तसेच नेहरु कप हॉकी व सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन दरवर्षी केले जाते. या स्पर्धेत राज्याचा संघ सहभागी करण्याकरीता राज्यात तालुका, जिल्हा, विभाग व राज्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राज्य स्पर्धेमधून महाराष्ट्र संघाची निवड होते. हा संघ शालेय राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचे नेतृत्व करतो.

भारतीय शालेय खेळ महासंघ ही राष्ट्रीय स्तरावरील एक नोंदणीकृत संस्था असून, राष्ट्रीय स्तरावर शालेय राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करणे तसेच आंतरराष्ट्रीय शालेय स्पर्धेत भारताचा संघ सहभागी करण्याची जबाबदारी त्यांच्याद्वारा पार पाडली जाते. भारतीय शालेय खेळ महासंघास २८ राज्ये, ८ केंद्रशासीत प्रदेश व ९ अन्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक बोर्ड हे संलग्न असून त्यांना स्वतंत्र युनिट म्हणून संलग्नता दिली असल्याने त्यांचे विविध खेळप्रकारांतील संघ शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होत असतात. २०१३ पासून सी.बी.एस.ई. शैक्षणिक बोर्डात शिकत असलेल्या राज्यातील खेळाडूंना क्रीडा विभागाद्वारा आयोजित विविध स्तरावरील शालेय व इतर क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यास सहमती कळविण्यात आली आहे. तद्नंतर अन्य बोर्डाचे खेळाडूंही क्रीडा विभागाद्वारा आयोजित विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात. राज्यात सद्यस्थितीत सी.बी.एस.ई. बोर्डाच्या सुमारे १५९५, सी.आय.एस.ई.च्या २९० तर आय.बी. एस.ओ.च्या १२५ शाळा कार्यरत आहेत. या शाळामध्ये शिकणाऱ्या खेळाडूंची संख्याही लक्षणीय आहे. राज्यात अशा शाळांना क्रीडा विभागाच्या विविध क्रीडा स्पर्धात सहभागी होण्याची परवानगी असल्याने ते क्रीडा विभाग व संबंधित शैक्षणिक बोर्डद्वारा आयोजित क्रीडा स्पर्धा अशा दोन्ही ठिकाणी स्पर्धेत सहभागी होतात. इतर शैक्षणिक बोर्डात शिकणाऱ्या खेळाडूमध्येही प्रतिभावंत खेळाडूंची संख्या लक्षणीय असून अशा खेळाडूंची दोन्ही ठिकाणच्या स्पर्धेतून शालेय व इतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड होते. अशा खेळाडूंकडून ऐनवेळी राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार नसल्याचे कळविले जाते, अशा प्रसंगी काहीवेळा प्रतिक्षा यादीमधील पात्र खेळाडूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी करुन, त्यांस राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी करणे खूप जिकरीचे होते. काही प्रसंगी खेळाडू सहभागी होऊ शकत नाहीत. भारतीय शालेय खेळ महासंघ पुरस्कृत शालेय राष्ट्रीय स्पर्धेत एकुण पदक तालिकेत महाराष्ट्र गेल्या २० वर्षापासून प्रथम ३ स्थानावर कायम असून, दरवर्षी मिळणाऱ्या पदकांमध्ये वाढ होत आहे. राज्याच्या एकुण पदकांमध्ये अन्य शैक्षणिक बोर्डाच्या शाळेत शिकणाऱ्या खेळाडूंच्या पदकांचा समावेश आहे.

राज्य शासनाने, क्रीडा विभागाच्या स्पर्धेत सहभागी तसेच प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत ५% खेळाडू आरक्षण, शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला असून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या गुणांकनामध्ये शालेय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील प्राविण्यासाठी गुणांची तरतुद केलेली आहे. यामुळे अन्य शैक्षणिक बोर्डातील खेळाडू विद्यार्थ्यांचा शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ओढा असल्याचा दिसून येतो. तथापी अशा खेळाडूंना एकाच शालेय वर्षात २-२ ठिकाणी सहभागाची संधी मिळत असल्याने राज्य शैक्षणिक बोर्डाकडे शिकत असणाऱ्या खेळाडूंना एकदाच संधी मिळते. त्यामुळे महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या खेळाडूंवर अन्याय होत आहे

अन्य शैक्षणिक बोर्डाच्या विद्यार्थ्यांना शालेय क्रीडा स्पर्धेतील सहभागापासून रोखणे अथवा वंचित ठेवणे हेही संयुक्तिक ठरत नाही. परंतु राज्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धेतील सहभागाच्या समान संधी उपलब्ध करुन देण्यासाठी संबधित शैक्षणिक बोर्ड अथवा क्रीडा विभागाच्या स्पर्धा यौपकी कोणत्याही एकाच ठिकाणी सहभागी होता येईल अशा प्रकारचा निर्णय होणे आवश्यक आहे. यामुळे ज्या खेळाडूंना शासनाच्या विविध योजनांचा लाभ व्हावा या हेतूने, क्रीडा विभागाच्या स्पर्धेत सहभागी व्हावयाचे आहे, त्यांना सहभागी होणे शक्य होईल. त्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या शिफारशीकडे क्रीडा व शालेय शिक्षण मंत्र्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# हत्तूर गावासाठी ४ कोटी ३५ लाखांचा निधी

## पालकमंत्री गोरेंच्या हस्ते हत्तुर गावात विकासकामांचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

प्रत्येक गावातील जनता आपल्या ग्रामदैवतावर श्रद्धा ठेवते. हत्तुरच्या ब वर्गातील श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर या ग्रामदैवताच्या देवस्थान विकासासाठी यापूर्वी ३ कोटी ७५ लाख रुपये निधी मंजूर असून येथील पुल व रस्त्यासाठी १ कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याने एकूण ४ कोटी ३५ लाखाचा निधी दिल्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमारे गोरे यांनी सांगितल



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत हत्तुर (ता. दक्षिण सोलापूर) येथे ग्रामदैवत श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर मंदिराच्या विकास आराखड्याच्या कामाचे भूमिपूजन पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार सुभाष देशमुख, प्रांत अधिकारी सुमित शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सहाय्यक गटविकास अधिकारी बाळासाहेब पाटील, सरपंच ज्योतीताई कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीबद्दल तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना दिले. मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी दिला आणि पावसामुळे व पुरामुळे खरडून गेलेल्या शेत जमिनीला ४७ हजार रुपये हेक्टरी मदतीचा निर्णय घेतला याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे धन्यवाद व्यक्त केले. यावेळी पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते ३ कोटी ७५ लाख रुपये निधीच्या विकास कामाचे तसेच गावातील इतर विकास कामांसाठी ६० लाख रुपये निधीची कामाचे भूमिपूजन करण्यात आले. ज्यामुळे एकूण ४ कोटी ३५ लाख रुपये निधीच्या कामांचे भूमिपूजन झाले. आमदार सुभाष देशमुख यांनी ग्रामदैवत श्री सोमेश्वर व बनसिद्धेश्वर यांच्या विकासाबरोबरच गावातील इतर विकास कामांबद्दल बोलताना पालकमंत्री यांचे आभार मानले. त्यांनी गावचा शैक्षणिक व आर्थिक स्तर वाढवण्यासाठी विशेष लक्ष तसेच पर्यटनाच्या दृष्टीने ही गावाचा सर्वांगीण विकास साठी व कुडलसंगम या तिर्थ क्षेत्राच्या कामाला देण्याबाबत प्रयत्न करण्याची मागणी त्यांनी केली. कार्यक्रम च्या शेवटी वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामूहिक वंदे मातरम गीताचे गायन करण्यात आले.

## महत्वाचे...



### एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक सभा

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात दिवाळीपूर्वी नुकतीच पालक सभा पार पडली. या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू आणि सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस. एच. पवार तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले उपस्थित होते.

सभेचे उद्घाटन डॉ. पवार यांनी केले. त्यांनी पालकांशी संवाद साधत सांगितले, विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास हेच महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेतल्यास त्यांचे भविष्य अधिक उज्वल होईल. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनीही पालकांना मार्गदर्शन करत म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांचा सृजनशील विकास आणि नैतिक मूल्यांची जोपासना ही आपल्या जबाबदारी आहे. पालक आणि शिक्षक यांच्यातील संयुक्त सहकार्य हेच यशाची गुरुकिल्ली आहे. पालक सभेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच संपलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवात विविध ११ प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत, जनरल चॅम्पियनशिप पटकावल्याचा गौरव साजरा केला गेला. यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान पालकांसमवेत करण्यात आला, ज्यामुळे पालकांना आपल्या मुलांच्या क्षमतेवर अभिमान वाटला. कार्यक्रमाचे संयोजन सामान्य विज्ञान व अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख व प्राध्यापकांनी केले, तर कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. अमित कांबळे यांनी उत्कृष्ट काम पाहिले. प्रा. के. एस. पाटील (विभाग प्रमुख) यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता उपाययोजना आणि महाविद्यालयात चालणाऱ्या आधुनिक शिक्षण पद्धतींची माहिती दिली. तसेच पी. जी. गार्डीयन संकल्पनेविषयी माहिती देत, पालकांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर विशेष लक्ष देण्याची मागणी केली.



### नियोजीत मुरलीधर मंदीर भक्त निवासाचे बांधकाम प्रगतीपथावर

**अक्कलकोट, दि. ७ नोव्हेंबर-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित श्रीमंत मृदूलाराजे भोसले मुरलीधर मंदीर नियोजीत भक्त निवासाचे बांधकाम देवस्थानच्या वतीने हाती घेण्यात आले आहे. सदरहू बांधकामाचे कार्य श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या प्रयत्नातून जोमाने सुरू आहे. या बांधकामाची पाहणी करून सद्या नियोजीत मुरलीधर मंदीर भक्त निवासाचे बांधकाम प्रगतीपथावर असल्याची माहिती मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली. या प्रसंगी बोलताना चेअरमन महेश इंगळे यांनी सदरहू बांधकामाचे

आत्तापर्यंत फाईल फाउंडेशन, पाईल कॅप, कॉलम आणि पहिला मजला स्लॅब पर्यत आपले काम योग्यरीत्या पूर्ण झाले आहे. पहिला स्लॅब ५२३० स्केअर फुटचा स्लॅबचा कॉंक्रीट कास्टिंग करण्यासाठी आर.एम.सी.म्हणजेच रेडी मिक्स कॉंक्रेट एम.२५ ग्रेड अल्ट्राटेकचे मटेरियल वापरले आहे. उर्वरीत बांधकाम स्वामी भक्तांच्या सहकार्यातून लवकरच पुर्ण होवून स्वामी भक्तांच्या सेवेत ही वास्तु (नियोजीत भक्त निवास) उपलब्ध होणार आहे. ज्या स्वामी भक्तांना या बांधकाम सेवेत सहभागी व्हायचे आहे त्यांनी ९८६०१८९३५१/०२१८१-२२०३२१/९६३७९०४८४६ या क्रमांकावर संपर्क साधून श्री स्वामी समर्थांच्या या बांधकाम सेवेत सहभागी व्हावे असे आवाहन चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.



### 'लावण्या' कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ उत्साहात

**बार्शी, दि.७ नोव्हेंबर-**

नैसर्गिक सौंदर्याचे स्वाभाविक वर्णन, मानवी जीवनाच्या विविध भावछटा, ग्रामीण जीवनाची यथार्थ वास्तवता सर्व कथांचे उत्तरार्धात लीलयाने मानवतावादी उदात्तीकरण, हे आबासाहेबांच्या सर्व कथांचे स्वाभाविक वैशिष्ट्य आहे, असे प्रतिपादन साहित्यिक, संत वाङ्मयाचे अभ्यासक दत्ता गोसावी यांनी आबासाहेब घावटे लिखित लावण्या या कथासंग्रहाच्या प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा बार्शी व कवी कालिदास मंडळ बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी बार्शी शाखेचे अध्यक्ष पां.न. निपाणीकर हे होते. यावेळी प्राचार्य चंद्रहंस गंभीर, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी अशोक खुळे, मातृभूमी प्रतिष्ठानचे सचिव प्रतापराव जगदाळे हे प्रमुख उपस्थित म्हणून तसेच सत्कारमूर्ती आबासाहेब घावटे व जयश्री घावटे हे व्यासपीठावर होते. कवी कालिदास मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र इकारे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमात अशोक खुळे, प्रताप जगदाळे, चंद्रहंस गंभीर या मान्यवरांची समायोजित भाषणे झाली.अध्यक्षीय भाषणात पांडुरंग निपाणीकर यांनी घावटे यांचे साहित्य, समाज मनाचे वास्तव प्रतिबिंब आहे, तसेच ग्रामीण स्त्री जीवनाचे विविध भाव पैलू समर्पकपणे चित्रीत करणारे उत्कृष्ट साहित्य असल्याचे सांगून भारतीय तरुणांनी साहित्य आणि समाजसेवा यामध्ये आघाडीवर असले पाहिजे, असे मत व्यक्त केले. कवी किरण विभुते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.डॉ. रविराज फुरडे यांनी आभार मानले. आनंद घावटे, जयश्री घावटे, नितीन गायकवाड, बी. आर. देशमुख, प्रकाश गव्हाणे, सुमन चंद्रशेखर, कल्याण घळके, शारदा पानगावकर, श्रीमंत चौरे, ज्ञानेश्वर देवराम, आप्पासाहेब भोंग यांनी परिश्रम घेतले.

## कुत्रे चावल्याने एकाचा मृत्यू; संपर्कातील ४० जण भयभीत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ नोव्हेंबर-**

व्हसूर येथे कुत्र्याने चावा घेतल्याने भिमराया मडी (वय ७०) यांना जीव गमवावा लागला. संपर्कातील ४० जण भयभीत झाले आहेत.

व्हसूर येथील भिमराया मडी यांना गावातील चावरा कुत्रा चावला, मात्र त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. जास्त त्रास झाल्याने त्यांना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथे त्यांचे शनिवारी रात्री निधन झाले. या निधनाची वार्ता समजल्यावर व्हसूर गावात एकच खळबळ माजली. त्यांचा मृतदेह व्हसूर गावी रविवारी सकाळी अंत्यविधीसाठी आणण्यात आला होता. त्यांच्या संपर्कात असलेले ४० जण हादरले. यात एका अवघे २० महिने वय असलेल्या बालकाचा आणि एका गर्भवती महिलेचा समावेश आहे. ही मंडळी तातडीने उपचार घेण्यासाठी नागणसूर येथील आरोग्य केंद्रात गेली मात्र तेथे कोणीही दखल घेतली नाही. त्यांनी ही घटना जिल्हा शिवसेना उपप्रमुख सुनील कटारे यांच्या कानावर घातली. त्यांनी तातडीने या सर्व ४० जणांना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात बोलावले. शिवसेना आरोग्य विभागाचे प्रमुख बसवराज अल्लोळी हेही मदतीला धावले. जिल्हा उपप्रमुख कटारे यांनी ही घटना तालुका वैद्यकीय अधिकारी अर्जुन करजखेडे यांच्या कानावर घातली. ग्रामीण रुग्णालयात अगोदरच सर्दी, ताप, खोकला याची रूग्ण संख्या खूप मोठी होती. तरी देखील घटनेचे गांभीर्य पाहून वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल क्षीरसागर, आरोग्यसेविका फुलसुंदर, तौफिक शेख यांनी सर्व ४० जणांना तातडीने टीटी आणि संसर्ग प्रतिबंधक इंजेक्शन दिले.

## बार्शीला ३ डिसेंबरला मिळणार नवीन नगराध्यक्षा; इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ नोव्हेंबर-**

राज्यातील नगरपालिका निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर बार्शीतही निवडणूक कामाला वेग आला आहे. बार्शीत यंदाही आमदार दिलीप सोपल आणि माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यात निवडणुकांचा सामना होत आहे. महायुती आणि महाविकास आघाडी म्हणून एकत्र निवडणूक लढली तर महायुतीमध्ये राजेंद्र राऊत हेच प्रभावी आहेत तर, विधानसभेला मोलाची साथ दिल्याने राष्ट्रवादीचे विश्वास बारबोले आणि कॉंग्रेसच्या आरगडे यांनाही मानाचे स्थान सोपल गटाकडून दिले जाईल. मात्र, नगराध्यक्षपदाचे उमेदवार कोण? हा प्रश्न कायम आहे.

तब्बल ९ वर्षानंतर होत असलेल्या बार्शी नगरपालिकेची निवडणूक अवघ्या महिनाभरात जिकडं-तिकडं होईल. त्यामुळे, ३ डिसेंबरला म्हणजे महिनाभराच्या आतच बार्शीला नव्या नगराध्यक्षा मिळणार आहे. बार्शीचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव असल्याने ही संधी बार्शीकर कोणाला देतात, हाच प्रश्न कायम आहे. महाविकास आघाडीकडून उज्वला सोपल यांचे नाव आघाडीवर असून कल्पना अक्कलकोटेंसाठीही रणनीती आखली जात आहे. मात्र, निर्मला बारबोले यांच्या नावासाठीही बारबोले कुटुंबीय आग्रही आहेत. दुसरीकडे भाजपसाठी राऊत गटाकडून सध्यातरी माजी नगरसेवक प्रशांत कथले यांच्या पत्नी तेजस्विनी कथले यांचे नावाची चर्चा आहे. याशिवाय, राऊत कुटुंबातील कोमल विजय राऊत यांचेही नाव आघाडीवर आहे. मात्र, भाजप आणि राजेंद्र राऊत यांच्या धक्कातंत्रानुसार अचानक नवे नाव समोर आल्यास आश्चर्य वाटणार नाही.

दरम्यान, येत्या १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल होण्यास सुरुवात होत असल्याने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीला दोन दिवसांत सुरुवात होत आहे. काही इच्छुकांनी आपल्या नेत्यांशी संपर्कही साधण्यास सुरुवात केल्याची माहिती आहे. बार्शीतील २१ प्रभागात दोन्ही गटाकडील उमेदवार ४२ आणि ४२ म्हणजेच ८४ उमेदवार निश्चित होणार असून अपक्ष उमेदवार म्हणून कोण मैदानात उतरते तेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## कांदा बाजार मंडईत भाजीविक्री रस्त्यावरच



### शेडमधील व्यापारीकट्टे ओसाड; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ नोव्हेंबर-**

अक्कलकोट नगरपालिकेने लाखो रुपए खर्च करून कांदा बाजार येथे भाजी विक्रेतेसाठी उन पावसा पासून संरक्षणा साठी शेड व्यापारी कट्टे बांधली. पण ह्याचा वापरच होत नाही. सोमवारी आठवडा बाजारात भाजी विक्रेते उघड्यावर चिखल पाणी रस्त्यावर भाजी विक्रीसाठी बसत आहेत यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.

अक्कलकोट नगर पालिकेने लाखो रुपए खर्च करून कांदा बाजार येथे भाजी मंडई बांधली भाजी विक्रीसाठी ऊन पावसा पासुन संरक्षणासाठी व्यापारी कट्टे बांधली मात्र सोमवारी आठवडा बाजारहा रस्त्यावरच भरला जात आहे. पत्राशेड मधील भाजी विक्रेते कट्टे ओसाड पडली आहेत. रस्त्यावर चिखलात पाऊसात भाजी विक्री होत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला बाधा येऊ शकते. नगरपालिकेने लाखो रुपए खर्च करून भाजी मंडई शेड व्यापारी कट्टे बांधली मात्र आठवडा बाजार रस्त्यावरच भरला जात आहे आठवडा बाजार हा भाजी मंडईतील व्यापारी कट्ट्यावर भरल्यास भाजी उन पाऊस चिखल यापासुन सुरक्षित राहिल. यामुळे भाजी दुषित होणार नाही ग्राहकाना स्वच्छ भाजीही मिळू शकेल असे नागरीकांतून बोलले जात आहे.




## गुरुनानक यांची मानवतावादी शिकवण आचरणात आणावी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : दि. ७ नोव्हेंबर-**

गुरुनानक यांनी अंधश्रद्धा रूढी परंपरा दांभिकतेवर प्रहार करून सत्य, विनयशीलता,शांतता आदी मानवता धर्माची शिकवण समाजाला दिली. त्यांची हीच शिकवण आचरणात आणली तर समाज परिवर्तनात गती येईल असे मत मलकप्पा भरमशेट्टी यांनी व्यक्त केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुरुनानक जयंती साजरी करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी गुरुनानक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. शितल झिंगाडे-भस्मे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा रविंद्र कालिबत्ते उपस्थित होते.

## माणूस फाउंडेशनकडून पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ नोव्हेबर-**

अतिवृष्टीमुळे प्रभावित सोलापूर जिल्ह्यात दक्षिण सोलापूर तालुक्यातील राजूर, संजवाड, वडकबाळ येथील जिल्हा परिषद शाळेतील ३०० विद्यार्थ्यांना माणूस फाउंडेशनतर्फे शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून मदतीचा हात देण्यात आला.

राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून अनेक गावांतील कुटुंबे विस्थापित झाली आहेत. या पार्श्वभूमीवर माणूस फाउंडेशनने सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक मदत उपक्रम राबवला. या उपक्रमाअंतर्गत ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना वही, ड्रॉइंग बुक, पेन्सिल, कंपास पेटी इत्यादी शालेय साहित्याचे संच वाटप करण्यात आले.

यापूर्वी चिपळूणमधील पूरग्रस्तांना मदत केली. आता सोलापूरमधील मुलांना शिक्षणाची साथ देण्याचा प्रयत्न करत आहोत. शिक्षण हा आमच्या कार्याचा केंद्रबिंदू असल्याचे संस्थेचे अध्यक्ष अश्वघोष बनसोडे यांनी सांगितले. याप्रसंगी किरण अहिरे, अखिल पांचाळ, ॲड.महेंद्र बनसोडे, संतोष बनसोडे, पोलिस पाटील, संजय बनसोडे, उदय बनसोडे, सुनिल बनसोडे, सत्यजीत बर्वे आदी उपस्थित होते.



## १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे सन २०२५ सालातील चौथे राष्ट्रीय लोकअदालत दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेले आहे.

या लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बॅंक वसुली प्रकरणे, कलम १३८ एन. आय. ॲक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी, यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भुसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बॅंक, सहकारी बॅंक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, बॅंक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

## ११ लाख २५ हजारांचे ४५ मोबाईल जप्त

### टेंभुर्णी पोलीस ठाण्याची कामगिरी

### पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते मोबाईल तक्रारदारांना परत

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ७ नोव्हेंबर-**

नागरिकांचे गहाळ मोबाईल शोधून देण्यात टेंभुर्णी पोलीस ठाण्याने आदर्शवत कामगिरी केली आहे. तब्बल ११ लाख २५ हजार रुपये किमतीचे ४५ मोबाईल फोन शोधून काढत संबंधित तक्रारदारांच्या हाती सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आले.



दिनांक ५ नोव्हेंबर रोजी कुलकर्णी यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे वार्षिक निरीक्षण साठी भेट दिली. त्यावेळी आयोजित विशेष कार्यक्रमात गहाळ मोबाईल मालकांना परत देण्यात आले. मोबाईल मिळालेल्या नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पसरले होते नागरिकांचे मोबाईल गहाळ झाल्यानंतर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या जातात. या तक्रारींचा तांत्रिक तपास करून गहाळ मोबाईल शोधण्यासाठी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. नारायण पवार यांनी झउ/१५५ जगदाळे यांच्या प्रमुखत्वाखाली एक विशेष पथक स्थापन केले. या पथकाने सायबर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण यांच्या मदतीने सखोल तपास करून

मोहिमेत आतापर्यंत ४५ मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले असून, त्यांच्या एकत्रित किंमती ११,२५,००० इतकी आहे. शुभम यशवंत पाटील (रा. बावी, ता. माढा), अमर रामलिंग सातव (रा. चोभेपिंपरी, ता. माढा), विठ्ठल गायकवाड (रा. टेंभुर्णी), तानाजी कृष्णा पवार (रा. टेंभुर्णी), विजया शंभू शिंदे (रा. टेंभुर्णी), शहाबाद खलील शेख (रा. टेंभुर्णी), भारत माणिक गोफणे (रा. टाकळी), अमृता भीमराव गायकवाड (रा. चांदज) तसेच आणखी ३७ नागरिकांना त्यांचे मोबाईल परत मिळाले.

कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा श्रीमती अंजना कृष्णा व्ही.एस., पोलीस निरीक्षक नारायण पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी, पोलीस उपनिरीक्षक अजित मोरे, कुलदीप सोनटक्के, प्रशांत मदने, पुरुषोत्तम धापटे, स्वाती सुरवसे तसेच सर्व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## रिपाइंच्या वतीने काजल भोसलेचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

फोंडशिरस (ता. माळशिरस) प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर फोंडशिरस येथील काजल विलास भोसले हिने एमपीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून तिने राज्यात अकरावा क्रमांक पटकावला आहे. अत्यंत साध्या कुटुंबातील काजल हिने वडील विलास भोसले आणि माता बेबी भोसले यांच्या प्रेरणेतून शिक्षणाचा ध्यास घेत सातत्याने अभ्यास केला. काजलच्या यशाचा गौरव म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), माळशिरस तर्फे तिचा आणि तिच्या आई-वडिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी रिपाइं महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य राजाभाऊ सरवदे यांनी दूरध्वनीद्वारे काजलचे अभिनंदन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, तालुका सहसंघटक दिनेश भोसले, संतोष बनसोडे, प्रमोद भोसले, अनिकेत निचळ, सौरभ रणदिवे उपस्थित होते.

## वंदे मातरम्चे सामूहिक गायन



### बार्शीत शालेय विद्यार्थ्यांसह हजारोंची उपस्थिती लक्षणिय

**अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांची मात्र दांडी**

**बार्शी, दि.७ नोव्हेंबर-**

वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संत विसोबा खेचर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बार्शी आयोजित, तहसीलदार एफ. आर. शेख यांच्या अध्यक्षतेखाली भगवंत मैदान येथे मोठ्या उत्साहात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. संत विसोबा खेचर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बार्शीचे प्राचार्य प्रदीप हरिदास यांच्या नेतृत्वाखाली शहरातील शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. बार्शी शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी, बार्शी नगरपरिषद, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, अग्निशमन, रुग्णवाहीका, पत्रकार, विविध सामाजिक संघटना तसेच बार्शीकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परंतु देशाला अभिमान असणाऱ्या वंदे गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आनंदोत्सव साजरा होत असलेल्या, एवढ्या मोठ्या प्रशासकीय कार्यक्रमाला बऱ्याच जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाला दांडी मारली. कार्यक्रमास अनुपस्थित राहिलेल्या सदरील अधिकाऱ्यांवर समितीचे अध्यक्ष तथा बार्शी तहसीलदार कठोर कारवाई करणार का? असा सवाल नागरिकांमधून समोर येत आहे.




### अध्यापिका विद्यालय, बार्शी

अध्यापिका विद्यालय बार्शी येथे आज वंदे मातरम् या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. स्व. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय रचित वंदे मातरम् या भारताच्या राष्ट्रीय गीताच्या निर्मितीला दैनंदिन वापरातील ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण झाले. त्यानिमित आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये या गीताचे सामूहिक गायन घेण्यात आले. प्राचार्य श्री जीवन लोखंडे यांनी वंदे मातरमच्या निर्मितीचा इतिहास आपल्या भाषणातून सांगितला. कार्यक्रमास प्रा. सोमनाथ देंडे, प्रा. रतिकांत हामणे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सुभाष माळी व प्रा. प्रमोद मांडे, क्षीरसागर तसेच प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



### आर्या कृषी महाविद्यालय, माढा

आर्या कृषी महाविद्यालय, मानेगाव येथे वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त सामूहिक गायन कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीच्या भावनेने करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, ऐक्य आणि सांस्कृतिक एकात्मतेच्या मूल्यांची जपणूक करणे हा होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे यांनी भूषविले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी वंदे मातरम या गीताचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय महत्त्व स्पष्ट केले. या गीताने स्वातंत्र्य संग्रामात क्रांतिकारी भूमिका बजावली असून आजही ते राष्ट्रभावनेचे प्रतीक आहे, असे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रा. खंडेराव वाघे यांनी केले, तर आभार प्रा. हनुमंत निगुडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकवर्ग आणि कर्मचारीवर्ग यांनी सहकार्य केले. याप्रसंगी प्रा. संदीप मुरूमकर, प्रा. तुषार नामदे, प्रा. डॉ. तृप्ती राठोड, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, प्रा. अमोल माळी, प्रा. स्नेहल साठे, प्रा. धनंजय कुलकर्णी, प्रा. डॉ. संदीप मखमले, प्रा. अक्षय शेळके तसेच कुमार शिंदे आणि रोहित घळके उपस्थित होते.

### लक्ष्मी आनंद विद्या मंदिर, टेंभूर्णी

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित, लक्ष्मी आनंद विद्यामंदिर व ज्यू. कॉलेज टेंभुर्णी येथे ७ नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् गीताचा १५० वा वर्धापन दिन व विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यादरम्यान वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा या व अशा अनेक विविध उपक्रमातून आजच्या दिवसाचे महत्त्व विशद करण्यात आले. यावेळी वंदे मातरम या गीताविषयी अडाणे यांनी तर विद्यार्थी दिनाविषयी वजाळे सर यांनी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. संस्थाचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रशालेचे प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे उपस्थित होते.

## ऊसाला पहिली उचल जाहीर करा, मगच कारखाने सुरु करा

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे निवेदन; १२ नोव्हेंबरनंतर करणार आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ नोव्हेंबर-**

यंदाचा गळीत हंगाम सुरु झाला असुन या गाळप हंगामात तुटत असलेल्या ऊसाला पहिली उचल एकरकमी विनाकपात प्रतिटन जाहीर करावी आणि मगच कारखाने सुरू करावेत अशी मागणी करीत आक्रमक भूमिका घेतलेल्या माळशिरस तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी श्री शंकर सहकारी सदाशिवनगर, सहकार महर्षी यशवंत नगर, दि सासवड माळी माळीनगर, ओंकार साखर कारखाना चांदापुरी, पांडुरंग सहकारी साखर कारखाना श्रीपुर येथील कार्यकारी संचालकांना निवेदन दिले.

पहिली उचल प्रतिटन विना कपात जाहीर करावी. यावर्षी साखरेला चांगला भाव असून इथेनॉल बगॅस, मोलिसीस, प्रेसमड, अल्कोहोल यांनाही चांगला भाव आहे. उप पदार्थाचा दरही स्थिर आहे. त्यामुळे साखर कारखानदारांनी येत्या ११ नोव्हेंबरपूर्वी पहिली उचल जाहीर करावी अन्यथा १२ नोव्हेंबर नंतर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी ज्येष्ठ नेते मगन काळे, विजय नेवसे, अजित बोरकर अमरसिंह माने-देशमुख, दत्ता भोसले, दिनेश ताम्हणे, अजय बोडरे, नारायण बोराटे, तेजस भाकरे, शिवाजी वाघमारे, बापू आडत, राजेश खरात, विलास काळे यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



**पिलीव : पहिली उचल जाहीर कराचे निवेदन कारखाना प्रशासनास देताना मगन काळे, विजय नेवसे, अजित बोरकर, अमरसिंह माने-देशमुख, दत्ता भोसले, दिनेश ताम्हणे, अजय बोडरे, नारायण बोराटे, तेजस भाकरे, शिवाजी वाघमारे, बापू आडत, राजेश खरात, विलास काळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते.**

> माळशिरस तालुक्यातील सर्वच साखर कारखान्यांनी पहिली उचल जाहीर न करता आपले कारखाने सुरू केले आहेत. यावर्षी अति पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कारखानदारांनी भान ठेवून शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून पहिली उचल जाहीर करावी अन्यथा १२ नोव्हेंबर नंतर माळशिरस तालुक्यातील सर्वच साखर कारखान्यांचे धुराडे स्वाभिमानी शेतकरी संघटना बंद करून गव्हाणीत ऊसाऐवजी स्वाभिमानीचे कार्यकर्ते उतरतील यास सर्वस्वी साखर कारखानदार जबाबदार असतील.
>
> **- अजित बोरकर, तालुकाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना, माळशिरस.**



## 'उमेद' तर्फे झाडी येथे महिला मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.७ नोव्हेंबर-**

महिलांना सक्षम आणि स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान)च्या वतीने झाडी (ता.बार्शी) येथे महिला मार्गदर्शन मेळावा घेण्यात आला. यामध्ये बचत गट प्रेरिकांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरूवात सरपंच रमेश सांगुळे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी उपसरपंच शशिकांत मते, संतोष पालखे, एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर, मंचच्या आशा चव्हाण, प्रतिक्षा सांगुळे, सरोजा मते, स्वाती मते, अंजू सांगोळे, अश्विनी मते, कोमल वाघमारे आदी सदस्या व गावातील अन्य महिला उपस्थित होत्या. उपस्थित सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार व सन्मान करून त्यांचे स्वागत करण्यात आले. 'उमेद' अभियानाचे प्रभाग समन्वयक संतोष पालके यांनी झाडी येथील प्रतिक्षा सांगुळे यांची सर्वानुमते प्रेरिका म्हणून निवड जाहीर केली. यावेळी सरपंच सांगुळे यांनी महिला सक्षमीकरणासंदर्भात मार्गदर्शन केले. समन्वयक पालके यांनी उमेद अभियानाविषयी सविस्तर माहिती दिली. या अभियानाचे महत्त्व, बचत गटांचे फायदे, आणि महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी हे अभियान कसे उपयोगी ठरू शकते, याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. आशा चव्हाण यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. सरोजा मते यांनी आभार मानले.

## लक्ष्मण हाके आणि मराठा कार्यकर्ते आमने-सामने

### अंगावर धाऊन घोषणाबाजी; पोलिसांमुळे बाका प्रसंग टळला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ नोव्हेंबर -**

पंढरपूरमध्ये लक्ष्मण हाके यांच्या दौऱ्या दरम्यान मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांशी शाब्दिक वाद झाला. एक मराठा लाख मराठा च्या घोषणांमुळे वातावरण तापलं आणि परिस्थिती हाताबाहेर गेली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने हाणामारी सारखा मोठा अनर्थ टाळला.

या घटनेबाबतची सविस्तर माहिती अशी की, ओबीसीचे नेते लक्ष्मण हाके हे शुक्रवारी (ता.७) पंढरपूर दौऱ्यावर आले होते. या दौऱ्या दरम्यान येथील विश्रामगृहावर मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी हाके यांना पाहून घोषणाबाजी सुरु केली. एक मराठा लाख मराठा, जरांगे पाटील आगे बढो अशी घोषणाबाजी सुरु असताना मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वय धनाजी साखळकर आणि लक्ष्मण हाके यांच्यामध्ये शाब्दीक वादावादी झाली. दरम्यान हा वाद टोकाला गेल्याने लक्ष्मण हाके आणि मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले. दरम्यान वाद चिघळला. हमरीतुमरी सुरु झाली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला.



**प्रसंगी महाराष्ट्र बंद करु : साखळकर**

दरम्यान सामाजिक क्षेत्रात काम करणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे. यानंतर मराठा समाज आक्रमक झाला आहे. यामागचा मास्टर माईंड लवकरात लवकर शोधून काढावा अन्यथा मराठा समाज राज्यात तांडव केल्याशिवाय राहणार नाही असा इशारा मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी दिला. शिवाय प्रसंगी महाराष्ट्र देखील बंद करू असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक धनाजी साखळकर यांनी दिला आहे.

**जरांगे यांनी मिडिया ट्रायल बंद करावी : हाके**

धनंजय मुंडे यांच्यावर मनोज जरांगे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत आरोप केल्यानंतर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी जरांगे यांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. लक्ष्मण हाके म्हणाले, जरांगे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दे आणि आरोपांवर गृह विभाग तपास करेलच. धनंजय मुंढे असे काही करतील असे वाटत नाही. जरांगे यांनी मिडिया ट्रायल बंद करावी असा टोला हाके यांनी लगावला.

## श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना करमाळा तालुका कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ७ नोव्हेंबर-**

श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना शिवसेना आयोजित करमाळा तालुका कार्यकारिणीची बैठक व पदाधिकाऱ्यांच्या निवडी जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांच्या संपर्क कार्यालय करमाळा येथे संपन्न झाली. यावेळी तालुका अध्यक्षपदी दादासाहेब तनपुरे, तालुका उपाध्यक्ष पदी राहुल शिंदे, मिलिंद भोसले, संघटक पदी राजेंद्र कांबळे, महिला तालुका अध्यक्षपदी रेखा ताई मुळूक, सचिव पदी सतीश कोल्हे, मिडिया प्रमुखपदी सूर्यकांत होनप, कोषाध्यक्षपदी भाऊसाहेब भोसले व सदस्य पदी मजनू शेख, संतोष गोरे, नामदेव पालवे यांची निवड जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना आयोजित करमाळा तालुका पदाधिकाऱ्यांच्या निवडीच्या कार्यक्रमाला ओबीसी व्हिजेएनटी सोलापूर जिल्हा अध्यक्ष सुरेश करचे, ओबीसी व्हिजेएनटी महिला जिल्हा अध्यक्ष पद्मजा इंगोले, युवासेना तालुका उपाध्यक्ष नवनाथ गुंड उपस्थित होते.



## कर्मयोगी बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयाचा ८६.२९ टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांच्याकडून घेण्यात आलेल्या प्रथम वर्षाच्या अंतिम परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेमध्ये श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (बी.एस्सी) पंढरपूर महाविद्यालयाचा निकाल ८६.२९% इतका लागला असून यामध्ये प्रथम क्रमांक आश्लेषा कावरे , द्वितीय क्रमांक अविष्कार चौधरी आणि तृतीय क्रमांक दिपाली पवार यांनी मिळवला आहे.





श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ.एस.पी.पाटील, प्राचार्य डॉ.ए.बी.कणसे, प्राचार्य प्रा.गुरुराज कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एस. एम. जाधव, रजिस्ट्रार गणेश वाळके यांनी अभिनंदन केले.

## भाजपा माळशिरस मंडल पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर; तरुण व निष्ठावंतांना संधी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ७ नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, संघटनमंत्री मकरंजी देशपांडे, मा.खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, मा. आ. राम सातपुते, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्या मान्यतेने भारतीय जनता पार्टी माळशिरस तालुका माळशिरस मंडल अध्यक्ष नितीन मोहिते यांनी आज पदाधिकारी निवडी जाहीर केल्या.

पदाधिकारी असे : **मंडल सरचिटणीस** : हनुमंत कर्चे (पिंपरी), महादेव पवार (इस्लामपूर), डॉ. भिवा शेंडगे (साळमुख), मंडल उपाध्यक्ष संदीप पाटील (माळशिरस), किरण पाटील (निमगाव मगराचे), संभाजी माने (कण्हेर), गणेश बोराटे (माळशिरस), शशांक जाधव-पाटील (मळोली), रावसाहेब रुपनवर (लोणंद), रवी रुपनवर (फडतरी), अक्षय लोंढे (लोंढे मोहितेवाडी). **मंडल चिटणीस** : संजय पाटील (कुसमोड), धनाजी मगर (गारवाड), ज्योतीराम अवताडे (फळवणी), अमोल माने (कोथळे), सोमनाथ मदने (गिरवी), अक्षय जगदाळे (माणकी), जयशिव गलांडे (झिंजेवस्ती), **मंडल कोषाध्यक्षः** सत्यजित गलांडे (पिलीव), **सहकोषाध्यक्ष** : राजेंद्र वळकुंदे (माळशिरस).





**माळशिरस मंडल युवा मोर्चा अध्यक्ष** : अण्णासाहेब देवकाते (धानोरे), **उपाध्यक्ष** : रामा आवळे (इस्लामपूर) **ओबीसी मोर्चा अध्यक्ष** : आनंद शेंडगे (रेडे), **किसान मोर्चा अध्यक्ष** : सचिन पाटील (फळवणी) **मंडल सरचिटणीस** : हनुमंत शिंदे (पिंपरी), **उपाध्यक्ष** : धनाजी माने (कनेर) **मंडल उपाध्यक्ष** : सतीश (काका) मगर (गारवाड), **अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष** : शाहिद शेख (चांदापुरी), **अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष** : सागर गुळीक (फडतरी), **प्रसिद्धी प्रमुख** : गणेश देशमुख (बचेरी), **सहप्रसिद्धीप्रमुख** : कुंडलिकराजे मगर (निमगाव मगराचे), **संपर्क प्रमुख** : नितीन रणवरे (मांडकी), **सहसंपर्कप्रमुख** : धुळदेव सूळ (जळभावी), **क्रीडा आघाडी क्रीडा प्रमुख** : लखन बोडरे (जळभावी), **माळशिरस मंडल कार्यकारणी सदस्य** : शिवाजी चव्हाण (तांदुळवाडी), अनिरुद्ध शिंगाडे (माळशिरस), योगेश जाधव (शेंडेचिंच), वस्ताद दाजी सोलनकर (सुळेवाडी), गणेश पाटील (बचेरी), महादेव काळेल (शिंगोर्णी), सुशांत जाधव (मळोली), संदीप जाधव (पिलीव), राजू बोडरे (पिलीव), अर्जुन देवकाते (धानोरे), शरद कर्चे (पिंपरी), प्रमोद मगर (चांदापुरी), दत्तात्रय जानवर (पिलीव), संतोष करडे (पिलीव), गोरख संपत्ती मगरनिमगाव, विकास श्रीमंत मगर निमगाव, सतीश गणपत मगर निमगाव, तुकाराम मिसाळ (चांदापुरी), महबूब पठाण (पठाणवस्ती), शिवाजी मारुती मगर निमगाव, देविदास काळे (भांब), सतीश मगर (मगरवाडी), नामदेव माने (कण्हेर), कृष्णा देशमुख (इस्लामपूर), सतीश पवार (इस्लामपूर), दादा पाटील (कण्हेर), मनोहर माने (कण्हेर), सागर रुपनवर (भांब), विनोद काळे (भांब), दादा मिसाळ (इस्लामपूर), पोपट भोसले (लोणंद), आजिनाथ रुपनवर (लोणंद), सचिन जाधव (डोंगरवाडी), भानुदास चोरमले (जळभावी), राजेंद्र दुपडे (कोळेगाव), नामदेव सावंत (कोळेगाव), नाथा पारसे (कोळेगाव), धनाजी देवकर (माळशिरस), बापूराव दगडे (शिंगोर्णी), ज्ञानेश्वर शेळके (तांदुळवाडी), नाना चोरमले (माळशिरस), राहुल सुरवसे (फळवणी), दीपक मिसाळ (काळमवाडी), इकबाल जमादार (झिंजेवस्ती), चंद्रकांत शेटे (पठाणवस्ती), समाधान शिंदे (डोंगरवाडी), आप्पासो ठोंबरे (निटवेवाडी) अशी माळशिरस तालुका भाजपाची मंडल कार्यकारणी जाहीर झालेली आहे.